# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. ०१/०७/२००९**

आज बुधवार दि. ०१/०७/२००९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. २०/०६/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ३) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ४) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ५) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ६) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ७) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ८) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ९) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १०) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| ११) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १२) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १३) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १४) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १५) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १८) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २०) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २१) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २२) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २४) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २५) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २९) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३०) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३१) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३२) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३३) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३४) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३५) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३६) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३८) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३९) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४०) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४१) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४३) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४७) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५१) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५४) | प्रेरणा भाटकर | सदस्या |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६३) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६४) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६५) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६६) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६७) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६८) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६९) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७०) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७२) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७४) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | चंद्रकांत सिताराम वैती | विरोधी पक्षनेता |
| २) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| २) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ३) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ४) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रीय गितासाठी जागेवर उभे राहायचे आहे.

(राष्ट्रीय गीत वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.)

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने, या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ०१/०७/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२, दि. २०/०६/२००९ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होत आहे. ११ वाजुन ४० मिनिटे झालेली आहेत. सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आर.जी. जागेबद्दल माझा प्रश्न आहे. माझे पाच सात उपप्रश्न आहेत. मा. आयुक्त साहेब, किंवा संबंधित खात्याचे अधिकारी त्या उपप्रश्नाचे उत्तर देतील. आर.जी. जागेबद्दल मी जो प्रश्न विचारलेला आहे. त्या आर.जी. जागेची व्याख्या काय?

**मा. आयुक्त :-**

२५०० स्क्वेअर मीटरच्या वरील याला १५ टक्के आर.जी. सोडावी लागते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर.जी. जागेचे स्वरूप काय?

**मा. आयुक्त :-**

आर.जी. जागा विकासकाने डेव्हलप करायची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्वरूप म्हणजे आर.जी. जागेचे जे क्षेत्रफळ असते म्हणजे एखादे कॉम्प्लेक्स बांधले. त्याची वेगवेगळ्या आरक्षणाचे वेगवेगळे सोडायचे असते की.....

**मा. आयुक्त :-**

वेगवेगळ्या ठिकाणी सोडले तरी चालते. एकाच ठिकाणी सोडले तरी चालते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर.जी. विकसित करण्याची जबाबदारी कोणाची आहे.

**मा. आयुक्त :-**

विकासकाची.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे विकासक विकास करणार. काय काय विकास करण्याची जबाबदारी असते.

**मा. आयुक्त :-**

गार्डन डेव्हलपमेंट.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे आणखिन काय? गार्डनमध्ये काय काय आहे? म्हणजे त्याला कुंपणभिंत बांधायची? माती भराव करायचा? झाडे लावायची? त्याच्यात काय काय येते?

**मा. आयुक्त :-**

त्यांनी स्वतःची बिल्डींग बांधून झाल्यानंतर माती भराव करून गार्डन डेव्हलपमेंट करायचा आणि त्या सोसायटीमध्ये राहणा-या लोकांची सुविधा करायची.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

गार्डन माती भरायची. म्हणजे कुंपणीभिंत बांधायची की नाही?

**मा. आयुक्त :-**

ओपन स्पेस बांधायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता पुढचा विषय म्हणजे कुंपणभिंत बांधली की नाही हे मी तुम्हाला नंतर विचारतो. त्याआधी ज्या जागेमध्ये आर.जी. आहे आणि त्या जागेमध्ये विकासकाने सोसायट्यांना न विचारता किंवा सोसायटी फॉर्म झाल्याच्या आधी त्या ठिकाणी क्लब, प्रार्थना सभा किंवा अन्य काही बाबी बांधले असेल. तर त्याला कुठल्या नियमाखाली आपण काय कार्यवाही करायची?

**मा. आयुक्त :-**

महापालिकेची परवानगी न घेता केले असेल तर बिगर परवाना म्हणून कार्यवाही करायची. परवानगी घेउन केली असेल तर त्या सोसायटीच्या लोकांनी वापरायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे त्यांनी बांधले असेल, आत्ता त्याठिकाणी आहे. त्या आर.जी मध्ये काही संकुलामध्ये विकासकाने बांधलेले आहे. त्यावर आपण आत्तापर्यंत कारवाई केली आहे काय?

**मा. आयुक्त :-**

नाव सांगितले तर बोलता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्याकडे नाव असले पाहिजे. मी नाव कशाला सांगू.

**मा. आयुक्त :-**

असे गावातील कोणी बांधली हे कसे सांगणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपला डिपार्टमेंट एवढा मोठा आहे. बाकीची गोष्ट लक्षात ठेवतात ही बाब त्यांची आहे.

**मा. आयुक्त :-**

कोणत्याही विकासकाने, ७९ किलोमिटरचा एरिया आहे. त्यामध्ये कोणी परवानगी न घेता बांधली हे तुम्हाला सांगावे लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी सांगणार नाही. तुम्ही सांगा की, झालेच नाही असे तुमचे म्हणणे आहे का?

**मा. आयुक्त :-**

असे आमचे म्हणणे नाही. परंतु कोणी ओपन स्पेस ठेवले....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा एक डिपार्टमेंट आहे. त्या डिपार्टमेंटची जबाबदारी असते की, भोगवटा दाखला देण्यापुर्वी त्या जागेचे त्यांनी परिक्षण करावे. तिकडे जाउन माहिती घ्यावी की, आर.जी. जागा सोडली आहे की नाही? सोडली असेल तर त्यांनी कुंपणभिंत बांधलेली आहे की नाही? कुंपणभिंत बांधलेली असेल तर त्यांनी माती भराव केलेला आहे की नाही? माती भराव केला आहे तर त्यांनी झाडे लावली की नाही? हे केल्यानंतर त्याला भोगवटा दाखला दिला जातो. अशा अनेक संकुलनामध्ये अशी अनेक बांधकामे झालेली आहेत. मी नाही तर तुमच्या पत्राने मला माहिती दिलेली आहे. माझ्याकडे आहेच. डिपार्टमेंटने पत्र दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

जर आपण सांगितले तर मला त्याविषयी बोलता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी बोलणार नाही. तुम्ही सांगा आम्ही माहिती घेउ पुढच्या वेळी.....

**मा. आयुक्त :-**

मला सांगता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, संबंधित खात्याला उभे करा.

**मा. महापौर :-**

आपण कुठले स्पेसिफिक सांगा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी स्पेसिफिक कशाला सांगणार? मला स्पेसिफिक काय गरज आहे. ही कोणाची जबाबदारी आहे? खात्याची जबाबदारी नाही काय? मी नाव सांगणार नाही. माझ्याकडे पत्र आहे. महापालिकेने आपले पत्र बघावे.

**प्रशांत पालांडे :-**

माझ्याकडे स्पेसिफिक माहिती आहे. हवी असल्यास मी देतो. आमचे शांतीपार्क, मिरा रोड पुर्वेला जे गृहसंकुल आहे. त्या ठिकाणी तीन आर.जी. होत्या. तीनही आर.जी. मध्ये काही समाजाच्या प्रार्थनास्थळांची बांधणी झालेली आहे. आणि त्याच्याबद्दल मी पत्रव्यवहार करतो आहे. मग त्याच्यावर काय कार्यवाही करणार ते आपण सन्मा. सभागृहाला सांगावे.

**मा. आयुक्त :-**

यांनी क्लब हाउस म्हणून सांगितले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सगळ्याप्रकारचे फक्त क्लब हाउस नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

क्लब हाउस, प्रार्थनासभा किंवा अन्य काही.

**मा. आयुक्त :-**

सगळ्या आर.जी. ची माहिती काढा. कोणी कोणी काय काय बांधले आहे त्याची यादी करा. पुढच्या सभेमध्ये सविस्तर सांगू की, किती आर.जी. आहेत. किती इंप्रोज झाल्या ते सविस्तर सांगतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, हा विषय मागच्या सभागृहात मग बोलतात की, ओमप्रकाश अग्रवाल विचारतो.

**मा. आयुक्त :-**

विचारा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय मागच्या एका वर्षापासुन येत आहे.

**मा. आयुक्त :-**

विचारायचा तुमचा हक्क आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अधिकारी वर्ग आपण एवढ्या गाड्या दिलेल्या आहेत. त्यांच्या हातामध्ये गाड्या आहेत. मग का माहिती घेत नाहीत. हे उत्तर मागच्या सहा महिन्यापासुन एकच उत्तर येते. म्हणजे त्या उत्तरामध्ये काय प्रगती झाली आहे की, ही प्रगती नंतर तोच विषय, आणि तेच फक्त उत्तर म्हणजे मागच्या सहा महिन्यापासुन हे उत्तर देत आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्या देखत मी नगररचना विभागाला आदेश दिला की, एकूण बिल्डरने बांधकाम केले आहे. १५ टक्के आर.जी. सोडलेले कोण कोण आहेत त्यांची यादी करा आणि कोणकोणत्या आर.जी. वर इन्क्रोचमेंट झाले आहे. त्यांची यादी करून ॲक्शन सुरू करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला पुढच्या मा. महासभेमध्ये, साहेब, हा विषय पेंडीग ठेवता की कसे काय?

**मा. आयुक्त :-**

पेडींग म्हणजे तुम्हाला काय उत्तर अपेक्षित आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी तुम्हाला आधी सांगितले की, आर.जी. जागेत.....

**मा. आयुक्त :-**

आत्ता सगळ्या आर.जी. सर्व यादी करा.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता तुम्हाला एका सन्मा. नगरसेवकांनी सांगितले की, तीन आरक्षणाबाबत त्यांचा पत्र व्यवहार चालू आहे. तुम्ही मला यादी विचारत होते. मी तुम्हाला देत नाही असे सांगितले.

**मा. आयुक्त :-**

कोणत्या ओपन स्पेसवर क्लब हाउस झालेले आहेत ते सांगा.

**प्रशांत पालांडे :-**

सर्व प्रकारचे बोलतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

क्लब हाउस आहे, प्रार्थना सभा आहे किंवा अन्य बाबी आहेत, त्या बिल्डरचे ऑफिस आहे.

**मा. आयुक्त :-**

महत्वाचा उद्देश बाजुला पडतो आहे. ज्या विकासकाने डेव्हलप केले, फ्लॅट्स विकले. सोसायटी रजिस्ट्रेशन झाली. सोसायटीच्या लोकांची ती जागा आहे. सोसायटीच्या लोकांची ती आर.जी. आहे. आर.जी. डेव्हलप झाल्यानंतर विकासकाने स्वतःचा हक्क सोडून सोसायटीच्या ताब्यात द्यायला पाहिजे. आणि सोसायटीने ते मेंटेंन करायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, यापुर्वी सोसायटीकडून कुठलेही पत्र न घेता डायरेक्ट विकासकाकडून महापालिकेने घेतले. तसे घेता येते का?

**मा. आयुक्त :-**

हे चुकीचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरारोडमध्ये असे विकसित केलेले आहे. आपली आरक्षणे आणि महापालिकेच्या पैशांचा अपव्यय झालेला आहे. म्हणून आम्ही हा विषय आणलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेचे काम आहे, रिझर्वेशनच्या जागा डेव्हलप करायच्या आणि आर.जी. डेव्हलप करायचे काम विकासकाचे आहे आणि ते सोसायटीच्या ताब्यात द्यायला पाहिजे. आणि सोसायटीने स्वतःच्या जागेवर इन्क्रोचमेंट होणार नाही. आपल्या सर्व सदस्यांना वापर करता येईल अशा तऱ्हेने डेव्हलप केलेले मेंन्टेंन करायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून सांगतो ना. एक तर तुम्हाला अतिक्रमण सांगितले आहे. तुम्हाला आत्ता बोलले की, अशा अनेक आरक्षणामध्ये आहे. आणि तुम्ही सांगितले की, आम्हाला यादी दिलेली आहे. एकतर तुम्ही सर्व्हे करा आणि पुढच्या मा. महासभेमध्ये संपूर्ण माहिती आणा की, तुम्हाला पुढच्या मा. महासभेमध्ये माहिती देतो.

**मा. आयुक्त :-**

सविस्तर देतो. १५ टक्के सोडलेल्या जागा किती, इन्क्रोचमेंट केलेल्या जागा किती आणि सोसायटीच्या ताब्यात दिलेले किती?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जर तुमच्याकडे रेकॉर्ड सापडत नसेल.....

**जयंत पाटील (मा. सभागृह नेता) :-**

साहेब, यांच्या प्रश्नाला जवळ जवळ एक वर्ष व्हायला आले. फक्त चार दिवस बाकी आहेत. तर या काळामध्ये तिकडे फरक पडलेला असेल. आत्ता विकासक राहिला असेल की नाही, सोसायटी झाली असेल, म्हणजे आपण प्रश्न एवढ्या उशीरा आणल्यामुळे अनेक भानगडी निर्माण होतात.

**मा. आयुक्त :-**

उशिरा आणला नाही. प्रश्न विचारणारे जास्त असल्यामुळे आत्ता नंबर लागला.

**जयंत पाटील (मा. सभागृह नेता) :-**

प्रश्न ०५/०७/२००८ चा आहे.

**मा. आयुक्त :-**

तो आमचा दोष नाही. प्रश्न जादा आले....

**जयंत पाटील (मा. सभागृह नेता) :-**

दोष कोणाचा हे म्हणत नाही. तुम्हालाही दोष देत नाही. प्रश्न जास्त विचारणारे भरपुर आहेत. प्रश्नामुळे किती प्रश्न निर्माण झाले हे तुम्ही बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मला महापालिकेने ०५/०४/२००८ ला एक पत्र दिलेले आहे. तारीख लिहून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, माझी तुम्हाला एक विनंती आहे. आत्ता समजा आपले ए.डी.टी.पी. आहेत. त्यांना सुद्धा विचारा. या भाईंदर शहरामध्ये अशी पद्धत पुर्वी झालेली आहे, तुम्ही आल्यानंतर झाली की नाही ती कल्पना नाही. आम्ही त्याच्यानंतर सुद्धा काढू. जे विकसित आर.जी. सोडलेले आहे. इकडची पद्धत अशी आहे की, जे मागचे ए.डी.टी.पी. होते आणि ह्यांनी, ह्यांनी तपासुन बघावे ते एक वेळेला आर.जी. सोडतात समजा १००० मीटरचा प्लॉट असेल, त्याच्यामध्ये या साईडला आर.जी. दाखवतात. एक बिल्डींग पास करून घेतात ती बिल्डींग कम्प्लीटली बांधून घेतात. त्याचे ऑक्युपेशन सर्टीफिकेट घेतात. त्याच्यानंतर जो आर.जी. सोडलेला असतो. त्याच्यावर टी.डी.आर. सुद्धा घेतात.

**मा. आयुक्त :-**

हा फौजदारी गुन्हा आहे.

**मिलन पाटील :-**

आणि ते केल्यानंतर पुन्हा ते दाखवून हा आर.जी. ह्या बिल्डींगच्या इकडे दाखवतात आणि ह्या आर.जी. वर बिल्डींग पास करून घेतलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

असे जर झाले असेल तर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. कारण हा क्रिमिनल ऑफेन्स आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. श्री. मिलन पाटील साहेब, साहेबांना तसे पुरावे द्या.

**मा. आयुक्त :-**

या केसमध्ये घेणाऱ्यावर, देणाऱ्यावर आणि विकासकांवर फौजदारी गुन्हा दाखल करायला पाहिजे. नगररचना विभागाने अशी प्रकरणे शोधून काढावीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. श्री. मिलन पाटील साहेब, पुरावे द्या आणि मलाही त्याची कॉपी द्या.

**मिलन पाटील :-**

कितीतरी आहेत.

**मा. आयुक्त :-**

अशी प्रकरणे आपण पण द्यावीत. म्हणजे आपण करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, दि. ०५/०४/२००८.....

**मा. आयुक्त :-**

साहेब, लिहून घेतले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी वाचून दाखवत आहे. मला महापालिकेने माझ्या ०३/०३/२००८ च्या पत्राच्या संदर्भामध्ये पत्र दिलेले आहे. त्यामध्ये लिहिलेले आहे. मी शेवटच्या तीन ओळी वाचतो, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. सदर नोटीसच्या अनुषंगाने तत्कालिन आयुक्त यांच्या दालनात सुनावणी घेण्यात आली होती. म्हणजे ०५/०४/२००८ रोजी मला जे पत्र दिले त्याच्या आधी ज्या ज्या विकासकाने अशा आर.जी. सोडल्या नाहीत, विकासकाने काम केले नाही अशांची मा. आयुक्तांच्या दालनात बैठक झाली. आणि दालनात सुनावणी घेण्यात आली. तरी सदर सुनावणी आदेशानंतर पुढील योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. त्या गोष्टीला आज बरोबर एक वर्ष आणि तीन महिने झाले. म्हणजे दालनात सुनावणी झाली. सुनावणी झाल्यानंतर पुढील कार्यवाही काही नाही आणि मागच्या वेळी तुम्ही मला सांगितले की, पंधरा विकासकांनी पत्र दिलेले आहे. तुम्हाला पत्र कधी दिले, एक आठवड्यापुर्वी आमच्या या शहराच्या नागरिकांच्या हक्काचा विषय आहे. ज्या लोकांचा याच्यामध्ये हक्क आहे आणि जर बिल्डर किंवा विकासक किंवा अन्य कोणी त्याच्यामध्ये अतिक्रमण करत आहेत तर आम्ही या नागरिकांचे असे होउ देणार नाही आणि असे अनेक प्रकार आहेत. माझ्या कडे महापालिकेच्या पत्राचे उत्तर आहे की, कुठली विकसित झाले आहे आणि कशामध्ये अतिक्रमण झालेले आहे पण अतिक्रमण झाल्यानंतरही आज मला पत्र देउन एक वर्ष झाले आहे. ३१/११/२००८ रोजी मला पत्र दिलेले आहे की, कुठल्या कुठल्या मध्ये अतिक्रमण झालेले आहे. तरी त्याच्यावर आम्ही ही कार्यवाही केलेली आहे हा प्रश्न ठेउन जसे आत्ता सन्मा. श्री. जयंतदादा पाटील यांनी सांगितले. त्यानंतरही यावर गुन्हा दाखल केला आहे किंवा यांचा भोगवटा दाखला दिला नाही, कुठली ही कार्यवाही नाही. म्हणजे फक्त प्रश्न आला की, मा. महासभेत नगरसेवक गोंधळ घालतील आणि गप्प बसतील.

**मा. आयुक्त :-**

असे होणार नाही. मी एका विकासकाचे तेरा भोगवटा दाखले ठेवलेले आहेत. ओपन स्पेस सोसायटीच्या ताब्यात देईपर्यंत ठेवलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, यह विषय अगली मा. महासभामे डिपार्टमेंट आर.जी. का पुरा लोन लेकर आयेंगी कितने पर अतिक्रमण हुआ है? कितने पर महापालिकेने बिना सोसायटी के डायरेक्ट विकासक से लिया है?

**मा. आयुक्त :-**

साहब को सोसायटी मेंबर की भी जिम्मेदारी है ना। हमारा ओपन स्पेस ताबे मे ले लिया और मेंटनेन्स करे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, जेव्हा भोगवटा दाखला देतो ही जबाबदारी पहिली महापालिकेची आहे. त्यांनी कुंपणभिंत बांधली आहे की नाही. जसे आत्ता सन्मा. श्री. मिलन पाटील साहेबांनी सांगितले की, विकासक आधी आर.जी. जागेवर बांधकाम करतात नंतर तं आपले बांधकाम करतात.

**मा. आयुक्त :-**

म्हणूनच मी सांगितले की, हा फौजदारी गुन्हा दाखल करायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अजुन लोकांना हे माहिती पण नाही. माझ्या प्रभागामध्ये बालाजी नगरची जी मोठी आर.जी. आहे. त्या आर.जी. मध्ये बी.एस.ई.एस ने सबस्टेशन बांधायला सुरूवात केली. मी महापालिकेला विचारले की परवानगी दिलेली आहे काय. सर्वांनी हात वरती केले. आणि बी.एस.ई.एस वाल्यांनी खांबे गाढलेले काढून घेउन गेले. आज तो आरक्षित भुखंड सुरक्षित आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, या केसेमध्ये नागरीकांच्या सोसायट्या आहेत सोसायट्याने करायला पाहिजे. समजावून सांगायला पाहिजे की फ्लॅट ताब्यात गेला की सासायटीच्या मालकीची आर.जी. आहे. तुम्हीच ताब्यात घ्या तुम्हीच संरक्षण करा आणि तुम्ही मेंटेन करा. हे सगळ कौन्सीलरनी महापालिकेच्या स्टाफनी सोसायटीच्या ताब्यात द्यायला पाहिजे आणि काही अतिक्रमण झाले की काढायला मालक सोसायटी आहे. सोसायटीची सुध्दा जबाबदारी आहे.हि मालकी आपली आहे.आपण मेंन्टन करायला पाहिजे. आपल्या ताब्यात ठेवायला पाहिजे. सोसायटीला सुध्दा जाणीव व्हायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सेक्टर नं-१० चा महासभेत तुम्ही नसताना प्रश्न या महासभेत आला होता. याच मा. महापौरांसमोर आला होता. तो आजही उघडा आहे. तिकडे बिल्डर काही करायला मागत नाही. त्यावेळी मा. महापौरांनी नोटीस काढली होती. संबंधितांना नोटीस काढा, मिटींग बोलवा. त्यांनी तो आरक्षीत आर.जी. भुखंड आहे त्याला डेव्हलप करायला पाहिजे. तिकडे स्ट्रीट लावायला सांगितले तर सांगितले की आम्ही स्ट्रीट लावू शकत

नाही, हे आपल्या ताब्यात नाही. मग ताब्यात नाही. त्या सोसायटी झालेल्या आहेत त्या विकसित करत नाही. त्या गोष्टीला आजपर्यंत त्या बिल्डरला बोलावून तो गार्डन विकसित करत नाही.

**मा. आयुक्त :-**

साहेब, एवढ्या ठिकाणी आपण सोसायटीच्या लोकांना एकत्र करून बिल्डरवर मोर्चा नेला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, हा नंतरचा आमचा विषय आहे. जे काम तुम्ही केले पाहिजे, प्रशासनाने केले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मोर्चा आणण्याचे काम आमचे नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही तुम्हाला मोर्चा आणायला सांगत नाही. तुम्हाला गाड्या दिलेल्या आहेत. दहा-दहा, तीस-तीस....

**मा. आयुक्त :-**

आम्ही आमच्या कायद्याने ताब्यात देण्याचा प्रयत्न करू. पण सोसायटीच्या लोकांनी पण सपोर्ट करायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कायद्याने केले नाही म्हणून अतिक्रमण झाले आहे ना?

**मा. आयुक्त :-**

कारण मालकी त्यांची आहे. कायद्यावर स्पष्ट अमेंडमेंट झाली. ज्यांची सोसायटी होईल, सोसायटीच्या आर.जी. मध्ये गार्डन डेव्हलपमेंट करून ते सोसायटीच्या ताब्यात घ्यायचे आहे. त्या केसमध्ये सोसायटी मालक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्हाला प्रॅक्टीकल माहिती आहे......

**मा. आयुक्त :-**

सोसायटीचे लोक गप्प बसतात त्याचा फायदा विकासक घेतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

गप्प बसत नाहीत. तुम्हाला प्रॅक्टीकल माहिती आहे. जे सोसायटीचे मालक आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांच्या ताब्यात सोसायटी येतच नाही. ५-५, ६-६ वर्षे बिल्डर स्वतः त्या सोसायटीचा मेंन्टनन्स बघतो. त्यांना सांगत पण नाही. त्यांच्याकडून पैसे घेतो. तो फ्लॅट पण जसा विकतो तसा ते टॅक्स लावून घेत होते. आत्ता ही पद्धत बंद झाली की, आपण पुर्ण बिल्डींगचा टॅक्स लावतो. आपण समान कर विषय आणला होता. आत्ता हा विषय म्हणजे विकासकाने....

**मा. आयुक्त :-**

साहेब, एकोणतीस हजार प्रॉपर्टी आहेत. बिल्डरने जे जे फ्लॅट नागरिकांना विकलेले आहेत. त्यावरच आकारणी होत होती आणि न विकलेल्या प्रॉपर्टी तशाच राहत होत्या. म्हणून मी सर्व प्रॉपर्टीवर आकारणी केली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय आणला तेव्हा झाले ना? म्हणून तुम्ही आत्ता हे सांगता की, सोसायटीने मोर्चा काढला पाहिजे. विकासकावर कधी काढणार, जेव्हा ती सोसायटी फॉर्म झाली. सोसायटी फॉर्म करत नाही. आर.जी. मध्ये बांधकाम करतात, नंतर ती आर.जी. दुसऱ्या ठिकाणी दाखवतात. सोसायटीवाले काय करणार?

**मा. आयुक्त :-**

करणार नाही. आम्ही तुम्हाला शब्द देतो की, विकासकाने आर.जी. ताब्यात द्यायलाच पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आजही ह्या डिपार्टमेंटमध्ये आपण सात माळ्याची बिल्डींग बांधली. सात माळ्यानंतर त्याने टी.डी.आर. आणला. टी.डी.आर. आणल्यानंतर आणखीन दोन माळे बांधले.

**मा. आयुक्त :-**

साहेब, वरचा हक्क सोसायटीचा आहे. विकासकाचे संपले. विकून झाल्यानंतर सोसायटी झाली. सोसायटी झाल्यानंतर सोसायटीच्या ताब्यात ती बिल्डींग आणि आर.जी. राहिली. जर टी.डी.आर. घेउन वाढवायचे असेल तर तो सोसायटीचा हक्क राहिला. विकासकाचा हक्क तिथे संपला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, पाच पाच वर्ष याच कारणामुळे विकासक सोसायटी करत नाही. आणि टी.डी.आर. घेतात, खालची आर.जी. जागा तेवढीच आणि वर तीन माळे बांधलेले असे अनेक प्रकार आहेत.

**मा. आयुक्त :-**

सोसायटी करत नसेल तर मेंबरने ग्राहक मंचाकडे जावे. सहकार कोर्टाकडे जावे. तसा आदेश आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमचे सर्व म्हणणे बरोबर आहे. आमचे एवढेच म्हणणे आहे की, आम्हाला आर.जी. जागेचा पुर्ण आराखडा....

**मा. आयुक्त :-**

यापुढे सोसायटीला आर.जी. दिल्याशिवाय कम्प्लीएशन द्यायचे नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, पुढच्या मा. महासभेत माझा हा विषय पुर्ण माहितीसह आपण तसे रूलिंग द्यावे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आपल्याला पुढच्या मा. महासभेच्या अगोदर पुर्ण माहिती देण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महासभेत.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. मा. महासभेत माहिती देण्यात येईल.

**दिप्ती भट :-**

मा. आयुक्त साहेब, मैने २००८ मे सेक्टर २ का क्वेशन दिया था। तब मै नही थी। ०३/०३/२००८ मे क्वेशन दिया है। हम लोगो ने सेक्टर – २ या शांतीनगर पुरा हॅन्डओव्हर कर लिया है ना?

**मा. महापौर :-**

हॅन्डओव्हर झालेला नाही.

**दिप्ती भट :-**

झाले आहे ना. रस्ते झाले, स्ट्रीट लाईट झाली.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, हॅन्ड ओव्हर हो गया है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, शांतीनगर संकूल हॅन्डओव्हर झालेला आहे. काही ठिकाणी रस्ते, गटारे व उद्यानेपण झालेली आहेत. मग नगरपालिकेने त्याठिकाणी काही उद्याने विकसित केलेली आहेत.

**एस. ए. खान :-**

आपण रस्ते सफाई करतो, गटारे साफ करतो, इलेक्ट्रीक बिल आपण भरतो, नुसता आर.जी. त्यांच्या ताब्यात ही कुठली शाळा आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मगाशी तुम्ही आर.जी. च्या बाबतीत जे वक्तव्य केले. आर.जी. ची व्याख्या अशी झालेली आहे आणि ती अशी आहे की, जी सोसायटीची किंवा बिल्डींगची जेवढी जागा असणार जो आर.जी. असणार तो कायद्यामध्ये त्याला बिल्डरने रजिस्ट्रेशन करून द्यायचा आणि सोसायटीच्या नावावर करायचे आहे. हा कायदा आहे. यासुद्धा कायद्याची अंमलबजावणी केल्यानंतर तुम्ही ऑक्युपेशन देउ शकता.

**मा. आयुक्त :-**

अडचण ही आहे की, आपण भोगवटा दाखला दिल्याशिवाय त्यांचे सोसायटी रजिस्ट्रेशन होत नाही आणि रजिस्ट्रेशन झाल्यानंतर आर.जी. ताब्यात द्यायला आपण दुसरे काय बंधन करायचे? मग नळ कनेक्शन द्यायचे बंद करायला पाहिजे. कारण भोगवटा दाखला दिल्याशिवाय सोसायटी रजिस्ट्रेशन होत नाही. भोगवटा दाखला दिल्यानंतरच सोसायटी रजिस्ट्रेशन होतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे काही नाही. भाईंदरच्या अनेक बिल्डींग भोगवटा दाखल्याशिवाय रजिस्ट्रेशन झालेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

असे असेल तर आम्ही भोगवटा दाखला देणार नाही. सोसायटी रजिस्ट्रेशन होउन, आर.जी. डेव्हलप करून ताब्यात दिल्यानंतरच करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही तसे कळवा.

**मा. आयुक्त :-**

लेखी कळवतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. आयुक्त महोदय, शांतीनगर संकुल हा आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेला आहे का?

**मा. आयुक्त :-**

संकुल नाही. रस्ता, गटारे ताब्यात घेतलेले आहेत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मग शांतीनगरमध्ये जी काही उद्याने विकसित करण्यात आली आहेत ती कशी केली? आणि बाकीचे....

**मा. आयुक्त :-**

आम्ही ती ताब्यात घेणार नाही. ती सोसायटीच्या मालकीची आहेत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पण काही उद्याने नगरपालिकेने विकसित केलेली आहेत.

**मा. आयुक्त :-**

काही घेतली असतील तर ते बरोबर नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बरीच उद्याने अशी आहेत. दोन चार उद्याने आहेत की, ती विकसित करण्यात आलेली आहेत.

**मा. आयुक्त :-**

सोसायटीच्या लोकांनी मेंन्टेनेन्स चार्जेस वाढवायचे आहेत. आणि गार्डन्स सुद्धा मेंन्टेन करायचे आहेत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मग त्याच्यासाठी काय करायला पाहिजे. बिल्डरकडे गेल्यानंतर बिल्डर म्हणतो.

**मा. आयुक्त :-**

यापुढे ते काम करायचे महापालिकचे जरुरीचे नाही. महानगरपालिकेने आरक्षण निश्चित करायचे आहे. प्रत्येक आर.जी. डेव्हलप करत बसलो तर सात हजार स्टाफ लागेल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

जर प्रत्येक सेक्टर मधल्या जे सदस्य आहेत त्यांनी जर आपल्याला संपुर्ण...

**मा. आयुक्त :-**

आम्ही घेणार नाही सोसायटीच्या ताब्यात घ्यायचा आहे. विकासकांनी गार्डन डेव्हलप करायच आहे. आणि सोसायटीच्या लोकांनी मेंटेन, डेव्हलप करायचे आहे. आणि ते गार्डन सोसायटीच्या लोकांनी वापरायचे आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आणि विकसित करण्याची परवानगी कोण देणार आपण देणार सर, जर सोसायटीने ठरविले प्रत्येक सोसायटीमध्ये साहेबांनी सांगितल्याप्रमाणे गार्डन विकसित करायचे त्याला परवानगी लागेल ना.

**मा. आयुक्त :-**

गार्डन बनवायला परवानगी लागणार नाही. ऑलरेडी आर.जी. सोडूनच परवानगी दिलेली आहे. त्या प्लानमध्ये त्यांनी गार्डन दाखवलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महासभेसमोर विषय आहे. सार्वजनिक पद्धतीने त्याची चर्चा झाली पाहिजे. त्याच्याकरिता माझा विषय आहे.....

**मा. आयुक्त :-**

जर शंभर बिल्डींगमध्ये १५ टक्के आर.जी सोडले असेल तर त्या सर्व सोसायटीने फेडरेशन बनवून डेव्हलप करायचे आहे. ते मालक आहेत. सात बारावर त्यांचे नाव येणार.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, सार्वजनिक पद्धतीने या विषयाबद्दल मा. महासभेमध्ये चर्चा चाललेली आहे.....

**एस. ए. खान :-**

अतिक्रमण झाले असेल तर?

**मा. आयुक्त :-**

आम्ही काढून देउ खर म्हणजे त्यांचीच जबाबदारी आहे पण काढून देउ.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, एका गृहसंकुल संस्थेकडे आर.जी. ची जागा असेल आणि ती सोसायटीच्या बाहेर असेल. दहा बिल्डींग तयार केल्या आणि एक जागा आर.जी. ची, आपण शांतीनगर वसाहतीची चर्चा करतो. त्या अनुषंगाने बोलतो. बाजुला जागा असेल. आधी त्याने तयार करून हॅन्डओव्हर केले. म्हणजे त्याने गार्डन विकसित केले होते. पण ते मेंन्टेन झाले नाही.

**मा. आयुक्त :-**

सोसायटीच्या लोकांनी मेंन्टेन करायचे आणि पाच दहा रूपयांनी मेंन्टेनन्स वाढवायचा.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त साहेब, जिथे मेन्टेन करणे अशक्य असेल एका कुटूंबामध्ये चार लोकांचे एकत्र डोके चालत नाही. एवढे मोठ्या फेडरेशन आणि सोसायट्या कुठे चालतील. समजा तीच जागा सोसायट्यांनी महापालिकेला हस्तांतरीत केली......

**मा. आयुक्त :-**

आम्ही घेणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे साहेब, शहरामध्ये गार्डन विकसित झालेच नाही पाहिजेत. असे तुमचे म्हणणे आहे का?

**मा. आयुक्त :-**

आमचे असे म्हणणे नाही. डेव्हलपमेंट प्लानमध्ये जे गार्डनसाठी आरक्षण आहे ते विकास करण्याचे महापालिकेचे पहिले कर्तव्य आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, त्याच्यावर पुन्हा अतिक्रमण होणार.

**मा. आयुक्त :-**

आर.जी. डेव्हलपमेंट प्लानमध्ये जे आरक्षण केलेले ते डेव्हलप करण्याचे काम महापालिकेचे आहे. सोसायटीच्या लोकांसाठी गार्डन मेंन्टेन करून सोसायटीच्या लोकांनी विकासकाला गार्डन डेव्हलपमेंट करायचे सुद्धा पैसे दिलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तुमचे बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

त्या लोकांनी मेंन्टेन करायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

विकासकर्त्यांनी सोसायटींना हस्तांतर केले. आजच्या तारखेत त्याला सोसायटी सांभाळू शकले नाहीत, त्याला मेंन्टेन करू शकले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

सांभाळू शकले नाहीत हे चुकीचे आहे. त्यांना सांभाळायलाच पाहिजे. कारण विकासक पॅम्प्लेट काढतो की, इथे गार्डन असेल, इथे स्विमिंग टॅंक असेल, इथे कम्युनिटी सेंटर असेल आणि मग लोक येतात मग फ्लॅट खरेदी करतात.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय, इकडे सन्मा. सभागृहाची, सर्वांची तशीच इच्छा आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहाची इच्छा असूच शकत नाही. सन्मा. सभागृहाची इच्छा आरक्षण विकसीत करण्याची आहे. सोसायटीच्या विकासकाचे काम करावे अशी सन्मा. सभागृहाची इच्छा नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ती जागा महापालिकेला हस्तांतरीत झाली तर ती प्रॉपर्टी महापालिकेची होईल. उद्या त्याच्यावर आपण.....

**मा. आयुक्त :-**

कायद्याने ते होणार नाही. महापालिका विकासकाचे काम करू शकत नाही. कारण विकासकाने त्यामध्ये गार्डन डेव्हलपमेंट पण पैसे इन्क्लुड केलेले असतात. त्यांचे काम आम्ही कसे करणार?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तुम्ही कायद्याच्या दायऱ्यात बोलता.

**मा. आयुक्त :-**

कायद्याने ते घेउन महापालिकेला विकास करता येणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

कायदा सोडून करायला कोणी बोलत नाही. समजा सोसायटीनेच महापालिकेला हस्तांतर केले....

**मा. आयुक्त :-**

सोसायटीने कोणाला तरी सार्वजनिक संस्थेला द्यावे. आमच्याकडे देउ नये.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दुसरा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

लक्षवेधी.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, गेल्या मा. महासभेमध्ये ओपन ॲमेनिटी स्पेसचा विषय होता. त्याच्याबद्दल आपण एक....

**मा. महापौर :-**

ती मिटींग आपण उद्या किंवा परवा लावू या.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, महापालिका स्वतंत्र सार्वजनिक संस्था आहे ना?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, तुम्ही त्याच्याबद्दल एका आठवड्यात बोललेले.

**मा. महापौर :-**

मधल्या काळात मा. राष्ट्रपती साहेब येणार होते. मा. आयुक्त साहेब पण बिझी होते. एक दोन दिवसात ते करून घेउ.

**जुबेर इनामदार :-**

महापालिका स्वतंत्र सार्वजनिक संस्था.....

**मा. आयुक्त :-**

महापालिका संपुर्ण जे नागरिक आहेत, त्यांच्यासाठी आहे. सोसायटीचे डेव्हलपमेंट करायला महापालिका नाही.

**जुबेर इनामदार :-**

पण साहेब, याचा फायदा सार्वजनिक रितीनेच होणार आहे ना?

**मा. महापौर :-**

विषय संपलेला आहे.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेला तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सन्मा. सौ. प्रभात प्रकाश पाटील यांची आहे. दुसरी सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची आहे. तिसरी सन्मा. डॉ. श्री. राजेंद्र जैन यांची आलेली आहे. अनुक्रमे जी पहिली लक्षवेधी सन्मा. सौ. प्रभात प्रकाश पाटील यांची आलेली आहे ती मी वाचून दाखवतो.

**प्रति,**
**मा. नगरसचिव,**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- लक्षवेधी सादर करणे बाबत (रिलायन्स एनर्जीच्या भरमसाठ विज बिलाबाबत.)**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घरगुती वापरासाठी, औद्योगिक वापरासाठी तसेच शहरात दिवाबत्ती साठी आपण रिलायन्स एजन्सीची विज वापरत आहोत. गेल्या कित्येक महिन्यांपासून रिलायन्सने काहीना काही कारणे दाखवून भरमसाठी बीले पाठविली आहेत. आज शहरातील वनरुम किचन धारकाला दरमहा कमीत कमी ७०० ते ८०० रु. बील येते. त्यामुळे गोरगरीबांचे कंबरडेच मोडून गेले आहे. संपूर्ण शहरात नाक्यावर, गल्लीत बोळात, प्रवासात नागरीक ह्या बाबतीत नाराजीचा सूर आळवित असतात हे आपणास आणि तमाम लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासनस ज्ञातच आहे.

आपली महानगरपालिका दिवाबत्ती पोटी दरमहा ७० ते ८० लाख रु. रिलायन्सला भरते. त्यातच आठवड्यापूर्वी सर्व वीज कंपन्यांनी दरवाढ केलेली आहे. परंतु त्यातही रिलायन्सचे दर चढे आहेत. एकंदरच भरमसाठ बीलदराने नागरीक ग्रासला आहे. आणि महानगरपालिकेची तिजोरी खाली होत आहे.

सर्वोच्च न्यायलयाने जुलै २००८ साली दिलेल्या निवाड्यानुसार ग्राहकांना आपल्याला परवाडणाऱ्या वीज वितरण कंपनीकडून वीज घेण्याचा अधिकार आहे.

रिलायन्सच्या तुलनेत टाटाची वीज ही दुपट्टीपेक्षा कमी दरात ग्राहकांना उपलब्ध होऊ शकते. एका ग्राहकाने ग्राहक पंचायतीकडे तक्रार केलेल्या ग्राहकांना टाटाचा पर्याय निवडण्याचे आवाहन ग्राहक पंचायती तर्फे करण्यात आले आहे. ग्राहकांना त्यांच्या पसंतीची सेवा निवडण्याचा अधिकार असल्याचा निवाडा सर्वोच्च न्यायलयाने दिल्यामुळे टाटा पॉवरकडे आपण मागणी केल्यास ती वीज वितरण होउ शकते. वीत नियामक आयोगानेही वीज वितरणात स्पर्धा आणण्याची तरतूद केली आहे. त्यात टाटा पॉवरकडे पुरेसे इन्फ्रास्ट्रक्चर नसल्यास ती आयोगाच्या कायद्यानुसार रिलायन्सच्या इन्फ्रास्ट्रक्चरचा वापर करुन ग्राहकांना वीज देउ शकते.

वरील माहितीनुसार आपण एकमुखी तशी मागणी टाटाकडे केल्यास ह्या शहरातील नागरीकांना वीज बिलाचा खूपच दिलासा मिळेल व पालिकेचीही आर्थिक बचत होईल.

ह्या करीता सदरची लक्षवेधी सभागृहात चर्चेसाठी घ्यावी ही विनंती.

**आपली,**
**(प्रभात पाटील)**

दुसरी लक्षवेधी सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची आहे ती मी वाचून दाखवतो.

**प्रति,**
**मा. सचिव साहेब**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- “लक्षवेधी” सूचना विचारात घेणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका लेखापरिक्षक यांनी प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाचा संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल सादर केला पाहिजे. तसेच शासनाकडून झालेला लेखपरिक्षणाचा अहवाल त्याची केलेली पूर्तता व त्याबाबतची माहिती मुंबई महानगरपालिका अधिनियम अंतर्गत दिले पाहिजे. मागील ३ वर्षापासून सदरचे अहवाल दिले नाहीत.

तरी अधिनियमा अंतर्गत सदर बाबतीचे अहवाल न दिल्याने लेखापरिक्षकाने आपल्या कामात हलगर्जीपणा केला आहे. याबाबत महासभेत लक्षवेधी माध्यमाने चर्चा व्हावी.

**सूचक :- ओमप्रकाश अग्रवाल**
**अनुमोदक :- मदन उदितनारायण सिंह**

तिसरी लक्षवेधी सन्मा. सदस्य डॉ. श्री. राजेंद्र जैन यांची ई-गर्व्हनन्सच्या संदर्भात आहे.

**प्रति,**
**मा. नगरसचिव सो.,**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- ई-गव्हर्नन्स के संदर्भ में।**

महोदय,

आज दि. ०१/०७/२००९ के मा. महासभा में ई-गर्व्हनन्स पर जो १२ करोड का खर्च करनेका प्रस्ताव है उसका पुरी सफलता इस बात पर निर्भर करती है की, मिरा भाईंदर महानगरपालिका के करीब ३४ अलग-अलग विभाग अपनी सुचनायें नागरी सुविधा केंद्र को सही ढंग से दे पाते है या नहीं।

इसलिए यह मेरी सुचना है की, हर विभाग को यह निर्देश दिया जाय की वो एक सुची जारी करे जिसमें निम्न बिंदुओं का समावेश हो।

१. नागरी सुविधा केंद्र को डेटा भेजनेवाले स्थायी व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी शिक्षित कर्मचारी का नाम व पद।
२. नागरी सुविधा केंद्र को विभाग/अधिकारी की हर लिखित जानकारी दैनिक आधारपर भेजनेका निर्देश।
३. घ्ङ्क्ष्द्धत्द्रण्ङ्क्ष्द्धट्ठ क़्ङ्क्ष्द्रट्ठद्धद्यश्ङ्क्ष्दद्यट्ठ क़्ट्ठद्यट्ठ को नागरी नागरी सुविधा केंद्र में एक साल तक भेजनेका अभ्यास किया जय व इस एक साल में जो-जो कमीयाँ उजागर हो उस पर विचार कर कार्य किया जाय।
४. मेरी सुचना यह है की,
अ. महासभा में पास की गयी डी.पी.आर. की राशी का किस प्रकार खर्चा कब-कब किस-किस टेंडर द्वारा किया जायेगा इसकी लिखित सुचना दी जाय।
ब. इस टेंडर के द्वारा डी.पी.आर. में अपेक्षित टार्गेट प्राप्त हुआ या नहीं इसकी सुचना दी जाय।
क. टार्गेट प्राप्त न होने की स्थिती में टेंडर का भुगतान न किया जाय।

धन्यवाद!

**आपका,**

**(डॉ. राजेंद्र जैन)**

**मा. महापौर :-**

एकूण तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. सौ. प्रभात प्रकाश पाटील यांची पहिली लक्षवेधी स्विकारत आहे. बाकी दोन लक्षवेधी फेटाळत आहे. सौ. प्रभात पाटील यांची लक्षवेधी रिलायन्स एनर्जी बाबत आहे. दुसरी श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची लक्षवेधी ऑडीट रिपोर्टसाठी आहे आणि तिसरी श्री. राजेंद्र जैन यांची लक्षवेधी ई-गर्व्हनन्स च्या संदर्भात आहे. तरी ई-गर्व्हनन्स चा विषय येईल त्यावेळी चर्चा करावी. आणि ऑडीट रिपोर्ट श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना ताबडतोब देण्यात यावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, फक्त एक मिनिट घेतो. या लक्षवेधी मध्ये यापुर्वी १४/११/२००६.

**मा. महापौर :-**

कुठली लक्षवेधी?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच लक्षवेधीच्या अनुषंगाने.....

**मा. महापौर :-**

सौ. प्रभात पाटील यांची?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही.

**मा. महापौर :-**

ती लक्षवेधी आपण फेटाळलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी तुम्हाला फक्त आग्रह करतो. प्रशासनाला यापुर्वी १४/११/२००६ रोजी याच प्रकरणाची लक्षवेधी दिली होती. त्यावेळी मा. आयुक्तांनी पंधरा दिवसात अहवाल तयार करून आम्ही पुन्हा सभागृहात चर्चा करू. मा. महापौर महोदय यांनी सांगितलेले आहे.

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी आपल्याला ते दिले जाईल. सौ. प्रभातताई पाटील आपण बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण विचारलेल्या प्रश्नाशी....

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही कोणती लक्षवेधी स्विकारलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम तुमची स्विकारलेली आहे. म्हणजे तीन वर्षे झालेली आहेत....

**प्रफुल्ल पाटील :-**

कोणाची लक्षवेधी असेल तर इतर लोक बोलू शकत नाहीत. सभागृह नीट कामकाजानुसार चालवा नाहीतर मग सगळ्या विषयात गोंधळ घालीन. मग मी प्रत्येक विषयात उठून बोलेन. सभागृहाचे कामकाज नीट चालवा.

**मा. महापौर :-**

सौ. प्रभात ताई पाटील तुम्ही बोला.

**प्रभात पाटील :-**

माझी लक्षवेधी आपण वाचली आहे. मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब आणि माझ्या सर्व नगरसेवकांना मी सांगू इच्छिते की, ह्या शहराचा एक नगरसेवक म्हणून आपण गेल्या कित्येक महिन्यापासुन आपण नागरिकांच्या तक्रारी ऐकत असाल की, रिलायन्सची बिले ही प्रत्येक ग्राहकाला अगदी घरगुती वापरापासुन इतकी भरमसाठ येत आहेत. आणि ही लक्षवेधी इथे आणण्याचे एक कारण म्हणजे आपणसुद्धा आपल्या मिरा भाईंदर पालिकेमध्ये रिलायन्सची वीज वापरतो. मी जेव्हा माहिती काढली तेव्हा दरमहा आपण ७० ते ८० लाखावर रिलायन्सला बिल भरतो. गेल्या कित्येक महिन्यापासुन मुंबई शहरामध्ये या विषयावर आंदोलन होत आहेत. आपल्याकडे पण मला असे वाटते की, कुठेतरी आंदोलने झाली असतील. मला माहिती नाही. परंतु, मला ही लक्षवेधी आपल्याकडे आणण्याचे एकच प्रोव्हीजन आहे की, सर्वसाधारण माणूस वन रूम किचनमध्ये राहतो. एक फ्रिज, एक टी.व्ही. आणि घरामध्ये दोन ट्युब काय असतील ते. परंतु, तो माणूस सुद्धा सातशे ते आठशे रूपये बिल भरतो. ज्या माणसाला आपला घरखर्च कसा चालवावा ही भ्रांत आजच्या काळामध्ये पडलेली आहे. अशा वेळेला आपण मिरा भाईंदरमध्ये जो सत्तर ते ऐंशी लाखाचा भुर्दंड आपल्याला पडतो. हासुद्धा आपल्यावरच पडतो आहे. कारण हे सगळे पैसे आपल्या करामधून आपण त्यांना भरत आहोत. आणि म्हणून माझे हे प्रयोजन आहे की, मिरा भाईंदरच्या माध्यमातुन आपण हा प्रश्न सोडवला पाहिजे. कारण इथे आपल्या संपुर्ण शहराचे प्रतिनिधीत्व करणारे प्रतिनिधी आहेत. मला मिळालेल्या माहितीनुसार जुलै २००८ मध्ये सर्वोच्य न्यायालयाने एक निवाडा दिला की, प्रत्येक ग्राहकाला आपल्या पसंतीची विज कंपनी निवडण्याचा अधिकार आहे. जर रिलायन्सचे भूत आपल्या मानगुटीवर इतके घट्ट बसत असेल आणि आपल्याभोवती त्यांनी जर फास आवळायला घेतला असेल, म्हणजे महापालिकेच्या आणि सर्वसामान्य नागरिकांच्याही तर ते भुत आपण का बसवून घ्यायचे? मी आपल्याला काही प्रमाणामध्ये त्यांची वाढ कशी आहे ते बघा. १०० युनिटला टाटा एक रूपया तीस पैसे वीज बिल आकारते. रिलायन्स १०० युनिटला २ रूपये ९६ पैसे घेते. म्हणजे दुप्पटीपेक्षा जास्त आहे. तर बेस्ट १ रूपया ८० पैसे घेते. म्हणजे टाटापेक्षा जास्तच आहे. ३०० युनिटला टाटा २ रूपये ७० पैसे घेते. तर रिलायन्स ५ रूपये ५६ पैसे घेते आणि बेस्ट ३ रूपये ७० पैसे घेते. हा तुलनात्मक तक्ता पुढे भरपुर आहे. मी तुम्हाला फक्त दोन वाचून दाखवले. तुम्हाला पाहिजे तर मी ते देउ शकते. याचाच अर्थ असा की, रिलायन्स आपल्याकडून दुपटीपेक्षा जास्त पैसा आकारते. २००३ मध्ये रिलायन्सने किती नफा कमवला आहे ते बघा. २००३ मध्ये १८७ करोड. २००४ मध्ये ३६७ कोटी, २००५ मध्ये ५२० कोटी, २००६ मध्ये ६५० कोटी, २००७ मध्ये १०८ कोटी आणि २००८ मध्ये १०८५ कोटी एवढा नफा कोणाकडून जातो. आपण भरतो. आणि म्हणून हे सगळे तुलनात्मक तक्ते आणि विशेष म्हणजे ग्राहक पंचायत आहे. या ग्राहक पंचायतीने तर सरळ सरळ आपल्याला असे म्हटलेले आहे की, तुम्ही जर एकमुखाने मागणी केली तर कोणत्याही कंपन्यांना किंवा पंधरा सोसायट्या दहा सोसायट्या जरी एखाद्या टाटाला किंवा त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही वीज कंपनीला ॲप्रोच झाल्या तर त्या कंपनीला त्या पंधरा सोसायट्यांना सुद्धा, दहा सोसायट्यांनासुद्धा वीज पुरवठा करणे हे त्या कंपनीवर बंधनकारक आहे. आणि ती सुद्धा त्यांनी एका महिन्याच्या आत त्यांना प्रोव्हाईड

करून दिली पाहिजे. असे त्यांच्यावर निर्बंधसुद्धा आहेत. म्हणजे सर्वोच्च्य न्यायालय हे पुर्णपणे आणि ग्राहक पंचायतीच्या म्हणण्यानुसार पुर्णतः ग्राहकांच्या बाजुने असताना आपण हा भार का सोसायचा? मला असे वाटते की, सगळ्यांची या विषयाला संमती असेल पहिल्यांदा आपण महापालिकेकडूनच हा प्रस्ताव पाठवावा. साहेब, दुसरी गोष्ट, माझे तुम्हाला असे म्हणणे आहे की, आपण फार कणखर अधिकारी म्हणून या शहरात प्रसिद्ध आहात आत्ता मी तुमच्यावर आक्षेप किंवा आरोप वगैरे काही करत नाही. परंतु आपण गेल्यानंतर, आपला रेकॉर्ड पूर्वीपासून आहे. संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये पूर्ण पुर्व, पश्चिम कोणत्याही भागात मिरा रोडमध्ये जा. प्रत्येक सोसायटीच्या आर.जी. जागांचा प्रश्न आत्ता आला होता ना? रिलायन्स एनर्जीने प्रत्येक आर.जी. फिल्डमध्ये मोठे मोठे सबस्टेशन बांधले त्याची परवानगी पालिकेकडे घेतली होती का? घेतलेली नाही. जर इलिगल बांधकाम असेल, आपण आपली बंदीस्त गॅलेरी करतो तीसुद्धा त्याच्यावर तुम्ही कर आकारणी करता किंवा अनधिकृत बांधकाम असेल तर आपले लोक तोडायला जातात. या बांधकामाचे तुम्ही काय केले? ठिक आहे, काही केले नाही. त्याच्यावर कर आकारणी झाली? आत्ता आपण लोकांना शास्ती लावली या रिलायन्सला आपण का पोसतो? यांची एवढी प्रॉपर्टी या शहरामध्ये तयार झाली याचा आपण कधी विचार केला का? मला वाटते या मताशी आपण सगळेजण सहमत असाल. दुसरी गोष्ट अशी की, आपण करोडो रूपये देउन रस्ते तयार करतो. दुसऱ्याच दिवशी येउन रिलायन्स तोडते. मग आपण तिथे पॅच करतो. तिसऱ्या दिवशी आणखीन जाउन पुढे ते खोदतात. आपण तिथे पण पॅच करतो. आपण एखाद्या शर्टला किती वेळा पॅच करू? एकदा करू. चला ठिक आहे, घातले. आपण महागडे शर्ट घेतले आहे. म्हणून घातले. दुसऱ्यांदा रफु करून घातले. तिसऱ्यांदा, चौथ्यांदा जेव्हा होईल तेव्हा महागडे शर्ट असेल तरी म्हणाल की, हे बरोबर दिसत नाही. आपण ते टाकून देणार करोडो रूपये खर्च केलेले रस्ते फेकून देणार का? त्यांच्याकडून आपण किती पैसे वसुल करतो. हे सगळे मुद्दे विचारात घेता रिलायन्स या शहरामध्ये नको असा मुद्दा मी इथे ठामपणे मांडत आहे. आणि लवकरात लवकर तुम्ही या शहरामध्ये टाटाला आमंत्रित करा. या शहरामध्ये टाटाची वीज आली पाहिजे असा ठराव मी मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे. मॅडम तुम्ही आणखीन एक सांगायचे विसरलात. आत्ता आपल्याकडे जे मीटर आहेत ते चायनाचे मीटर लावलेले आहेत आणि ते मीटर इतके फास्ट चालतात की, त्यांची ॲडजेस्टमेंट असते. आता जे जुने मीटर होते ते काढायचे असतील ते त्या मालकाला आपण पैसे देतो. आणि ते मीटर जर काढायचे असले तर आपल्याला नोटीस द्यायला पाहीजे ही कल्पना कदाचीत कोणाला नसेल या सभागहामध्ये किंवा इतर नागरिकांना सुध्दा त्याची कल्पना नसेल त्यांनी आपल्याला रितसर नोटीस द्यायची असते की, हे आमचे मीटर आहे, तर आम्ही तुमचे मीटर बदलु की नाही ? आपल्या त्याला मान्यता नसेल तर ते मीटर बदली करत नाहीत. मी त्यांना मीटर बदली करु दिलेले नाही. आजसुध्दा माझे जेवढे सगळे जुने मीटर आहेत. आणि ते हात लावू शकत नाहीत. आणि जे नवीन मीटर आहेत ते चायनाचे आहेत तर तुम्ही जर त्यांच्यावर ऑब्जेक्शन घेतले तर तुमचे जुने मीटर त्यांना नंबर दिले तर ते तुम्हाला जुने लावून देतील आणि जे जुने मीटर आहे ते व्यवस्थित चालते आणि नवीन मीटरचे बील जास्त येते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. नगरसेविका सौ. प्रभात पाटील यांनी जी लक्षवेधी मांडली. त्याच्या पृष्ठवर्थ मी काही गोष्टी या ठिकाणी मांडतो. सुप्रिम कोर्टमध्ये सिव्हिल ॲप्लीकेशन नंबर ३५१०, ३५११/२००८ टाटा पावर कंपनी वर्सेस रिलायन्स एनर्जी लि. ॲन्ड अदर. दुसरे सिव्हील अपिल नंबर ४२६९/२००८, टाटा पावर कंपनी वर्सेस महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी रेग्युलेशन कमिशन. तिसरे सिव्हील अपिल नं. ३५९३/२००८, म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई, बेस्ट अंडरटेकींग म्हणजे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सुद्धा त्यांच्या विरोधात कोर्टमध्ये गेलेली आहे. वर्सेस रिलायन्स एनर्जी लि. सिव्हील अपिल नं. ६०९८/२००८, म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेट मुंबई बेस्ट अंडरटेकींग वर्सेस महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी रेग्युलेशन कमिशन सिव्हील अपिल नं. ६०९९/२००८, महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई बेस्ट अंडरटेकींग वर्सेस महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी रेग्युलेशन कमिशन ॲन्ड अदर्स. ७२ पानांचे हे जजमेंट सुप्रिम कोर्टाने दिलेले आहे. त्याच्यानंतर दुसरे एक सिव्हील ॲप्लीकेशन २८४६/२००६, महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी रेग्युलरिटी कमिशन वर्सेस रिलायन्स एनर्जी लि. या दोन जजमेंटच्या कॉपी सादर करत आहे. आपण एक लक्षात घेतले पाहिजे की, रिलायन्स एनर्जी ह्या दोन जनरेटर साईट आणि डीस्ट्रीब्युशन साईट. ह्या दोन साईट त्यांच्याकडे आहेत. पण त्यांची जनरेटर साईट कमिशन म्हणजे जनरेशनला त्यांच्याकडे पावर जनरेशन कमी होते. त्यामुळे रिलायन्स एनर्जी स्वतःच टाटा पावरकडून पावर घेते. म्हणजे आपण एखाद्या होलसेलरकडून वस्तु विकत घेणे आणि रिटेलरकडून वस्तु विकत घेणे ह्याच्यामध्ये बरीचशी तफावत आहे. आत्ता प्रश्न असा निर्माण झाला की, एखाद्या मोठ्या कंपनीने एखाद्या एरियामध्ये एजन्सी दिली की, तो एजन्ट काय करतो की, गिऱ्हाईकाला पॅकींगचे पण पैसे मारतो. कारण तो दुसरा एजन्ट नेमु शकत नाही. याची मोनोपोली अशाप्रकारे रिलायन्स एनर्जीने निर्माण केली की, आमच्या शिवाय दुसरे कोणी विज वितरण करू शकत नाही. आणि म्हणून आम्हालाच विज वितरीत करण्याचे अधिकार असल्यामुळे आम्ही वाटेल ते चार्जेस लावू. आणि अशा पद्धतीने रिलायन्सचा हा जो कारभार चाललेला आहे. टाटा पावर कंपनीला जनरेशन आणि डिस्ट्रीब्युशन हे दोन्हीच्या परवानग्या होत्या. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिका

क्षेत्रामध्ये त्यावेळी त्यांनी मागणी केली नव्हती. जेव्हा महानगरपालिका क्षेत्रात मागणी केली तेव्हा महानगरपालिकेने साधारण एक कोटी सोळा लाख अडतीस हजार नउशे चौ-याऐंशी रस्ता खोदाई व पंधरा लाख सत्तेचाळीस हजार दोनशे ऐंशी परवाना शुल्क आकारून टाटा पावरला फक्त घोडबंदर, मिरा रोड पुर्व, पेणकर पाडा, भाईंदर (प.), कनकिया परिसर, इथे भाईंदर पुर्व हा गाळलेला आहे. त्याच्यामुळे टाटा पावर कंपनीने भाईंदर पुर्वेला, आत्ता आम्ही काही ठिकाणी टाटा पावरची मागणी केली. तर टाटा पावर त्याठिकाणी येउ शकत नाही. आत्ता सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील मॅडम यांनी जो ग्राहक पंचायतीचा निर्णय सांगितला तेव्हा तो एखाद्याने ग्राहक पंचायतीला प्रश्न विचारला की, आम्ही असे करू शकतो का? आमच्याकडे ऑलरेडी रिलायन्स एनर्जीचा सप्लाय आहे. पण आम्हाला ती महाग पडत असल्यामुळे आम्ही टाटा घेउ शकतो का? तर या सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाचा हवाला देउन त्यांनी सांगितले की, तुम्ही घेउ शकता. म्हणजे हा विषय इथे मा. महासभेला आणण्याचा विषय त्याच्यामागे एकच असे उद्दीष्ट आहे की, एकदा महानगरपालिकेने जर आपल्यापासुन सुरूवात केली. तर लोकांना पण त्याची खात्री पटेल. मगाशी सबस्टेशनचा दुसरा एक विषय असा आला की, वाटेल त्या ठिकाणी सबस्टेशन बांधले जाते. ते इलिगल असते, लिगल असते. आत्ता तुम्ही एखाद्या बिल्डरला कॉम्प्लेक्स बांधायची परवानगी दिली की, त्याच्यामध्ये रिलायन्सवाले काय करतात. पुर्वी २००० मीटर किंवा त्याच्यापेक्षा जास्तीचे बांधकाम जर करायचे असेल तर ते सबस्टेशनसाठी जागा मागायचे. आत्ता ५०० मिटरपेक्षा कमी जरी जागा असली तरी त्यांना सबस्टेशनला जागा द्या. आणि ती जागा किती द्यायची तर ती जागा ८ मीटर बाय ६ मीटर म्हणजे एवढ्याशा बिल्डींगला एवढे मोठे सबस्टेशन बाधंण्याच्या मागे त्यांचा हेतु काय आहे? तर ते आजुबाजुला सुद्धा त्याच सबस्टेशनमधून सप्लाय करणार. आणि त्यांना सगळ्यांना केबलचे पैसे लावणार. आत्ता प्रश्न तो नाही. प्रश्न हा आहे की, जेव्हा सबस्टेशन बांधले जाते पुर्वी रिलायन्स एनर्जी जे ॲग्रीमेंट करत होती. त्या ॲग्रीमेंटचा ड्राफ्ट आपल्याकडे कदाचित असेल तो तुम्ही वाचा. आत्ताचा त्यांचा ड्राफ्ट जर तुम्ही वाचला तर तुमच्या असे लक्षात येईल की, त्यांनी सबस्टेशनला जी जागा मागितली आहे ती फक्त डिस्ट्रीब्युशन म्हणजे वीज वितरणासाठीच ते सबस्टेशनची जागा वापरणार आहे असे नाही. ते कुठल्याही कामासाठी, कुठल्याही उद्योगासाठी ती सबस्टेशनची जागा वापरतील. म्हणजे आत्ता त्यांचे जे मोठे मोठे मॉल लागले आहेत, रिलायन्स फ्रेश, फळे वगैरे विकायला लागलेले ओत. उद्या बेडूकपण काढतील आणि विकतील. त्यांचा काही भरोसा नाही. म्हणजे जी कामे गोरगरीब करतात तीपण कामे ती करील आणि त्याच्यासाठी त्यांना काय आहे, गल्लो गल्ली जशी किराणा मालाची दुकाने असतात तीच सबस्टेशन ते उद्या किराणा मालाची दुकाने वापरायला वापरणार आहेत. कारण बिल्डरकडून किवां जागा मालकाकडून ते तशाप्रकारची ॲग्रीमेंटच करून घेतात. दे मस्ट कॅरी एनी ॲक्टीवीटी. म्हणजे रिलायन्स उद्या कुठली ॲक्टीवीटी करेल. माझे तरी तुर्त असे म्हणणे आहे की, आत्ता ज्या ज्या ठिकाणी रिलायन्सचे सबस्टेशन आहेत, ती रिलायन्सच्या मालकीची आहेत. भले त्यांनी बिल्डरकडून एक रूपया लिजने घेतली असेल किंवा फ्रि घेतली असेल. पण ते स्ट्रक्चर रिलायन्सचे आहे. त्याला पुर्व लक्षी प्रभावाने कमर्शिअल रेट लावा. कमर्शिअल रेटने आपण घरपट्टी टॅक्स आकारावा. त्यांना शास्ती लावा. जेणेकरून ते थोडे खिळखिळे होतील आणि टाटा पॉवरलासुद्धा मध्ये यायला थोडा रस्ता सुरळीत होईल. म्हणून मॅडमनी आणलेला हा जो विषय आहे. तो अतिशय चांगला विषय आहे. याला सभागृहामध्ये सगळ्याच लोकांनी समर्थन दिले आहे. साहेब, आपल्यापासुन सुरूवात करा. म्हणजे इतर लोकांना थोडासा धीर येईल. म्हणजे इतर सोसायटीसुद्धा मग टाटा पावरची सप्लाय मागतील.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. नगरसेविका सौ. प्रभातताई पाटील यांचे मी मनापासुन आभार मानतो. कारण अतिशय ज्वलंत विषयाला त्यांनी हाज सभागृहामध्ये वाचा फोडलेली आहे. रिलायन्स एनर्जीचे जे दरवाढ आहेत. त्याच्यासाठी शिवसेना अनेक वर्षे आंदोलन करते आहे. गेल्या एक आठवड्यापुर्वी जे कलेक्शन सेंटर आहेत ते आम्ही बंद केले होते. कारण जी बिलाची दरवाढ आहे ती एवढी प्रचंड आहे की, सर्व सामान्य माणूस ते बिल भरूच शकत नाही. अशी परिस्थिती आहे. तर माझी आज सभागृहाला विनंती आहे की, शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री. उद्धवजी ठाकरे यांनी देखील अवाहन केलेले आहे की, बिलेच भरायची नाहीत आणि याची दखल महाराष्ट्र शासनाने देखील घेतली होती. त्यांनी वीज नियामक आयोगाला एक निर्देश दिले होते की, ही जी बिलांची दरवाढ आहे त्याची पुन्हा चौकशी करा आणि तोपर्यंत ग्राहकांना सुचना केलेल्या होत्या की, आपण लाईटची बिले भरायची नाहीत. मी आज सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, आपण देखील आपआपल्या विभागातील लोकांना आवाहन करा की, विज बिले भरूच नका. जी अन्यायकारक दरवाढ झालेली आहे. कारण शेवटी, लाथो के भुत बातो से मानते नही. त्यांना असाच झटका दिल्याशिवाय रिलायन्स जागेवर येणार नाही. टाटाची पावर यायला कदाचित वेळ लागेल. पण तोपर्यंत जी दरवाढ आहे. ती तरी कमीत कमी मर्यादीत राहिली पाहिजे. हा आमच्या आंदोलनाचा उद्देश होता.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, या ठिकाणी जी लक्षवेधी मांडलेली आहे की, विद्यूत पुरवठ्याची भरमसाठ बिले घेतली जातात. आणि रिलायन्स एनर्जी इथून हटवावी की काय? या संदर्भात सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील

साहेबांनी जे सांगितले की, जे बिल्डर्स वगैरे असतात. त्यांच्याकडून ॲग्रीमेंट करून घेतली जातात. आणि शंभर रूपये वर्षाचे भाडे, असे त्यांनाच लावले जाते. आणि जे ॲग्रीमेंट करतात त्या सबस्टेशनची परवानगी आपल्याकडे घेतली जात नाही. तर आपल्याकडे परवानगी घेत नाहीत तर ती सबस्टेशन बांधायला देउ नयेत. आणि जर परवानगी द्यायची असेल तर त्याच्याकडून लिहून घ्या की, इथे फक्त विद्युत पुरवठाच करता येईल. बाकी काही करता येणार नाही. आणि त्या सबस्टेशनला टॅक्स लावा म्हणून मी पत्र दिले होते. त्यातील काही सबस्टेशनला टॅक्स लागलेला आहे असे लेखी उत्तर मला टॅक्स विभागाकडून आले. बाकीच्या बऱ्याच सबस्टेशनला कर लावलेला नाही. तोही कर लावून घ्यावा आणि त्यावेळेला साहेब, मी तुम्हाला एक पत्र दिले होते की, टाटा एनर्जीच्या पदाधिकाऱ्यांना बोलवून आपण मिटींग आयोजित करा. त्याप्रकारे आपण आयोजित केली असे मला कळते. त्याचे पुढे काय झाले? या लक्षवेधीच्या निमित्ताने आपण टाटा एनर्जीचे पदाधिकारी आपल्याशी काय बोलले? कारण त्या मिटींगला मला बोलवले नव्हते म्हणून मी आत्ता विचारतो की, काय चर्चा झाली ती तुम्ही सभागृहाला सांगावी आणि दुसरी गोष्ट, साहेब, मा. महापौर म्हणून लक्षवेधी फेटाळण्याचा तुमचा अधिकार आहे. हे सर्व जरी बरोबर असले तरी सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची जी लक्षवेधी मांडली की, जो अहवाल प्रशासनाने सभागृहाला द्यायला पाहिजे होता. तो गेले तीन वर्षे दिला नाही. त्याबद्दल लक्षवेधी जरी फेटाळली तरी तुम्ही....

**मा. महापौर :-**

ऑलरेडी द्यायला सांगितले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

पण साहेब, तुम्ही फक्त सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना द्यायला सांगितले.

**मा. महापौर :-**

सर्वांना द्या.

**प्रकाश दुबोले :-**

आम्हाला देउन उपयोग नाही. सभागृहात मांडा. आम्हाला चर्चा करू द्या. त्यामध्ये अधिकाऱ्यांचे काय दोष आहेत आणि चुकीचे काम का करतात. त्यामध्ये बऱ्याच अधिकाऱ्यांकडून पैसे वसुली लावलेली आहे. ती वसुली झाली की, नाही. तेही आम्हाला कळायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**अरूण कदम :-**

रिलायन्सच्या बाबतीत सन्मा. सौ. प्रभातताई पाटील यांनी जो विषय मांडला आणि सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील साहेब यांनी त्याबद्दल जी विस्तृत चर्चा केली हे जरी कितीही चांगल्या विषयाला सभागृहात तोंड फुटले आहे आणि सन्मा. श्री. प्रशांत पालांडे यांनी सांगितले की, विजेची बिले नाही भरली पाहिजेत. तर मी सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, प्रत्येकाकडे विज बिलाबाबत लोकांच्या तक्रारी येतात. तर सगळ्यांनी एकत्र येउन जसे विज बिले नाही भरली पाहिजेत. तर हे जे शिवसेनेचे आंदोलन केले आहे ते आंदोलन मिरा भाईंदरमध्ये सार्वत्रिक एकत्र येउन केले तर शहरातर्फे तो एक चांगला पायंडा पडला जाईल. सभागृहात पक्ष आहेत तसेच इतर पक्षही बाहेर आहेत. त्या सगळ्यांना एकत्र घेउन, सामाजिक संस्थांना एकत्र घेउन लोकांना एकत्र घेउन हा विषय जर आपण मांडला तर तो प्रभावीपणे मांडला जाईल आणि त्यातुन काहीतरी निष्पन्न निघेल. अशी मी सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, रिलायन्स एनर्जीने मध्ये इंटरनेटची की कसली तरी लाईन टाकायला जे पोल टाकले. त्याची सुद्धा परवानगी घेतली नाही. त्याचे पत्र मी दिले त्याचे उत्तरसुद्धा नाही आणि त्याच्यावर कारवाईसुद्धा नाही. तर का होत नाही. रिलायन्स हा लोकांचे रक्त शोषण करायलाच इथे आलेला आहे आणि तेच करत राहणार आहे. म्हणून त्याला इथून हद्दपार करा. त्याचे काही ठेवू नका.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, या रिलायन्स एनर्जीबाबत डी.सी. रूल्समध्ये आपण काही प्रोव्हीजन केलेल्या आहेत. ते लोक सगळीकडे सबस्टेशनची मागणी करतात. प्लॉट लहान असला तरीही माझ्याकडून दोन ठिकाणी त्यांनी पहिल्या परमिशनसाठी एक छोटेसे मीटर लावण्याकरिता त्यांना आपल्याला २० बाय २० चे सबस्टेशनचे ॲफिडेव्हीट द्यावे लागते आणि ती प्रोव्हीजन आपण मागच्या वेळेला डी.सी. रूल्समध्ये केलेली आहे. आपण ती कमी करून त्यांना तो अधिकार देउ नये. कारण छोटा शेतकरी त्याला एक शेतघर बांधायचे असेल तरी त्याला मग डी.सी. रूल नुसार २० बाय २० चे पॉवर स्टेशन द्यावे लागते आणि ती त्याची प्रॉपर्टी आहे. मुंबईमध्ये तळमजल्यावर त्यांनी मोकळे ठेवले वर सबस्टेशन घेतले आणि खाली शॉप काढले आहेत. म्हणजे छोट्या मीटरकरिता रिलायन्स कंपनीला २० बाय २० ची जागा द्यावी लागणार आणि ते डी.सी. रूलमध्ये प्रोव्हीजन केले आहे. ते रद्द करावे अशी माझी सुचना आहे.

**जयंत पाटील :-**

आजच्या ह्या विषयावर, लक्षवेधीवर सन्मा. सौ. प्रभातताई पाटील यांनी अतिशय चांगल्या तऱ्हेने विषय आणलेला आहे. सर्व सभागृहाचे या विषयावर एकमत आहे. म्हणून मी अपेक्षा करतो की, प्रशासनाची याबद्दल काय भुमिका असेल? महापालिकेची सुद्धा खुप मोठी अमाउंट वीज बिलावर जाते. ज्या ज्या ठिकाणी आपली वीज आहे ती सगळी रिलायन्सची असावी. त्याच्यामुळे महापालिकेचा त्याच्यात निश्चित फायदा होईल आणि राज्य शासनाने सुद्धा या गोष्टीची नोंद घेतलेली आहे. मधल्या काळामध्ये ज्या ज्या पक्षाने आंदोलने केली त्याची नोंद राज्य सरकारने घेतलेली आहे. राज्य सरकारसुद्धा रिलायन्सच्या विजेच्या या दरवाढीच्या विरोधात आहे.याची आपण नोद घ्या. आणि जाता जाता मी एवढेच सांगेन की, आपण जर आपल्याकडे येणाऱ्या वीज बिलाचे निरिक्षण केले तर त्याच्या पाठीमागे त्यांची अशी एक सुचना आहे की, विजेची चोरी जर बाजूवाला करत असेल तर त्याची भरपाई आपल्याकडून घ्यावी असे त्या बिलावर लिहिलेले आहे. म्हणजे माझ्या शेजारच्या घरामध्ये चोरी झाली तर ते पैसे मी भरायचे हा विचित्र प्रकार आहे. म्हणजे त्यांच्या होणाऱ्या चोऱ्यांची खबरेगीरी आम्ही करायची? हे सुद्धा त्यांचे अतिशय चुकीचे प्रकरण आहे. आपण सर्वांचे मत सन्मा. सौ. प्रभातताई पाटील यांनी आणलेल्या लक्षवेधीवर आहे आणि आम्ही सर्व राष्ट्रवादीचे नगरसेवक त्यांच्या सोबत आहोत.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, आत्ता सर्व सदस्यांचे वक्तव्य आपण ऐकले आणि रिलायन्समुळे त्रस्त झालेली सगळी सर्वसाधारण जनता तर रिलायन्सची हकालपट्टी कशी काय होईल त्याची प्रोसिजर आपण लवकरात लवकर सुरू करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, एक सुप्रिम कोर्ट का ऑर्डर आया था। त्या सुप्रिम कोर्ट ऑर्डरमध्ये जर कोणी आपल्या घरामध्ये व्यावसायिक काम करत असेल तर त्याला रेसिडेन्शीअल म्हणून मोजावे असा आदेश आहे. आत्ता काही ॲडव्होकेट आपल्या घरी कम्प्युटर ठेवतात, आपली पुस्तके ठेवतात, वाचन करतात. असे ॲडव्होकेट, चार्टड अकाउंन्टट अशा सारख्यांना तुम्ही घरी प्रोफेशन करता, म्हणजे तुमच्या व्यवसायाचे कामकाज करता म्हणून त्याच्यावर दहा दहा पटीने इलेक्ट्रीक बिल पाठवलेले आहे आणि मागील पंधरा वर्षाची थकबाकी काढून त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत. अशी रिलायन्सची दादागिरी या शहरामध्ये चालली आहे. याच्यावर तुम्ही लक्ष द्या. ते स्वतः कमर्शिअल काय करतात ते काही नाही. आणि कोणी वापरले ही. तर मा. हायकोर्टाची ऑर्डर आहे. मा. सुप्रिम कोर्टाची ऑर्डर आहे की, कोणीही असा व्यावसायिक आपल्या घरात काम करत असेल तर त्याला रेसिडेन्शीअल म्हणून मोजावे. आणि अशा लोकांना त्यांनी लाखो रूपये भरा म्हणून नोटीस दिलेली आहे आणि ते सांगतात की, चाळीस हजाराची नोटीस दिलेली आहे. तर वीस हजार नाही, पुर्ण चाळीस हजार घेणार आहेत. आत्ता या एक दोन लोकांना सुप्रिम कोर्टाची कॉपी दिलेली आहे. पण तुम्ही याचेही लक्ष ठेवा, तो कुठेही कमर्शिअल, काहीही सबस्टेशन बांधतो त्याला चालते. महापालिकेला काही मिळत नाही. तरी तुम्ही याचा पण विचार करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सौ. प्रभात ताई पाटील यांच्या लक्षवेधीने पुर्ण लक्ष वेधलेले आहे. मा. आयुक्त साहेब, तीन महत्वाचे मुद्दे आहेत. त्याच्यात काही पालिकेचा रोल आहे, काही खाजगी रोल आहे. सौ. प्रभातताई पाटील यांनी जो महत्वाचा प्रश्न उपस्थित केला की, आपण सर्वात मोठे क्लाईंट आहोत. साधारण आपण एक करोड म्हणजे वर्षाला बारा करोड रूपये आपण भरतो. तर नक्कीच ही सुरूवात आपल्याकडून झाली पाहिजे. सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले की, लोकांमध्ये गैरसमज आहे की, आपल्याला देतील की नाही. जर आपण तो पायंडा पाडला, आपण विज घेतली. तर बाकी लोक पण इंडस्ट्रीवाले आहेत, दुसरे लोक आहेत इकडून आपली सुरूवात होईल. तर यासाठी आपण ताबडतोब, तर त्यांचा एक विशेष प्रॉब्लेम असा होता, ज्यावेही माझ्या स्कुलसाठी मी चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, साहेब, तुम्हाला द्यायला आम्ही दिड वर्ष लागेल. आपण जे कनकिया बोललात ती सिनेमॅक्सला टाटा पॉवर आहे. जी.सी.सी. ला टाटा पॉवर आहे. तर सिनेमॅक्सपासुन आमच्या स्कुलपर्यंत त्यांनी दिड वर्षे वेळ मागितली होती. तर अशी एखाद्या वेळी त्यांना सबस्टेशनसाठी जागेची गरज असेल तर त्याचा आपल्या महापालिकेतर्फे काही विचार करता येईल तीही जागा आपण त्यांना देउ. जेणेकरून पुर्ण शहराला फायदा होईल. आणि महापालिकेला सुद्धा फायदा होईल. जागेच्या बदली आपल्याला इलेक्ट्रीक बिलामध्ये कम्पेंन्सेट करत असेल तर आपल्याला तशी जागा द्यायला हरकत नाही. त्याच्याकडे जागा नसेल तर त्याला आपण बोलवावे. आणि ज्या ज्या ठिकणी टाटा पॉवर सध्या जागेवर आहे जसे कनकिया झाले, हटकेश झाले, त्याठिकाणी तरी आपण आपले स्ट्रीट लाईट पोल सुरूवात करावी. एकाच दिवसामध्ये पुर्ण पोल चालू करता येणार नाहीत. पार्टली जेवढे करता येतील तेवढे दुसऱ्या पानात त्यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला आहे. एखादा शर्ट आपण घेतो. आणि रिपेअरींगचे पैसे देतो. तसेच आपण एखादा शर्ट समजा आपण एक हजार रूपयाला घेतो किंवा एक करोड रूपयाला घेतो. तसा रस्ता आपण एक करोडला तयार करतो. त्यासाठी आपल्याला रिपेअरिंगसाठी दोन दोन लाख रूपये घेतो. त्याला एक दिवस तसा फेकावा लागतो. तो रोड आपणाला पुर्ण करावा लागतो. म्हणजे रिपेअरिंगचे पैसे आपणाला येतात पण तो रोड पुर्ण आपल्याला नवीन करायला लागतो. पण ते एक करोड रूपये येत नाही. आयुक्त साहेब, रिपेअरिंगचे

पैसे एक बार आपण रिपेअर करणार दोन बार रिपेअरिंग करणार रिपेअरींगचे पैसे शेवटी दहा दहा बार तो रोड आपल्याला नवीन बांधायला लागतो. तो कॉम्पॉन्स होत नाही. रिपेअरिंगचे पैसे घेतो. पण दहा बार रिपेअर झाल्यानंतर तो नवीन करायला लागतो पण त्याच्यामध्ये आपल्याला दर वाढवता येईल का नियमात राहून म्हणजे एखाद्या रस्त्याचे नुकसान भरपाई त्यांनी कशी करावी आणि आपल्याकडे गलिच्छ रस्ते असु द्या, कच्ची असु द्या, पक्की असु द्या. आपण एकच रेट लावतो. मग काही ठिकाणी चांगले सिमेंट बाउंडींग करून रस्ते केलेले आहे. त्याच्यामध्ये रेटमध्ये बदल झाला पाहिजे. दुसरा महत्वाचा मुद्दा अरूण कदम साहेबांनी सांगितला हे खर म्हणजे सभागृहाच्या बाहेरचे आहे की वकीलाचा कोणाला जास्त बिल येतो तसेच लोकांना जास्त बिल येतो किंवा त्यांना लाईट सप्लाय भेटत नाही. मोनोपॉलीमध्ये आपण त्याच्याबाहेर एकत्र येउन काहीतरी विचार करावा लागेल. तसा दुसरा सबस्टेशन जेवढे बांधलेले आहे. त्याचा तीन पट आपण, मी, पत्रे दिलेली आहेत. अजित पाटलांनी तीन पट त्याच्यावर आकारणी करावी आणि एखाद्या इललिगल जे छोट्या जागेत बांधले असेल जिकडे फायर टेंन्डर जाउ शकत नाही किंवा एमरजन्सी वस्तु जाउ शकत नाही. त्याठिकाणी त्यांनी बांधले असेल काही ठिकाणी बिल्डींगच्याखाली स्टिल्ट मध्ये सबस्टेशन बांधलेले आहे. भविष्यात धोका निर्माण होउ शकतो. कधी आग लागली तर स्टिल्ट मध्ये जे काही फायर स्टेशन बांधलेले असेल तर ते नक्कीच त्यांना काढायला सांगावे की, बिल्डींगच्या खाली येतो. कर विभागाने तीन पट कर शास्ती लावून त्यांच्याकडून कर आकरण्यात यावा. जेवढे सबस्टेशन आहेत त्याची माहिती घ्यावी. आणि त्याच्या वर कारवाई करावी आयुक्त साहेबांनी आपले मत व्यक्त करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

दुसरा महत्वाचा बाब अशी आहे मगाशी मॅडम म्हणाल्या की, महागडा शर्ट एकदा फाटला जो दुरूस्त करत गेला. तसा आख्खा रस्ता आपल्याला एक दिवशी फेकावा लागेल. मला जरा बांधकाम विभागाने प्रामाणिक पणाने सांगाव की गेल्या वर्षी आम्ही रस्ता नुकसान भरपाईपोटी किती पैसे रिलायन्सने भरले?

**मा. महापौर :-**

त्यापेक्षा आपले जास्तच जातात आपण रिपेअरींग पैसे येतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याचा फैसला आजच होउन द्यावा. म्हणजे कुठेतरी आम्ही प्रामाणिकपणे पैसे वसुल करत नाही. आणि कुठेतरी ते तुम्हाला फाट्यावर मारून रस्ते खोदुन जातात.

**मा. महापौर :-**

महत्वाच अस आहे. ज्यावेळी रिलायन्सला त्यांना विचारतो की, परवानगी कुठे आहे. ते बोलतात अर्ज दिलेला आहे. म्हणजे परवानगी घेताना आपण जर बल्ब लावला एमरजन्सी तर दहापट आपल्याकडून बिल आकारले जाते. आणि त्यांनी कुठेही खोदल विदाउट पैसे तर आपल्याकडून कुठल्याही प्रकारची दंडात्मक वसुली करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी केलेल्या सुचनेचे काय झाले. डी.सी. रूल बाबत.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, डी.सी. रूलबाबत खुलासा करातील.

**मिलन म्हात्रे :-**

डी.सी. रूलमध्ये प्रोव्हीजन केले आहे. एखाद्या मिटरचे जर आपण केला तर त्याला २० बाय २० चे पावर स्टेशन द्यावे लागते. आपल्या डी.सी. रूलमध्ये प्रोव्हीजन आहे. त्याबाबतीत काय ते सांगा.

**मा. महापौर :-**

रिलायन्सकडून आपल्याला साधारण किती आहेत?

**दिपक खांबित :-**

टाटा कडून एक कोटी सत्तावन्न लाख.

**मा. महापौर :-**

रिलायन्स एनर्जीचे किती आहेत?

**दिपक खांबित :-**

एक कोटी त्र्याहत्तर लाख.

**मा. महापौर :-**

मग रिलायन्स कम्युनिकेशन कडून किती आहेत? हे जे पैसे दाखवलेले आहेत, चार करोड पंचेचाळीस लाख रूपये आपल्याला आलेले आहेत. पण हे जे दिलेले आहेत हे रिलायन्स एनर्जीचे नाहीत. जे आत्ता फायबर ऑप्टीक्स वगैरे टाकली गेली. त्याचे पैसे मिळून आहेत. रिलायन्स एनर्जीचे आपल्याला वेगळे आले तर आपल्याला माहिती पडेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

बजेटमध्ये बघा स्पष्ट आहे. बजेटमध्ये २००७-०८ साली जेव्हा तुमचे ऑप्टीकल फायबर केबल टाकले नव्हते तेव्हा रस्ते नुकसान भरपाई पाच कोटी चौदा लाख रूपये घेतलेली आहे आणि गेल्या वर्षात फक्त दोन

कोटी? म्हणजे गेल्या वर्षी त्यांनी कमी रस्ते खोदले का? आठ महिन्यामध्ये तुम्ही दोन करोड रूपये लिहिले आहेत. हे तुमचेच बजेट आहे. तुमच्याच बजेटची कॉपी आहे. आम्ही बनवलेला नाही. माझे तर मत आहे की, जो आर.सी.सी. रिपेअरिंगचा खर्च आहे, तो लावावा. हे लोक फक्त मॅकेडम - ४ नंबरची कपची, मॅकेडम आणि सिलकोटचा चार्ज लावतात. यांना सगळयांना सांगा की, आर.सी.सी. करताना जो चार्ज येतो. नाहीतरी आपली एस्टीमेटची रक्कम वाढवायला श्री. खांबित साहेब केवढे हुशार आहेत. सबवे चा सहा कोटीचा खर्च त्यांनी चाळीस कोटीवर नेलेला आहे. मग हे करायला त्यांना कोणी अडवले आहे का? मी पालिकेच्या फायद्यासाठी बोलतो. त्यांचा वैयक्तीक इंन्सल्ट करण्यासाठी बोलत नाही. आणि ते कोण तुम्हाला विचारायला येणार आहेत की, तुम्ही एवढा खर्च कशाला लावला? माझे म्हणणे आहे की, तिप्पट पैसा वसुल करावा. पंधरा कोटी रूपये तरी तुम्ही त्यांच्याकडून आणले पाहिजेत. आणि अख्या मिरा भाईंदरमध्ये बघा. सगळीकडे रस्ते खोदलेले आहेत. आत्ता नवीन रस्ता तुम्ही परवा पॅचवर्क केला. लगेच तिसऱ्या दिवशी त्यांनी खोदला. आणि म्हणून मा. आयुक्त साहेब, तुम्हाला एक विनंती करतो. हे लोक परस्पर परमिशन देतात. आत्ता एकदा रस्ता बनवला की, रिलायन्सवाले येतात, ते रस्ता खोदतात. नंतर तुम्ही पॅचवर्क करता. परत ते कम्युनिकेशन वाले येतात ते केबल टाकतात. परत रस्ता पॅचवर्क केला की, एम.टी.एन.एल. वाले येतात ते रस्ता खोदतात. त्याच्यानंतर तुमच्या आरोग्य खात्याची पाईप क्रॉसिंगची किंवा ड्रेनेजची कामे निघाली की ते रस्ता खोदतात. साहेब, ही जेवढी प्रपोजल आहेत, कोणत्याही प्रपोझलला लगेच मान्यता देउ नका. जर अशी परिस्थिती अर्जन्सीमध्ये असेल की, केबल फॉल्ट झाला, तिथल्या रहिवाशांना लाईट नाही म्हणून ठिक आहे. पण ज्यांची प्रपोझ कामे आहेत ही सगळी प्रपोझ कामे, महिन्या महिन्याला, आपण समन्वय समिती स्थापन करा. एम.टी.एन.एल, कम्युनिकेशनचे, रिलायन्सचे जेवढे लोक रस्ता खोदायला, रस्त्याची वाट लावायला येतात त्या सर्व संबंधित प्रमुखांना बोलावून त्यांचे जे प्रस्ताव असतील ते महिन्या महिन्याला आपण निकाली लावा. मग तुम्हाला प्लानिंग देता येईल. नाहीतर तुम्ही काय करता, आज एम.टी.एन.एल. वाले आले, त्यांनी पैसे भरले, परमिशन दिली. परत उद्या पॅचवर्क केला. म्हणजे हे वर्षानुवर्षे चालू न राहता. एकमेकांची जी कामे आहेत. त्यांची सांगड घालता येईल. ते क्रमाक्रमाने करता येईल. तशी आपण त्यांची कोऑर्डीनेशन कमिटी करावी.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, श्री. पाटील साहेबांनी सांगितले त्याच्यात भाईंदर पुर्व समाविष्ट करा.

**शानु गोहिल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, सन्मा. सदस्या सौ. प्रभात पाटील इन्होने जो रिलायन्स एनर्जी के बारे मे लक्षवेधी मांडी है। उसके लिए पुरा सभागृह उनके साथ है। और हम लोग उम्मीद करते है की, महानगरपालिका द्वारा उसका सिरियसली स्ट्रीक्टली ॲक्शन लिया जाएगा। जैसे लोगो को लाईट का बिल भरना बहोत भारी पडता है। उसी तरह से रिलायन्स का जो टेलिफोन का बिल आता है, वह भी सबसे ज्यादा बिल आता है। खास कर हमारे महानगरपालिका के जितने भी अधिकारी है, वह सभी रिलायन्स ही वापरते है। तो मै महानगरपालिका को ऐसा सजेशन देना चाहूंगी की, महानगरपालिकासे ही इसकी शुरूआत करे। चारिटी बिगेन्स फ्रॉम होम. तो आप इसके बारे मे भी शुरूआत करे, क्योंकी इसका भी ज्यादा से ज्यादा बिल नागरिको को बेअर करना पडता है।

**मा. महापौर :-**

ठिक आहे, सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**प्रभात पाटील :-**

या लक्षवेधीवर त्यांचे ओपिनिअन ऐकायचे आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, अब श्री. प्रफुल्ल पाटील साहब ने पॅचवर्क की बात चलाई, उसमे पारदर्शकता का पुरा अभाव है। पिछले से पिछले मा. महासभा मे श्री. खांबित साहब ने वादा किया था की, जो सडके खोदी गई है। उसके पैसे रिलायन्स ने जमा करा दिए है। और तुरंत भर दि जाएगी। लेकीन दो मा. महासभा गुजरने के बाद उस वादे के बावजुद भी पॅचवर्क को पुरा किया नही गया। और जब पुछते है की, इसके लिये पैसा आया है क्या? तो बोलते है आया है। अभी वह आया या नही आया यह भी मालुम नही पडता है। कहने का मतलब, रिलायन्स ने जो काम किया उसके लिए कितना पैसा आता है। इसके पिछली जो तिसरी मा. महासभा हुयी थी, उसमे श्री. खांबित साहब का स्टेटमेंट है। उन्होने बोला था की, अगली मा. महासभा के पहले जितना भी खड्डा, सडक खोदे गये हृै पुरा कर दिया जाएगा। आज उस बात को आठ महिने हो गये मेरे वॉर्ड मे पुरी सडक लाईन से खोदी थी। आठ महिने बाद अब तक काम नही हुआ है। रिलायन्स ने तो तुरंत पैसा जमा कर दिया, यह श्री. खांबित साहब का मा. महासभा मे जवाब था। उस पैसे का क्या हुआ? वह पैसा लिया गया की नही? मुंह से बोला जाता है की, लिया गया। लेकीन ऑन दि रेकॉर्ड लिया गया? कहने का मतलब रिलायन्ससे जब पैसा आता है। काम होता है की नही उसमे पारदर्शकता का पुरा अभाव है।

**सिसिलिया बावीधर :-**

उत्तनच्या रस्त्याचे पण पॅचवर्कचे काम अजुन बाकी ठेवलेले आहे. त्यांनी अजुन केले नाही.

**राजेंद्र जैन :-**

रेकॉर्ड पर आश्वासन दिजिए।

**मा. आयुक्त :-**

करेंगे।

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, रिलायन्सबद्दल आपले मत व्यक्त करावे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, बिलाची परिस्थिती आणि महानगरपालिकेच्या कन्झ्युमरची जी बिले येतात. त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी दि. १६/०६/२००९ ला त्यांची मिटींग बोलावली होती. त्या मिटींगमध्ये मी त्यांना प्रश्न विचारलेला होता की, पहिल्यापासुन, ग्रामपंचायतीपासुन आमचे पोल किती आहेत? आणि त्याचे भाडे किती लावता? आणि त्या भाड्यामधील पोलची किमान किंमत निघुन गेलेली आहे. ते आमच्या ताब्यात द्या. मग बाकीचे आत्ता लावलेले काय आहेत ते नंतर बघू. याबाबत त्यांनी टाईम घेतलेला आहे की, मला एक महिन्याची मुदत द्या. त्या मुदतीमध्ये आम्ही बिलाबद्दल संपुर्ण चौकशी केली. १५,६०० पोल भिवंडीला आहेत, २४ लाख रूपये महिन्याला बिल येते आणि आपले ९,९५३ पोल आहेत, आपले ९५ लाख रूपये दर महिन्याला भरतो. आणि जे पंधरा हजाराला एक पोल, त्यांची किंमत आहे. मात्र आपल्याकडून भाडे घेतात आणि पोल लावतात. आणि भाडे फिटल्यानंतरसुद्धा, घसारा निधी मायनस होउन देखिल त्या पोलची किंमत लावायची सोडत नाहीत. गेल्या दोन वर्षातील फरक सहा कोटी रूपये मागायला आठ दिवसांपुर्वी आले होते. मी भरणार नाही, तुम्ही विज कट करा म्हणून सांगितले. कारण सहा कोटी रूपये दर वर्षी फरक आणत सहा कोटी एकदम मागायला आले. नाहीतर आम्ही बंद करणार. तुम्ही कट करा. आमचे सभासद आणि आम्ही बघु की, कसे कट होते. मी बिल भरणार नाही म्हणून सांगितलेले आहे आणि पोलची जी कॉस्ट आहे ती निघुन गेल्यानंतरही त्यांच्याकडे ठेवले आहेत. त्यावर आम्ही ॲडव्हर्टाईजपण करायचे नाही. मी सभागृहाच्या मताशी सहमत आहे की, सभागृहाने असे व्ह्यु घेतले की, टाटा कडून घ्यायचे. टाटांना सुद्धा आम्ही बोलावलेले आहे आणि त्यांना डेट दिलेली आहे. त्यांच्या डेटप्रामणे आले तर आपल्याकडे पोलवर ॲडव्हर्टाईज करायचा खर्च कोण करणार असेल तर त्याच्याकडे बिल वर्ग करता येईल ही योजना आहे. तर चर्चा करून झाल्यानंतर सभागृहापुढे सविस्तर आणू आणि मॅडमनी जी लक्षवेधी मांडली ती महापालिकेच्या हिताची आहे. आणि कमी खर्चात, आपले जे वर्षाला बारा कोटी खर्च होतात. तिथे पाच सहा कोटी खर्चामध्ये ते भागेल. निम्मे पैसे महापालिकेच्या विकासकामांना लावता येतील.

**मा. महापौर :-**

साहेब, दुसरा महत्वाचा प्रश्न सन्मा. श्री. शरद पाटील साहेबांनी उपस्थित केला की, रिलायन्सने जे स्ट्रीट लाईट सोडून सुद्धा कमीत कमी दहा हजार पोल मिरा भाईंदरमध्ये दुसरे लावलले आहेत. म्हणजे त्यांचे खाजगी पोल त्याची आपल्या शहराला काही गरज नाही. ते पोल त्यांना काढायला सांगा. सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**मा. आयुक्त :-**

ते काढायला सांगतो आणि सर्व याच्यावर तिप्पट कमर्शिअलने कर आकारणी केलेली आहे. तिप्पट दराने कमर्शिअल दंडासह कर आकरणी केलेली आहे. ते कमी करावे म्हणून माझ्याकडे आले होते. मी कमी करणार नाही असे म्हटले होते. श्री. पाटील साहेबांनी जे सांगितले की, बॅकडेटेड करा, ज्या तारखेपासुन आलेले आहेत. ते रिवाईज करू. कमर्शिअल दंडासह लावलेले आहे. फक्त बॅकडेटेड करायचे राहिलेले आहे. ते करून घेउ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ते डी.सी. रूलचे सांगा.

**भगवती शर्मा :-**

बहोत से ऐसे सबस्टेशन है जिनपर अबतक कर आकारणी नही की गयी है।

**मा. आयुक्त :-**

आकारणी कीया है।

**भगवती शर्मा :-**

मैने डाटा मांगा, वह मेरे पास है।

**मा. आयुक्त :-**

वह मिटींगमे कम करने के लिए आए थे। मैने बोला की, कम नही होगा।

**भगवती शर्मा :-**

मैने उसके आयडेन्टीफाय करके बताया था की, ऐसे ऐसे सबस्टेशन है। जहा पर कर आकारणी हुई नही है। मैने आपको साठ फुट पर बताया, ९० फुट पर बताया, १५० फुट पर बताया। तो आपने इन्स्ट्रक्शन दिया की, इनकी कर आकारणी करेंगे। आपने मुझे पत्र दिया है।

**मा. आयुक्त :-**

करेंगे। जो रह गया है वह भी करेंगे। तीन पट टॅक्स लगायेंगे। कमर्शिअल लगायेंगे और बॅक डेटेड लगायेंगे। आणि सन्मा. श्री. मिलन म्हात्रे साहेबांनी एक प्रश्न विचारला होता की, डी.सी. रूलमध्ये ते प्रोव्हीजन काढून टाका. आपल्याला प्रत्यक्षात कंपनी बदलली तरी ते प्रोव्हीजन ठेवणे आवश्यक आहे. समजा आपण रिलायन्स सोडून टाटाला केले तर जो डेव्हलपर आहे त्या डेव्हलपरला नवीन घ्यायचे असेल तर त्यांना ती जागा मायनस करूनच घ्यायला पाहिजे. कारण सबस्टेशनला महापालिका सगळीकडे जागा पुरवणार नाही.

**मा. महापौर :-**

साहेब, सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांचा प्रश्न असा आहे की, ५०० मिटरच्या खाली असेल तरी ते सबस्टेशन मागतात.

**मा. आयुक्त :-**

आम्ही ते कमी केले आहे. ते नाहीच. जे मोठे बिल्डर आहेत, त्यांच्यासाठी ते योग्य आहे. ५०० ची अट काढू. परंतु मोठ्या प्रमाणात डेव्हलप होणार आहे ती जागा महापालिकेला सुद्धा आवश्यक आहे. समजा आपण रिलायन्स ऐवजी टाटा आणले तरी त्यांना सबस्टेशनला जागा द्यायलाच पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मग जागा ताब्यात घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. पाटील साहेब, त्यात विषय असा आहे की, ते गैरसमज करतात. ४०० स्क्वेअर मिटर आर.जी. असेल तर आपण परमिशन देतो. ते आपल्याला ४०० मिटरचा प्लॉट असेल तर मागतात. म्हणजे ४०० स्क्वेअर मिटरची आर.जी. आपल्याकडे कधी उपलब्ध होईल., १५ टक्के म्हणजे ३००० मीटरचा प्लॉट असेल त्यावेळी ४०० मीटर आर.जी. उपलब्ध होईल. डी.सी. रूलमध्ये आपण म्हटले आहे की, ४०० स्क्वेअर मीटर आर.जी. असेल तर पान क्र. ४२ तुम्ही नवीन डी.सी. रूल बघता की जुने?

**मा. आयुक्त :-**

साहेब, जुन्यामध्ये आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांना भरणार नाही. जा असे यासाठी सांगितले आहे की, महापालिकेकडून कॉस्ट घेता, पोल टाकता आणि त्याच केबलवरून तुमची गि-हाईके जातात. म्हणजे खर्च आमच्यावर आणि खाजगी लोकांना जे कनेक्शन देतात ते आमच्या केबलवरून जातात. त्यामुळे आमच्या खर्चाने तुम्ही केबल टाकता आणि तुमचे दुसरे गि-हाईक वाढवता त्यामुळे देणार नाही म्हणून सांगितले.

**प्रभात पाटील :-**

पण मागच्या वेळेला मॅक्सस मॉलच्या पोलिस स्टेशनचा विषय निघाला होता. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी काढला होता तो इश्यु वेगळा होता. पण त्यावेळेला असे झाले होते की, ते त्या मोठमोठ्या विद्युत वाहून नेणा-या तारांच्या खाली आहे म्हणून ते काढून टाका असा पालिकेला जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा सन्मा. श्री. पाटील साहेबांनी मोठा मिश्कील प्रश्न विचारला होता. वाहून नेणारे जे पोल आहेत, मोठ मोठे टॉवर्स आहेत ते आधी निघाले आहेत का ते बघा. ते टाकण्यासाठी रिलायन्सने तुमच्याकडे कधी परवानग्या घेतल्या होत्या का? जर घेतल्या नसतील तर ते अनधिकृत आहेत. ते काढून टाका. मा. महापौर साहेब, दुसरा मुद्दा असा आहे की, आपण टाटावाल्यांना बोलावले होते. ते म्हणाले की, आम्हाला आमचे इन्फ्रास्ट्रक्चर इकडे बनवावे लागेल.

**मा. महापौर :-**

त्याचा जो टाईम पिरिएड आहे तो ते खुप लांब बोलत होते. म्हणजे आम्हाला केबल टाकायला सहा महिने, बारा महिने असा त्यांचा टाईम पिरिएड होता.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यामध्ये ग्राहक पंचायतीने एक निर्णय, महाराष्ट्र सरकारला विज नियामक आयोग जो आहे त्या नियामक आयोगामध्ये एक स्पष्ट तरतुद आहे की, जर इतर कंपन्यांना आपल्याकडे यायचे असेल आणि त्यांच्याकडे पुरेसे इन्फ्रास्ट्रक्चर नसेल तिथे अस्तित्वात असलेल्या जुन्या कंपनीचे इन्फ्रास्ट्रक्चर त्यांना वापरता येते. तशी विज नियामक आयोगाकडे तरतुद आहे. आणि त्या विज कंपन्यांना ते करणे कायदेशिर बंधनकारक आहे. त्याच्यामुळे ते दुस-यांची साधनसामुग्री वापरू शकतात. म्हणजे त्यांना जेव्हा बोलवाल.....

**मा. महापौर :-**

तपास करून घेतो. आपण आत्ता टाटाला बोलवू तेव्हा सगळे पिक्चर क्लिअर होईल.

**प्रभात पाटील :-**

ते मुद्दे तेव्हापण क्लिअर होतील. दुसरी गोष्ट, आपण माझी लक्षवेधी स्विकारली आणि सगळ्या सभागृहाचे मी आभार मानते की, सगळ्यांनी एकमुखाने त्या लक्षवेधीला सपोर्ट केला. कदाचित ह्या लक्षवेधीच्या माध्यमातुन या शहराचे भले होउन जाईल अशी मी अपेक्षा करते आणि तुम्ही दोघांनी सुद्धा त्याच्यामध्ये लवकरात लवकर लक्ष घालावे अशी मी विनंती करते.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापोर साहेब, मा. आयुक्तांच्या उत्तराची गरज आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ वर सध्या सर्विस रोडचे काम चालू आहे. राष्ट्रीय महामार्ग आयोगाच्या खाली सर्विस रोडचे काम चालू असताना तिथे असलेल्या

सध्याच्या इमारती त्याचा प्लींन्थ लेव्हल खाली असल्यामुळे तिथे पाणी साचणारच. अजुन पाउस पडलेला नाही. कुठल्याच बाजुने पाणी निचरा होण्याचा मार्ग त्यांनी केलेला नाही. माझे सहकारी मित्र सन्मा. श्री दाउद भाई यांनी महापालिकेला पत्र दिलेले होते. त्याचे उत्तर महापालिकेने त्यांना दिलेले आहे. तुम्हाला मी वाचून दाखवतो. उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ हा भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली येत असून सदरील सर्विस रस्त्याची उंची कमी करण्याबाबत आय.आर.बी. चे प्रोजेक्ट मॅनेजर श्री. बिरादर यांना सुचित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांनीही सर्विस रस्त्यालगत गटार बांधण्याचे काम लवकारल लवकर हाती घेण्यात येणार असल्याचे मौखिक आश्वासन दिलेले आहे. म्हणजे तोंडी आश्वासन दिलेले आहे. उद्या ते लोक, तिथे पाणी साचले जर निचरा होण्याचाच मार्ग नसेल तर ते पाणी कुठे जाईल? आणि हे मौखिक उत्तर आहे. याला कोणाला पकडायचे? महापालिकेला? महापालिका अशा पद्धतीचे उत्तर देते.

**एस. ए. खान :-**

रस्ता एवढा उंच केला आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, संबंधित ठेकेदाराला बोलावून त्याचे पाणी निचरा होण्याचे काम जोपर्यंत करत नाही तोपर्यंत काम बंद केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते बोलतात ते बरोबर आहे. त्याच्यामागे सिरीयसनेस असे आहे की, नॅशनल पार्कच्या डोंगरावरून पाण्याचा प्रवाह इतका जोरात आहे. तो तीन ठिकाणी आहे. एक गोल्डन केमिकल्सच्या पहिल्या ड्रेनमधून पेणकरपाड्याच्या गावाच्या हद्दीतुन मुंबईच्या हद्दीत जातो. दुसरा श्री. वासुदेव नांबियार यांच्या ऑफिसच्या समोरून येतो आणि तो दिल्ली दरबारच्या अगोदर क्रॉस होतो. म्हणजे जे वे ब्रिज आहे. त्या वे ब्रिजच्या पुढे तो क्रॉस होतो. त्याने क्रॉसिंगला जे सीडी वर्क केले आहे ते इतके अरूंद केलेले आहे की, तो पाण्याचा फ्लो जर पावसात लक्षात घेतला तर त्याच्या वरून पण पाणी येईल किंवा तिकडच्या पलिकडच्या बाजुला ते पाणी जास्त होईल. म्हणून ते सीडीचे डिझाईन आपल्याकडून तपासुन घ्या. कारण त्याच्यानंतर तिथून ते पाणी त्या दिल्ली दरबारच्या जवळच्या पुलाखाली येते आणि पुलाखालून पुन्हा त्या पंजाब फाउन्ड्रीकडे येते. म्हणजे हा जो मोठा प्रवाह आहे तो मोठा प्रवाह जाउन बी.एस.ई.एस. चे रिसींग स्टेशन आहे. संपुर्ण नॅशनल पार्कची जी जनता कॉलनी, सन्मा. सौ. ज्योत्स्ना ताईच्या वॉर्डमधील झोपडपट्टी आहे, त्या झोपडपट्टीच्या अलिकडच्या बाजुने दोन ड्रेन आणि पलिकडच्या बाजुचे ड्रेन ते वेस्टर्न हॉटेल पर्यंत, वेस्टर्न हॉटेल पासुन ते संपुर्ण निघुन पुढे बी.एस.ई.एस. चे रिसिंग स्टेशन आहे तिकडे निघतात. आणि हा जर निचरा बरोबर नसेल तर त्याठिकाणी मग एकत्र लोड येतो आणि म्हणून इथूनच ते सिडी वर्क बरोबर झाले आहे की नाही ते बघावे.

**मा. महापौर :-**

त्या लोकांनी तो टेम्पररी बांधला.

**प्रफुल्ल पाटील :-**

याच्यापुढे पण तसेच आहे. याच्यापुढे आपण काशिमिराची जी चढण आहे ती खाली करून घोडबंदरकडे गेलो की, तिथे ब-याचशा सिडी पुर्वी होत्या. त्या ऑटोमेटीक बंद झाल्या. कोणी पेट्रोल पंप आला त्याने बंद केली. त्याच्यापुढे आणखीन एक हॉटेल आले त्याने बंद केली. माशाचा पाडापासुन ते डाचकुल पाडा, भाटाचा पाडा त्या संपुर्ण एरियातील डोंगरावरचे जे पाणी आहे ते वेगवेगळ्या उघाडीतुन येत होते. आत्ता फक्त ती एकच उघाडी आहे ती जास्त काम करते. तर त्या ठिकाणीपण आत्ता आय.आर.बी. जे रुंदीकरण होणार आहे तिथे हे मोठे ड्रेन घ्यावेत नाहीतर एकदा झाले की ते तुम्हाला....

**मा. महापौर :-**

पण ते जे आत्ता बांधले आहे ते टेम्पररी आहे.

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. आपण सांगितल्या नंतरच क्रॉस ड्रेन खोदाई करून, काम बंद केलेले आहे. तीन ठिकाणी क्रॉस ड्रेन करायला घेतलेल्या आहेत आणि ज्यावेळेस पुढचे सूरू होईल त्यावेळेस क्रॉस ड्रेन केल्यानंतरच पुढचे काम करायला देउ. आणि एकूण ११ उघाड्या होत्या त्यापैकी ९ उघाड्या त्यांनी चालू केलेल्या आहेत. दोन उघाड्या पुर्ण बंद आहेत.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, एक मिनिट माझी सभागृहाला सुद्धा विनंती आहे. लक्षवेधीबद्दल बोलत नाही. पण त्यांनी आज जी लक्षवेधी ठेवली आहे ती १४/०६/२००६ ला मी लक्षवेधी ठेवली असताना त्याच्यावरसुद्धा तुम्ही आज जे उत्तर दिले तेच उत्तर होते. फक्त अशीच उत्तरे देणार का?

**मा. आयुक्त :-**

साहेब, सर्वात महत्वाचे म्हणजे लक्षवेधीला संपुर्ण सभागृह आणि संपुर्ण जनतेचे लक्षवेधण्यासाठी लक्षवेधी असते. ऑफिशीअल कामांसाठी लक्षवेधी नसते. जनतेला असे.....

**शरद पाटील :-**

साहेब, ऑफिसच्या कामाचे सांगत नाही. मी ऑडीटबद्दल बोलतो.

**मा. आयुक्त :-**

मी तुमचे ऐकले. मी तुम्हाला सांगतो ते जरा ऐकून तरी घ्या की, सभागृह आणि पुर्ण मिरा भाईंदर सिटीमधील नागरीकांना ही जर लक्षवेधी घेतली नाही तर आघात होईल. अशा परिस्थितीला लक्षवेधी म्हणतात की, हे सभागृहाचे आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी यावर लक्ष देउन काम करा हे सांगण्यासाठी ती लक्षवेधी असते.

**शरद पाटील :-**

म्हणजे आम्ही ऑडीटबद्दल जे बोलतो ते नागरिकांसाठी नाही.

**मा. आयुक्त :-**

साहेब, यावेळेला सन २००९ पर्यंतचा ऑडीट रिपोर्ट मा. आयुक्तांनी मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी वाचायला घेतला होता. ते पुढच्या येणाऱ्या मा. स्थायी समितीमध्ये तीनही रिपोर्ट ठेवले जातील.

**शरद पाटील :-**

साहेब, मला तेच बोलायचे आहे. त्यांनी १४/०६/२००६ ला.....

**मा. आयुक्त :-**

साहेब, प्रशासकिय काम आहे. लक्षवेधी होउ शकत नाही.

**शरद पाटील :-**

का होउ शकत नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

लक्षवेधी कशी होउ शकते, त्यामध्ये प्रशासनाने केलेल्या चुका आणि त्यामुळे शहराचे झालेले नुकसान, महापालिकेचे झालेले नुकसान यामध्ये नमुद आहे. तुम्ही असे बोलून चालणार नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, एकच सुचना मांडते की, जे रिलायन्सचे पोल सगळीकडे लावलेले आहेत. त्यामध्ये केबल फॉल्ट आहे आणि शॉक लागतो. गेल्या वेळेला त्याच्यामध्ये जनता नगरची दोन मुले ऑफ झाली. आत्तापण सध्या त्या भागामध्ये पाउस पडला की, त्यांना करंट लागतो. आणि एक दोन बायकांना शॉकपण लागला. मी श्री. जानकर यांना तसे कळवले आहे. परंतु, रिलायन्सलाही आपल्या पालिकेमार्फत पत्र पाठवा. जिथे जिथे रिलायन्सचे पोल आहेत त्या ठिकाणी जाउन त्यांनी चेक करणे गरजेचे आहे. कारण पावसाळ्याचे दिवस आहेत आणि शॉकचा प्रकार घडून, लहान मुले त्या पोलला हात लावत असतात. आणि पावसामध्ये त्याला दुरुस्ती नसेल तर झटका येतो तर रिलायन्सला एक पत्र पाठवा आणि सगळे पोल रिपेअर करायला सांगा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, दि. २१/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मर्लिन डिसा :-**

पेज ५६ मी सचिव साहेबांना सुधारणा दिली आहे.

**जयंत पाटील :-**

दि. २१/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दुसरा दिवस घ्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, एक अभिनंदनाचा ठराव मांडतो, मिरा भाईंदरचे सुपुत्र कर्मठ समाजसेवक मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन यांना महाराष्ट्र विधानपरिषदेचे उत्कृष्ठ संभाषण पटूचा पुरस्कार मा. राष्ट्रपती श्रीम. प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते दि. २९/०६/२००९ रोजी प्रदान करण्यात आला याबद्दल या सभागृहातर्फे व मिरा भाईंदर वासियांतर्फे मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**मिलन पाटील / अनिल सावंत :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १४ :-**

मिरा भाईंदरचे सुपुत्र, कर्मट समाजसेवक आ. मुझफ्फर हुसैन यांना महाराष्ट्र विधान परिषदेचे उत्कृष्ठ संभाषण पटूचा पुरस्कार **राष्ट्रपती, श्रीम. प्रतिभाताई पाटील** यांच्या हस्ते दि. २९/०६/२००९ रोजी प्रदान

करण्यात आला. याबद्दल या सभागृहातर्फे व मिरा भाईंदर वासियांतर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, माझा एक ठराव आहे. आपल्या ठाणे लोकसभा हद्दीतील दहावी आणि बारावी परिक्षेचा निकाल आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतून जे विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झाले असतील. त्या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वप्रथम मी या ठिकाणी अभिनंदन करतो व या सभेला विनंती करतो की, या शहरामध्ये जे ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी असतील त्यांना या सभागृहामध्ये बोलावून त्यांचे या ठिकाणी अभिनंदन करावे. अशी या सन्मा. सभागृहाला विनंती करतो.

**मा. महापौर :-**

आपण मागील वर्षापासून वेगळा कार्यक्रम लावतो. तो कार्यक्रम या दोन दिवसात नगरभवनमध्ये लागणार आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी बोलावून त्यांचा सत्कार केला जाईल.

**आसिफ शेख :-**

ठाणे लोकसभेतील नवनिर्वाचित खासदार डॉ. संजीव गणेश नाईक साहेब यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पार्लमेंटमध्ये प्रतोद पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचेदेखील या ठिकाणी अभिनंदन, त्याचप्रमाणे ......

**लक्ष्मण जंगम :-**

९० च्या वर असतील त्या सर्वांचे घ्या.

**आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे सन्मा. श्री. दिनेश नलावडे साहेबांनी फक्त मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहेबाबद्दल प्रेम व्यक्त केले आहे. आपल्याला प्रेम आहे त्यापेक्षा जास्त प्रेम आम्हाला आहे. परंतु, विधानपरिषदेमध्ये आणि विधानसभेमध्ये सन्मा. आमदार सौ. मंदाताई म्हात्रे आहेत. श्री. गुरुनाथ कुलकर्णी आहेत, जेवढे आहेत, भाजपचे आहेत, शिवसेनेचे आहेत. सगळ्या लोकांना उत्कृष्ट संसदपटूचा, उत्कृष्ट भाषणाचा पुरस्कार मिळालेला आहे. अशा बारा-पंधरा लोकांची यादी आहे. त्या सगळ्यांचे या ठिकाणी सरसकट अभिनंदन करण्यात येत आहे असा मी प्रस्ताव मांडतो.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, या ठिकाणी मा. खासदार श्री. संजीव नाईक हे आपल्या मतदार संघातील असल्यामुळे त्यांचा आणि सन्मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन यांना आत्ता सन्मानीत केल्याबद्दल या दोन्ही सदस्यांना सभागृहामध्ये बोलावून त्यांचा सन्मान करावा अशी मी या ठिकाणी सुचना मांडतो.

**अभिनंदन ठराव क्र. १५ :-**

ठाणे लोकसभेतील नवनिर्वाचित खासदार डॉ. संजीव गणेश नाईक साहेब यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पार्लमेंटमध्ये प्रतोद पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे. तसेच विधानपरिषदेमध्ये आणि विधानसभेमध्ये सन्मा. आमदार सौ. मंदाताई म्हात्रे आहेत. श्री. गुरुनाथ कुलकर्णी आहेत, जेवढे आहेत, भाजपचे आहेत, शिवसेनेचे आहेत. सगळ्या लोकांना उत्कृष्ट संसदपटूचा, उत्कृष्ट भाषणाचा पुरस्कार मिळालेला आहे. अशा बारा-पंधरा लोकांची यादी आहे. त्या सगळ्यांचे या ठिकाणी सरसकट अभिनंदन करण्यात येत आहे असा मी प्रस्ताव मांडतो.

**सुचक :- श्री. आसिफ शेख अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १२ :-**

दि. २१/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १६ :-**

दि. २१/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, वॉर्ड साफसफाई करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब, पिछली मा. महासभा मे सबवे और कल्वर्ट के लिए ‘‘ज’’ का प्रस्ताव लाया गया था। तो आपने बोला की, फिर से विषय लायेंगे और अब विषय लाये है तो आधा ही विषय लाया है। उसमे सिर्फ कल्वर्ट लाए है, सबवे नही लाए है। तो उसमे सबवे को भी इन्क्ल्युड किया जाए।

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

**मा. आयुक्त सो. यांच्या विषया संदर्भात गोषवारा वाचन करण्यात आला.**

मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढत असून उघड्यावर दैनंदिन बाजार मोठ्याप्रमाणावर भरत आहेत. शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल, मल्टीप्लेक्स यामध्ये घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये औद्योगिक वसाहत देखील मोठ्याप्रमाणात आहेत. शहराचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने वाढत्या लोकसंख्ये बरोबर घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. वाढती लोकसंख्या, वाढते घनकचऱ्याचे प्रमाण, घरोघरी जाउन कचरा गोळा करून उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वाहतुक करावी लागत आहे. वाढती लोकसंख्या व वाढता घनकचरा यासर्वांचा विचार करता सध्या असलेल्या कंत्राटी मजुर व वाहनांमध्ये वाढ करावी लागणार आहे.

दैनंदिन कामात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने शहराचे २४ गटामध्ये विभाजन करण्यात आले. प्रत्येक गटामध्ये समाविष्ट केलेल्या प्रभागामधील रस्ते, गटारे, साफसफाई कामाची घनता व त्या गटातुन दररोज उत्पन्न होणारा कचरा तसेच नविन नागरी वस्तीमधील साफसफाई कामाचा व दररोज निघणारा कचरा याचा विचार करून, प्रत्येक गटाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता देत आहे.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई ठेकेदारांमार्फत केली जात आहे. परंतु, पावसाळ्यामध्ये पावसाळ्यापुर्वी प्रभागा अंतर्गत असलेले कच्चे / पक्के नाले त्यांची देखील दर वर्षी वेगळ्या यंत्रणेमार्फत नालेसफाईची कामे करावी लागतात. प्रभागामध्ये असलेले (पावसाळ्यापुर्वी सफाई करावयाचे) कच्चे /पक्के नाले ही कामे प्रभागसफाई कामाबरोबर एकत्रित ठेका काढून करून घेतल्यास संबंधित ठेकेदारावर दोन्ही कामाची जबाबदारी निश्चित करून काम परिणामकारक होण्यास मदत होईल. नालेसफाईच्या कामाबाबत संबंधित ठेकेदारास जबाबदार धरता येईल व पर्यायाने जबाबदारी निश्चित केल्यास ठेकेदारास त्याचा धाक निर्माण होईल.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई व प्रभाग अंतर्गत नालेसफाई कामी एकत्रितपणे ठेकेदार निश्चित करून कामे परिणामकारक होणेस मदत होईल. शहरातील रस्ते, गटारे सफाई करणे, घरोघरी जाउन कचरा गोळा करणे तसेच कचऱ्याची वाहतुक करणे ही दैनंदिन कामे रोजच्या रोज परिणामकारक करून घेण्याच्या दृष्टीने ठेकेदारांवर बंधनकारक अशा अटी लादण्यात याव्यात. कामे परिणामकारक होतील यादृष्टीने अटी व शर्ती तयार करण्यात याव्यात.

मिरा भाईंदर महानगरपालिका पुर्वापारपासुन डंम्परद्वारे कचरा वाहतुक करण्यात येत आहे. याकामी ठेकेदार हे जुन्या पद्धतीचे उघड्या स्वरूपाचे डंपर वापरत असतात. त्यामुळे कचरा वाहतुक करतेवेळी काहीवेळा कचरा रस्त्यावर इतरस्तः पडून त्यापासुन दुर्गंधी पसरून नागरिकांना नाहक त्रास होत असतो. महानगरपालिकेने बृहन्मुंबई महापालिकेच्या धर्तीवर आवश्यकतेनुसार बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टरद्वारे कचरा उचलून वाहतुक केल्यास एका बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टर मार्फत मोठ्याप्रमाणावर कचरा वाहतुक करता येईल. बंदिस्तवाहने/कॉम्पॅक्टरसाठी मोठ्याप्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार असल्याने सदरचे टेंडर हे पाच वर्षासाठी काढणेस तसेच दैनंदिन प्रभाग साफसफाई व प्रभागा अंतर्गत येणारे नाले पावसाळ्यापुर्वी कराव्या लागणाऱ्या नालेसफाई कामाचा समावेश करून दोन्ही कामाचा एकत्रितपणे ठेका देण्याच्या कामास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. वॉर्डप्रमाणे कर्मचारी नेमावेत व त्यांना गणवेश देण्यात यावा तसेच त्यावर वॉर्ड क्र. नोंदवावा. तसेच दैनंदिन साफसफाईचा ठेका १ वर्षासाठी द्यावा व घनकचरा व्यवस्थापन ५ वर्षासाठी द्यावा. दोन्ही टेंडर ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात यावेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, गोषवाऱ्यामध्ये पाच वर्षासाठी असे काही लिहलेले नाही.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, प्रशासनाने त्यांची भुमिका स्पष्ट करावा की, पाच वर्षासाठी ठेका देता येतो की, नाही? त्यानंतर या ठरावावर विचार केला जाईल. नाही तर आम्ही त्यांच्या विरोधात ठराव मांडतो.

**मिलन पाटील :-**

पाच वर्षे द्यावे की, दोन-चार वर्षे द्यावे हे सभागृहाने ठरवावे.

**शरद पाटील :-**

प्रत्येक वेळेला ही गोष्ट प्रशासन सांगत असतानासुध्दा सभागृहाला त्यांची किव का येते आणि का त्यांची दया येते की त्यांना पाच वर्षाचे एकदम द्यायचे? आम्हाला काहीच समजत नाही. त्याच्यात त्यांचे काय असते ते समजत नाही. गेल्या वेळेलासुध्दा प्रशासनाने त्यांचा विरोध सांगितला होता की, करु शकत नाही. तरी यावर्षी परत आमच्या सभासदांना त्यांची दया का येते की, त्यांचा त्याच्यात काय सहभाग आहे ते आम्हाला समजत नाही.

**नयना म्हात्रे :-**

मागच्या वेळी त्यांना ॲग्रीमेन्ट बदलून एक वर्षासाठी दिले आणि आत्ता डायरेक्ट पाच वर्षे.

**शरद पाटील :-**

प्रशासनाने याचा खुलासा करावा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आता दोन वर्षे निघून गेली. तीन वर्षे राहिली आहेत. मग पुन्हा कोण नगरसेवक निवडून येतील त्यांनीपण त्याच ठरावाला बळी पडावे का?

**विजया वैती :-**

मा. महापौर साहेब, जर साफसफाई होणार नसेल तर याच्यावर काय कार्यवाही करणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पाच वर्षे दिल्यानंतर ठेकेदारांचा मनमानी कारभार चालू होणार. ते आपल्या नियमात बसते का?

**प्रभात पाटील :-**

तसा प्रशासनाचा गोषवारा पण नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

गोषवाऱ्यामध्ये असा उल्लेख नाही.

**जयंत पाटील :-**

सभेमध्ये ठराव मांडला म्हणजे ठराव पास झालेला नाही. सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे, निर्णय घ्यायला आपण समक्ष आहोत.

**प्रभात पाटील :-**

पाच वर्षाच्या ठरावाला विरोध आहे आणि प्रशासनाचे त्यांची भुमीका स्पष्ट करावी.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, **मा. आयुक्त सो. यांच्या विषया संदर्भात गोषवारा वाचन करण्यात आला.** शहरातील प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाईची कामे कंत्राट पद्धतीने ठेकेदारामार्फत केली जात आहेत. सध्या शहराची एकूण १९ गटामध्ये विभागणी करण्यात आली असुन १६६१ कंत्राटी कामगार व घनकचरा वाहतुकीसाठी ६७ वाहने यांच्यामार्फत साफसफाईची कामे केली जात आहेत. प्रभागनिहाय साफसफाई कामच्या ठेक्याची मुदत दि. ०८/१०/२००९ रोजी संपत आहे.

शहराची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढत असुन उघड्यावर दैनंदिन बाजार मोठ्याप्रमाणावर भरत आहेत. शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल, मल्टीप्लेक्स यामध्ये घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये औद्योगिक वसाहत देखील मोठ्याप्रमाणात आहेत. शहराचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने वाढत्या लोकसंख्ये बरोबर घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. वाढती लोकसंख्या, वाढते घनकचऱ्याचे प्रमाण, घरोघरी जाउन कचरा गोळा करून उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वाहतुक करावी लागत आहे.

दैनंदिन कामात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने शहराचे २४ गटामध्ये विभाजन करण्यात आले. प्रत्येक गटामध्ये समाविष्ट केलेल्या प्रभागामधील रस्ते, गटारे, साफसफाई कामाची घनता व त्या गटातुन दररोज उत्पन्न होणारा कचरा तसेच नविन नागरी वस्तीमधील साफसफाई कामाचा व दररोज निघणारा कचरा याचा विचार करून, प्रत्येक गटाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता देत आहे.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई ठेकेदारांमार्फत केली जात आहे. परंतु, पावसाळ्यामध्ये पावसाळ्यापुर्वी प्रभागा अंतर्गत असलेले कच्चे / पक्के नाले त्याची देखील दर वर्षी वेगळ्या यंत्रणेमार्फत नालेसफाईची कामे करावी लागतात. प्रभागामध्ये असलेले (पावसाळ्यापुर्वी सफाई करावयाचे) कच्चे /पक्के नाले ही कामे प्रभागसफाई कामाबरोबर एकत्रित ठेका काढून करून घेतल्यास संबंधित ठेकेदारावर दोन्ही कामाची जबाबदारी निश्चित करून काम परिणामकारक होण्यास मदत होईल. नालेसफाईच्या कामाबाबत संबंधित ठेकेदारास जबाबदार धरता येईल व पर्यायाने जबाबदारी निश्चित केल्यास ठेकेदारास त्याचा धाक निर्माण होईल.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई व प्रभाग अंतर्गत नालेसफाई कामी एकत्रितपणे ठेकेदार निश्चित करून कामे परिणामकारक होणेस मदत होईल. शहरातील रस्ते, गटारे सफाई करणे, घरोघरी जाउन कचरा गोळा करणे तसेच कच-याची वाहतुक करणे ही दैनंदिन कामे रोजच्या रोज परिणामकारक करून घेण्याच्या दृष्टीने ठेकेदारांवर बंधनकारक अशा अटी लादण्यात याव्यात. कामे परिणामकारक होतील यादृष्टीने अटी व शर्ती तयार करण्यात याव्यात व तसेच प्रत्येक वाहनामध्ये जी.पी.आर.एस. सिस्टीम बसवण्यात यावी. तसेच प्रत्येक सफाई कर्मचाऱ्यांची हजेरी पंचीग मशिनद्वारे घेउन त्याप्रमाणे पगार देण्यात यावा. तसेच ठेकेदाराचे टेंडर ऑनलाईन मध्ये व्यवस्था करावी. असा ठराव मांडत आहे.

दैनंदिन प्रभाग साफसफाई व प्रभागाअंतर्गत येणारे नाले पावसाळ्यापुर्वी कराव्या लागणाऱ्या नालेसफाई कामाचा समावेश करून दोन्ही कामाचा एकत्रितपणे ठेका १ वर्षाच्या मुदतीच्यासाठी देण्याच्या कामास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**प्रेमनाथ पाटील : -**

अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आता जो ठराव मांडला त्याच्यामागे सुचना घ्या, त्यांनी सफाई कामगार हे २४ गटांमध्ये विभागले आहेत. त्याच्यामध्ये चार-पाच वॉर्ड आहेत, त्याऐवजी वॉर्डवाईज सफाई करण्याचा ठेका द्या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, प्रभाग वाईज माणसे दिल्यानंतर कॉन्ट्रक्टर संगतो की, तुमचे जे साफसफाई कर्मचारी आलेले आहेत त्यांना आपण विचारणा केली की, माणसे कुठे आहेत. प्रभागात कोण काम करित नाहीत, तर दुस-या प्रभागात काम चालु आहे. असे खोटे बोलण्याचे काम चालु आहे, त्यापेक्षा तुम्ही जर वॉर्ड वाईज कर्मचारी दिले तर बरे होईल.

**राजेंद्र जैन :-**

इनकी बात का मै समर्थन करता हु। वॉर्डवाईज होना चाहिए।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आता ठरावामध्ये श्री. मिलन पाटील यांनी उल्लेख केला की, घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यात येतो तर या ठरावापासुन चालु करणार आहे की, अगोदर चालु केलेले आहे याचा पण खुलासा कराण्यात यावा आणि ठरावामध्ये माझी अशी सुचना आहे की, ज्या छोट्या-छोट्या गल्ली आहेत त्याच्यामध्ये ट्रक वैगरे जात नाहीत, तर त्याच्यामध्ये छोटे टेम्पो नमुद करावे.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक वर्षाच्या ठरावामध्ये.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपण या कर्मचा-या संदर्भात काय निर्णय घेतला आहे? ज्या साफसफाई कर्मचा-याबद्दल आम्ही येथे मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात आपली भुमीका काय आहे?

**मा. महापौर :-**

एक वर्षासाठी द्यावे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

ते नाही, साफसफाई कर्मचारी आपण प्रभागवाईज देणार की, वॉर्डवाईज देणार?

**मा. महापौर :-**

पहिला ठराव बघु द्या.

**स्नेहा पांडे :-**

वॉर्ड वाईज और एक साल के लीए।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, ठराव मात्र एक वर्षाचाच करा.

**स्नेहा पांडे :-**

वॉर्ड वाईज लीया जाए और वॉर्ड का क्षेत्रफळ देखते हुए जो बडे वॉर्ड है उनको कम दिया जाए।

**विजया वैती :-**

मा. महापौर साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब, अब जिस कॉन्ट्रक्टर को दीया है वह कर्मचारी इधर का उधर घुमाता रहता है, तो कॉन्ट्रक्टर भी चेंज कर दिजीए। उनके पास कर्मचारी नही है। इस वॉर्ड से उस वॉर्ड मे घुमता है।

**मा. महापौर :-**

आपको सुचना देनी है तो लीखकर दिजीए

**चंद्रकांत मोदी :-**

वॉर्डवाईज कर्मचारी दिजीए।

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर साहेब आणि सन्मा. सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य, कचरा साफसफाई, आपण नेमलेले ठेकेदार, ठेकेदार घेत असलेला अनैतीक फायदा, अगदी जवळ-जवळ सगळ्या नगरसेवकांची एक कॉमन तक्रार आहे. माझी तर आहे पण बाकीच्यांची पण असणारच आहे असे मला वाटते की, कुठल्यापण वॉर्ड मध्ये आपण जे ठेकेदार साफसफाईसाठी नेमलेले आहेत त्यांचे कर्मचारी काम करीत नाहीत, तर पालीकेचे कर्मचारी घेऊन साफसफाई होते, तुम्ही सगळ्यांना विचारा. आपण त्या ठेकेदारावर मिनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे त्यांचे पेमेंट करावे अशी अट टाकली ते त्या प्रमाणे पेमेंट करित नाहीत. आपण त्यांना नियमानुसार जो बोनस असेल तो देण्यात यावा ही अट टाकली. ते देत नाहीत. ग्रॅज्युएटी, प्रोव्हीडन्ड फन्ड वैगरे कायद्यात बसते नसते, तीथ पर्यत मी जात नाही. त्याच्यापुढे त्यांना गणवेश द्यावा, गमबुट द्यावे, हत्यारे द्यावीत, रेनकोट द्यावेत हत्यारे म्हणजे फावडे, घमेले द्यावे ते देत नाहीत. अक्षरशः त्याचे हे कर्मचारी ज्या लोकांना आपण ८० कर्मचारी दीले आहेत त्यातले फक्त ४० लोक हजर असतात, मी तुम्हाला एक उदाहरण देतो, गोडदेव गाव हा जो प्रभाग आहे हा प्रभाग श्री. तुलसीदास म्हात्रे साहेबांचा आहे त्यांच्या बाजुला माझा ४६ आहे. आमच्या दोघांच्या वॉर्डमध्ये वेगवेगळा कॉन्ट्रक्टर आहे. मी जेव्हा माझ्या वॉर्डमध्ये ठेकेदाराला सांगीतले की, माणसे उभी ठेवा मला किती कर्मचारी आहेत ते मोजायचे आहेत, त्यांने पटापट श्री. तुलसीदास म्हात्रे साहेबांच्या वॉर्ड मधुन माणसे आणली आणि ती उभी केली मी त्यांच्या सर्वांचे शुटींग केले, दुस-या दिवशी त्यांच्या वॉर्डमध्ये गेलो तिथे माणसे पाठवली तर तीच माणसे तीथे आहेत. म्हणजे ठेकेदारपण एकमेकाला अशी मदत करतात, मग साहेब, तुम्ही तरी कीती गोष्टी तपासणार. तुम्ही बाहेर निघायचे म्हटले तर पहिले तुमचा ड्रायव्हर टीप देईल, म्हणजे देणार नसेल पण देत पण असेल की, साहेब अमुक ठिकाणी इन्पेक्शनला येतात तयार हो, हाजीर हो जाओ, मग तीकडे एस.आय त्याला लगेच सांगणार की, तुझी माणसे निट ठेव नाहीतर साहेब मला झापतील, लगेच तो दुसरी माणसे आणून तिथे उभी करतो. साहेब, ठेकेदाराच्या बाबतीत आपण येथे जो विषय आणला आहेतो थोडा वेगवेगळा करायला पाहिजे, म्हणजे रोजची साफसफाई वेगळी करा अणि घनकचरा व्यवस्थापनासाठी जी वाहतुक आणि गोळा करायचे आहे ती वेगळी करा. आणि आपल्याला एक गोष्ट मानली पाहिजे की, ठेकेदारांना जे नियमीत साफसफाई करतात त्यांना एक वर्षापेक्षा जास्त ठेका अजीबात देता कामा नये, कारण त्यांचे रिपोर्ट अजीबातच चांगले नाहीत. कोणाचेच चांगले नाहीत. आणि घनकच-याच्या बाबतीत नियमानुसार तुम्हाला जे करायला पाहीजे की, त्यांना कॉम्पॅक्टर आणायला सांगा पहिले तर फाटके तुटके डंपर होते आता ब-यापैकी आहेत आता त्याच्यावर पॉलीथीन वैगरे अंथरतात. पण कायद्याप्रमाणे ते कॉम्पॅक्टर नाहीत. आपण तशा प्रकारचे कॉम्पॅक्टर त्यांना घ्यायला लावा. कारण आत आपला जो सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा प्लान्ट आहे. तो बरा चालला आहे. कारण वर्तमानपत्रात तरी कोणाच्या तक्रारी आलेल्या बघितलेल्या नाही. आपण काय ॲसेस करता, ते पण मला माहिती नाही. आपल्या लोकांचे त्याच्यावर लक्षही असेल. वास येतो असे अजुनही ते म्हणतात. पण आत्ता कॉम्पॅक्टरने कचरा वाहून नेण्याची तिथली व्यवस्था करण्याची आपली जबाबदारी आहे. म्हणून घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीचा जो विषय आहे तो पाच वर्षासाठी करा. कारण कोणीही माणूस कॉम्पॅक्टर एक वर्षासाठी विकत घेईल आणि नंतर सोडून देणार नाही. त्या ठेकेदारांना इथपर्यंत की, त्यांच्या गाड्या नव्या असाव्यात, आपल्या नियमानुसार असाव्यात, त्या बंद असाव्यात, त्यांच्यावर काम करणाऱ्या लोकांना नियमानुसार हॅन्डग्लोज वगैरे द्यावे आणि त्याची पाच वर्षाची मुदत करा आणि यांची फक्त एक वर्षाचीच मुदत करा. असे माझे सभागृहाला म्हणणे आहे.

**मा. महापौर :-**

म्हणजे दोन पार्टमध्ये निविदा मागवायची?

**प्रफुल्ल पाटील :-**

होय दोन पार्टमध्ये.

**मर्लिन डिसा :-**

सर, मेरे वॉर्ड मे जो आर.एन.ए. के ओपन स्पेसेस है वहापर एम.बी.एम.सी. के डंपर आकर पुरा कचरा डालते है। लास्ट टाईम मैने श्री. अजित पाटील साहब को भी उधर लाकर दिखाया था। पुरा जो घास और माशी लॅन्ड के बिच मे थोडा ओपन स्पेस में डंपींग करो, अबभी शांती नगर और शांती पार्क के बाजुवाले आर.जी. प्लॉट में डेली और फोटो निकाले हुए है। चाहिए तो मै आपके दिखा सकती हु। एम.बी.एम.सी के डंपर वहा पर आकर पुरा कचरा डंप करते है।

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, चोवीस गटांमध्ये वॉर्ड प्रमाणे सफाई कामगारांचा हा तक्ता तयार करण्यात आलेला आहे. गट चोवीस असु द्या, मात्र वॉर्ड प्रमाणे कर्मचारी नेमा आणि प्रत्येक कर्मचा-याला गणवेश हा कम्पलसरी करा मग ते लक्षात येईल, ठेकेदाराचे नाव त्या गणवेशावर असलेच पाहीजे की, ठेकेदाराचा हा कर्मचारी आहे, तुम्ही रोज चो-या पकडु शकत नाही, कुठेतरी त्याला अंकुश लागेल.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहेब, उस गणवेश पर वॉर्ड नंबर भी डाला जाए। ताकी इधर उधर नही कर सके।

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, आपण एक गोष्ट सक्तीची करा की, आपले कर्मचारी त्या थेकेदाराने नेऊ नये म्हणून आपल्या कर्मचा-यांचा जो गणवेश आहे त्याच्या व्यतीरिक्त इतर कलरचा गणवेश त्या ठेकेदारावर वेगवेगळा करा त्यांना कलर कोड द्या. त्यांना म्हणाव ठेकेदार कोण. मंगल्या चांगो पाटील, तुला तपकिरी कलर, दुसरा कोण, आल्या गेल्या पाटील, तुला निळा कलर, असे कलर करा म्हणजे इकडचे कर्मचारी तीकडे जाणार नाहीत आणि तीकडचे कर्मचारी इकडे येणार नाहीत, आणि त्यांच्या गणवेशावर वॉर्ड नंबर पण टाका किंवा ॲटलीस्ट वॉर्ड नंबरची प्रोव्हीजन ठेवा, आणि या ठिकाणी सौ. दिप्ती भट यांचे जे वॉर्ड आहेत ६५,६६,६७,६८,६९,७०,७१, याच्यात त्यांचा वॉर्ड आहे. तुम्ही ८८ माणसे दिलेली आहेत अर्धिसुध्दा उपस्थित नसतात त्या रोज हजेरी घेतात. म्हणजे आता एक काम करा, तुम्ही लोकप्रतीनीधिंची सुध्दा सही घेण्याचे कुठेतरी प्रोव्हीजन ठेवा म्हणजे तुमच्या सॅनेटरी इस्पेक्टरला सांगा की, औषध फवारणीवर जशी लोकप्रतीनिधींची सही घेतात तशीच आपल्या एस.आय ना सांगा की, तुम्ही आठवड्यातुन एकदा व्हिजीट करणार का? ठिक आहे, आठवड्यातुन व्हिजीट केली आठवड्यातुन व्हिजीट केल्यावर त्यांनी बघीतले की, ह्या वार्डमध्ये इतकी माणसे आहेत, अशा पध्दतीने त्यांच्यावर सक्ती आणल्या शिवाय, ते ठेकेदार आमचे असोत, तुमचे असोत, आमच्या मित्रांचे असोत, आमच्या नातेवाईकांचे नातेवाईक असोत, पण ठेकेदार हा ठेकेदार आहे. तो आपल्या खिश्यामध्ये जास्तीत जास्त कसे पडेल ते जास्त बघत असतो. महानगरपालिकेचे नुकसान होवो, कर्मचारी नसो, पण त्यांचे बिल बरोबर वेळेत येते. तर त्यांच्यावर कृपया ही बंधने आणा.

**तुळशिदास म्हात्रे :-**

साहेब, माझ्या वॉर्ड मध्ये ५५ ठेवलेले आहेत पण फक्त ३५ लोक येतात मी स्टंडिंगमध्ये पण प्रश्न उपस्थित केला होता. तुम्ही वॉर्ड वाईज करा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो की, जसे आपले छोटे वॉर्ड आहेत...

**जयंत पाटील :-**

मी ठराव देतो. आत्ता ब-याचशा नगरसेवकांच्या काही सुचना आलेल्या आहेत. सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सुचना मांडलेली आहे. साफसफाई कर्मचा-यांची संख्या वॉर्डप्रमाणे निश्चित करावी अशी श्री. सावंत यांची सुचना आहे. तसेच श्री. प्रफुल्ल पाटील यांची सुचना आहे की, रोजच्या साफसफाईचा ठेका एक वर्षासाठी द्यावा व घनकचरा व्यवस्थापनासाठी पाच वर्षाचा ठेका देण्यात यावा ही सुचना याच्यात समाविष्ट करून हा ठराव....

**मा. महापौर :-**

दोन पार्टमध्ये निविदा मागवावी.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, ठराव मांडण्या अगोदर मला काही बोलायचे आहे. याच्या अगोदर पण आपण ज्यावेळेला साफसफाईचे कॉन्ट्रॅक्ट देतो त्यावेळेला आपण निश्चित केलेले की, ज्या ठिकाणी लॉ-या आतमध्ये जात नाहीत. छोट्या छोट्या गल्ल्या आहेत. ज्या ठिकाणी लॉरी जात नाहीत त्या ठिकाणचा कचरा उचलला जात नाही. कमिशनर साहेब, काही ठिकाणी कॉन्ट्रॅक्टरला सांगून आपल्याला छोटे टेम्पो तयार करावे लागतील.

**जुबेर इनामदार :-**

गणवेशाची सुचनाही त्याच्यामध्ये समाविष्ठ करून घेण्यात यावी.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आमची सुचना त्याच्यामध्ये समाविष्ठ करून घ्या. मा. महापौर साहेब, छोट्या छोट्या गल्ल्या आहेत. त्याठिकाणी कच-याच्या लॉरी जात नाहीत. त्याठिकाणी कचरा उचलला जात नाही. लोकांच्या तक्रारी आहेत त्याठिकाणी कॉन्ट्रॅक्टरने छोटे टेम्पो तयार करावेत. कॉन्ट्रॅक्टरने कुठल्याही पद्धतीने कचरा उचलला पाहिजे.

**मदन उदिनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब, हमने एक साल का ठराव किया, हमारा ठराव कायम है। दो ठराव हुआ है। आप देखिए क्या करना है।

(सभागृहात गोंधळ)

**विजया वैती :-**

मा. महापौर साहेब, ज्या वॉर्डामध्ये साफसफाई केली जात नाही त्याच्यावर काय कार्यवाही केली जाईल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आरोग्याबद्दल माझी कुठलीही तक्रार नाही. सगळे ठेकेदार कचऱ्याचे डंपर आणून माझ्या वॉर्डमध्ये ठेवतात. तेसुद्धा ब्रीजपासुन लाईन लागते. तर जे ठेकेदार असतील त्यांनी आपल्या वॉर्डमध्ये नेउन डंपर उभे करावे. माझ्या वॉर्डमध्ये उभे केले तर मी त्यांची हवा काढून टाकेन.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आत्ता या बाकीच्या विषयावंर चर्चा झाली आणि श्री. पाटील साहेबांनी कपड्यांच्या कलरबद्दल सांगितले ते सर्व विषयांबद्दल झाले. मला वाटते की, त्या कॉन्ट्रॅक्टर लोकांचाही कलर नक्की करा आणि जे टेंडर मागवल्यावर या ठिकाणी महानगरपालिकेमध्ये जी भांडणे होतात आणि वृत्तपत्रामध्ये ज्या बातम्या येतात आणि ज्या भानगडी वाढतात त्याच्यावर सन्मा. सभागृहामध्ये चर्चा होण्याची गरज आहे. आणि जी मोनोपोली, काही अमुक लोकांचा जो विषय आहे की, मीच वर्षानुवर्षे या शहरामध्ये कॉन्ट्रॅक्टर राहिलो पाहिजे, त्याची जास्तीत जास्त अक्कल मिळवली पाहिजे आणि जास्तीत जास्त पैसे कमवले पाहिजे आणि नुकसान केले पाहिजे या विषयावर चर्चा करण्याची खरी गरज आहे. मला वाटते की, श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, तुम्ही जरा या विषयावर मा. महापौर साहेबांना आणि मा. आयुक्त साहेबांना सुचना करावी. अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**मदन उदिनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, प्रशासन पाच साल के लिए टेंडर दे सकता है क्या?

**प्रफुल्ल पाटील :-**

ऑनलाईन टेंडर मागवावे.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, नियमात प्रशासनाने स्पष्ट करावे की, पाच वर्षासाठी देता येत का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, मागच्या वेळेला आपण ३६९ कर्मचारी आणि १० ट्रकमध्ये साफसफाई करत होतो. त्यावेळेला साडेतीन करोडमध्ये खर्च होत होता. आता किमान वेतन कायदा आल्यामुळे मी मजुरांची संख्या टाकली नाही. आम्हाला साफसफाई आणि गटार सफाई करून पाहिजे. ते झाले नाही तर प्रत्येक दिवसाला दहा हजार रूपये दंड. जर माणसे दाखवली आणि आपण माणसे नमुद केली तर किती माणसे आणली, प्रत्यक्षात नसतात. आणि त्यांचे किमान वेतन मात्र आपल्याला द्यावे लागते. आणि ज्या गाड्या आहेत. त्या गाड्या बंदीस्त असाव्यात आणि गल्लीबोळातुन जायला पाहिजेत. जो माणूस टेंडर भरणार आहे तो नवीन गाड्या खरेदी करणार. ते इन्वेस्टमेंट एका वर्षासाठी किंवा दोन वर्षासाठी करणार नाही. घनकचरा व्यवस्थापनामध्ये बंदिस्त गाड्यांचे नमुद आहे. त्याला कॉम्पॅक्टर पाहिजे. कॉम्पॅक्ट करून कचरा भरला जातो. ज्यावेळेला श्री. पाटील साहेब नगराध्यक्ष होते त्यावेळेला हाउस टू हाउस कचरा कलेक्शन दहा गाड्यांवर करत होतो. आणि ३६९ कर्मचारी होते. आणि महापालिकेला फक्त साडेतीन करोडचा खर्च होता. आत्ता किमान वेतन कायदा घातल्यामुळे खर्च अंदाजित बावीस करोड रूपये आहे. मागच्या वर्षी सोळा करोड रूपये खर्च झालेले आहेत. मात्र सभासदांच्या तक्रारी पाहता सोळा करोड रूपये खर्च करून व्यवस्थित साफसफाई होत नाही असे दिसते आणि आपण जो ठेकेदार, जकातीचा ठेकेदार आला. तर जकातीच्या ठेकेदाराला महानगरपालिकेचे कर्मचारी दिल्यानंतर त्यांचा पगार आपण मायनस करून घेतो किंवा त्यांच्याकडून भरून घेतो. तसेच जर महापालिकेचे कर्मचारी साफसफाईला द्यायचे असतील तर त्यांचा पुर्ण पगार कॉन्ट्रॅक्टरकडून भरून घ्यायला पाहिजे. जर कामगारांच्या संख्येने आपण टेंडर केले तर महापालिकेला किमान वेतन कायद्याप्रमाणे फार नुकसान होते. तर आपल्याला वॉर्डची गटार सफाई पाहिले आणि वॉर्डची झाडलोट पुर्ण व्हायला पाहिजे. त्यांनी किती कामगार लावावे ते त्यांनी ठरवावे किमान वेतन त्यांनी बघावे. त्यांनी किती दरात आम्हाला साफसफाई करून देणार हे विचारण्यासाठी मी कामगारांची संख्या टाकलेली नाही. हा भरमसाठ खर्च वाढत गेलेला आहे. मागच्या वर्षी सात करोड वरून बारा करोड गेला. त्यानंतर सतरा करोड आला. आत्ता परत जर कामगारांची संख्या नमुद केली तर खर्च वाढणार. त्यामुळे सभागृहाने विचार करून निर्णय घ्यावा आणि नवीन गाड्या खरेदी करणारा माणूस एक दोन वर्षासाठी इन्वेस्टमेंट करणार नाही. गाड्यांची लाईफ दहा वर्षाची असते. आणि श्री. पाटील साहेबांनी सांगितले की, वाहतुकीचे वेगळे करा आणि साफसफाईचे वेगळे करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मागच्या वेळेला ०८-०९ या बजेटमध्ये वॉर्ड साफसफाई करण्यासाठी सोळा करोडची तरतुद होती. पण आपल्या अधिकाऱ्यांनी त्यांना साडे सव्वीस टक्के वाढवून पैसे दिलेले आहेत आम्ही दिलेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ते किमान वेतनमुळे म्हणून मी गोषवाऱ्यामध्ये मजुरांची संख्या टाकली नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, या लोकांना किमान वेतन कोण देतो?

**राजेंद्र जैन :-**

मैने पिछले दो साल मे सफाई के बारे मे श्री. कांबळे साहब से, श्री. अजित पाटील साहब से जो अब आये, बहोत बार पत्रव्यवहार किया। बार बार किया। श्री. अजित पाटील साहब ने पुरे भाईदर का साथ मे लेकर मेरा राउंडभी करवाया। और जगह जगह पर मैने बताया की, रोड साईड मे कचरा, प्लास्टीक की थैलीया, पडा है जैसे कोई गाव हो। श्री. अजित पाटील साहब ने दौरा किया था। उनसे पुछता हु की, यह ऐसा क्यो है तो वह बोलते है की, सुप्रिम कोर्ट का ऑर्डर है की, कचरापट्टी नही होना चाहिए। सुप्रिम कोर्ट की भावना क्या है की, रोडपर कचरा नही होना चाहिए। उस भावना को उलटा करते है ओर बोलते है की, वह तो होना नही चाहिए। लेकीन निचे डालने को छुट दि है। सुप्रिम कोर्ट के भावना का अपमान हो रहा है। मै चाहता हु की, आप यह प्रावधान रखे की, सप्ताह मे एक बार आप या आपके निचे के कोई सक्षम अधिकारी राउंड ले। और जहा पर रोड पर कचरा पडा दिखे उसपर तुरंत कोई हेव्ही पेनल्टी लगे। ताकी जो खुल्लम खुल्ला, निरंकुश सफाई का वातावरण चल रहा है, जहा सफाई होती नही है। आप घुम लिजिए। आप सिधे ठाणा निकल जाते है। आप भाईंदर घुम लिजिए। दस - ग्यारह - बारा बजे भरपुर कचरा इकट्ठा होता है। वह लोग बोलते है की, हम लोग सुबह ले गये। और आता है। तो इसकी व्यवस्था आपको करनी है। अगर नागरिक डालती है तो उनको शिक्षा देना क्या करना उन पहलू पर कोई विचार ही नही है। मेरी आपसे आशा है की, इस चेकींग मे आप मा. आयुक्त या मा. उपायुक्त लेव्हल के अधिकारी का महिने मे एक बार राउंड निश्चित करेंगे और मुझे आशा है की, आप हर ठेकेदार को दंडीत करेंगे।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मागेसुद्धा या कचरा साफसफाईवर बरीच चर्चा झाली. मागच्यावेळी अशी चर्चा झाली होती की, मिरा भाईंदरच्या कचऱ्याला सोन्याचा भाव आलेला आहे. तुम्ही जर साफसफाई च्या बाबतीत ठेकेदाराला सांगितले की, आम्हाला साफसफाई पाहिजे. तुम्ही कितीही कर्मचारी ठेवा. त्यामुळे तर भ्रष्टाचार आणखीन वाढेल. तुमचा कुठेही कंट्रोल राहणार नाही. आज ही परिस्थिती आहे की, पावसाळा सुरु झाला आहे. ठेकेदाराला तुम्ही कन्डीशन घातली आहे की, त्यात रेनकोट द्यायला पाहिजे. मिरारोडमध्ये एकही कर्मचाऱ्याच्या अंगावर रेनकोट नाही. पाउस पडायला लागला की, ते एका इमारतीखाली जाउन बसतात. अजिबात साफसफाई करत नाहीत. याच्यावर कंट्रोल कोण ठेवणार? तुम्ही ॲग्रीमेंट बनवता. मला वाटते की, मिरा भाईंदर महानगरपालिका अशी महानगरपालिका आहे, जिच्यामध्ये कचऱ्याचा ठेकेदार तोच, पॅचवर्क करणारा तोच, औषधे पुरवणारा तोच, म्हणजे ऑल इन वन असे ठेकेदार आहेत आणि त्यांची मोनोपॉली झालेली आहे. तुमचा काय कंट्रोल राहणार आहे? आज आपण मिरा भाईंदरमध्ये कचरा उचलण्यासाठी जवळजवळ १८ ते १९ करोड रुपये खर्च करतो आणि तो जर लोकांच्या पैशाचा असा गैर उपयोग होणार असेल आणि ठेकेदार आपला फायदा करुन घेणार असतील तर महानगरपालिकेचे काय? साफसफाई होत नाही म्हणून शेवटी लोक नगरसेवकांना दोष देतात.

**जुबेर इनामदार :-**

अनुभवानुसार अटीशर्ती काढा. अनुभवाच्या अटी असल्यामुळे तेच लोक परत परत येतात. त्याच्याकरीता ती अट काढा. नवीन लोकांना संधी द्या.

**स्नेहा पांडे :-**

अभी अभी मा. आयुक्त साहबने कहॉ की, हम रोज के रोज गटर की सफाई और वॉर्ड की सफाई.....

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. आयुक्त महोदय, हा प्रभाग सर्वांसाठीच खुला ठेवावा. सर्व ठेकेदार याच्यामध्ये भाग घेतील.

**स्नेहा पांडे :-**

रोज के रोज वॉर्ड की सफाई और गटर की सफाई करने का आप निर्णय करेंगे तो यह देखने रोज के रोज वॉर्ड मे कौन जाएगा? मजदुरोने वॉर्ड की सफाई अच्छी तरह से किया या नही किया? कॉन्ट्रॅक्टर आया या नही आया? यह देखने के लिए कौन जाएगा? और आप यह जो बात कह रहे है की, एक साल के लिए कोई भी कॉन्ट्रॅक्टर गाडी नही खरीदेगा, इन्व्हेस्टमेंट नही करेगा। अगर वह एक साल अच्छी तरहसे काम करता है, शहर की साफसफाई पर ध्यान देता है तो उसे ही आगे भी कॉन्ट्रॅक्ट मिलेगा। इस तरहसे आप पाच साल का एक साथ कॉन्ट्रॅक्ट दे देंगे तो वो अपनी मनमानी करेगा। क्योंकी एक बार पाच साल तक कॉन्ट्रक्ट दिया तो उसे निकाल नही सकते है। वह पाच साल तक उसका एकमात्र राज्य चलता रहेगा।

**मा. महापौर :-**

पाच साल का जो विषय दिया है वो साफसफाई के लिए नही है। सिर्फ गाडी देने के लिए है।

**स्नेहा पांडे :-**

दोनो है। वॉर्ड की साफसफाई का भी कॉन्ट्रॅक्ट.....

**शरद पाटील :-**

साफसफाई और गाडी दोनो एक साल के लिए होना चाहिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, दोनो एक साल का ठेका है। आपको मालूम है की, जो आदमी बिझनेस करता है। वह बिझनेस चलेगा की नही चलेगा इसलीए इन्वेस्टमेन्ट नही करता है। उसको इन्वेस्टमेन्ट करने की ताकद है तो करेगा। आप उसकी फिक्र मत किजीए। ठरावावर मतदान करा.

**मा. महापौर :-**

एकूण दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील साहेब यांनी मांडलेला आहे. दुसरा ठराव सन्मा. सदस्य श्री. मदन सिंह यांनी मांडलेला आहे. दोन ठराव आल्यामुळे मतदान घेणे गरजेचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठराव वाचा. ठराव वाचल्यानंतर आम्ही काही प्रश्न विचारु. त्याची उत्तरे तर द्यायला लागतील ना.

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव वाचा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. श्री. मिलन पाटील आणि अनुमोदक सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील आहेत. दुसरा ठराव सुचक सन्मा. श्री. मदन सिंह आणि अनुमोदक सन्मा. श्री. रामनाराण दुबे आहेत. अनुक्रमे मी दुसरा ठरावाचे वाचन करतो. **मा. आयुक्त सो. यांच्या विषया संदर्भात गोषवारा वाचन करण्यात आला.** शहरातील प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाईची कामे कंत्राट पद्धतीने ठेकेदारामार्फत केली जात आहेत. सध्या शहराची एकूण १९ गटामध्ये विभागणी करण्यात आली असुन १६६१ कंत्राटी कामगार व घनकचरा वाहतुकीसाठी ६७ वाहने यांच्यामार्फत साफसफाईची कामे केली जात आहेत. प्रभागनिहाय साफसफाई कामच्या ठेक्याची मुदत दि. ०८/१०/२००९ रोजी संपत आहे.

शहराची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढत असुन उघड्यावर दैनंदिन बाजार मोठ्याप्रमाणावर भरत आहेत. शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल, मल्टीप्लेक्स यामध्ये घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये औद्योगिक वसाहत देखील मोठ्याप्रमाणात आहेत. शहराचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने वाढत्या लोकसंख्ये बरोबर घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. वाढती लोकसंख्या, वाढते घनकचऱ्याचे प्रमाण, घरोघरी जाउन कचरा गोळा करून उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वाहतुक करावी लागत आहे.

दैनंदिन कामात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने शहराचे २४ गटामध्ये विभाजन करण्यात आले. प्रत्येक गटामध्ये समाविष्ट केलेल्या प्रभागामधील रस्ते, गटारे, साफसफाई कामाची घनता व त्या गटातुन दररोज उत्पन्न होणारा कचरा तसेच नविन नागरी वस्तीमधील साफसफाई कामाचा व दररोज निघणारा कचरा याचा विचार करून, प्रत्येक गटाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता देत आहे.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई ठेकेदारांमार्फत केली जात आहे. परंतु, पावसाळ्यामध्ये पावसाळ्यापुर्वी प्रभागा अंतर्गत असलेले कच्चे / पक्के नाले त्याची देखील दर वर्षी वेगळ्या यंत्रणेमार्फत नालेसफाईची कामे करावी लागतात. प्रभागामध्ये असलेले (पावसाळ्यापुर्वी सफाई करावयाचे) कच्चे /पक्के नाले ही कामे प्रभागसफाई कामाबरोबर एकत्रित ठेका काढून करून घेतल्यास संबंधित ठेकेदारावर दोन्ही कामाची जबाबदारी निश्चित करून काम परिणामकारक होण्यास मदत होईल. नालेसफाईच्या कामाबाबत संबंधित ठेकेदारास जबाबदार धरता येईल व पर्यायाने जबाबदारी निश्चित केल्यास ठेकेदारास त्याचा धाक निर्माण होईल.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई व प्रभाग अंतर्गत नालेसफाई कामी एकत्रितपणे ठेकेदार निश्चित करून कामे परिणामकारक होणेस मदत होईल. शहरातील रस्ते, गटारे सफाई करणे, घरोघरी जाउन कचरा गोळा करणे तसेच कचऱ्याची वाहतुक करणे ही दैनंदिन कामे रोजच्या रोज परिणामकारक करून घेण्याच्या दृष्टीने ठेकेदारांवर बंधनकारक अशा अटी लादण्यात याव्यात. कामे परिणामकारक होतील यादृष्टीने अटी व शर्ती तयार करण्यात याव्यात व तसेच प्रत्येक वाहनामध्ये जी.पी.आर.एस. सिस्टीम बसवण्यात यावी. तसेच प्रत्येक सफाई कर्मचाऱ्यांची हजेरी पंचीग मशिनद्वारे घेउन त्याप्रमाणे पगार देण्यात यावा. तसेच ठेकेदाराचे टेंडर ऑनलाईन मध्ये व्यवस्था करावी. असा ठराव मांडत आहे.

दैनंदिन प्रभाग साफसफाई व प्रभागाअंतर्गत येणारे नाले पावसाळ्यापुर्वी कराव्या लागणाऱ्या नालेसफाई कामाचा समावेश करून दोन्ही कामाचा एकत्रितपणे ठेका १ वर्षाच्या मुदतीच्यासाठी देण्याच्या कामास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

सुचक सन्मा. श्री. मदन सिंह व अनुमोदन सन्मा. श्री. रामनारायण दुबे आहेत. दुसरा ठराव आहे, सुचक सन्मा. श्री. मिलन पाटील आणि अनुमोदक सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील **मा. आयुक्त सो. यांच्या विषया संदर्भात गोषवारा वाचन करण्यात आला.** मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या मोठ्याप्रामाणात वाढत असून उघड्यावर दैनंदिन बाजार मोठ्याप्रमाणावर भरत आहेत. शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल, मल्टीप्लेक्स यामध्ये घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये औद्योगिक वसाहत देखील मोठ्याप्रमाणात आहेत. शहराचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने वाढत्या लोकसंख्ये बरोबर घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. वाढती लोकसंख्या, वाढते घनकचऱ्याचे प्रमाण, घरोघरी जाउन कचरा गोळा करून उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वाहतुक करावी लागत आहे. वाढती लोकसंख्या व वाढता घनकचरा यासर्वांचा विचार करता सध्या असलेल्या कंत्राटी मजुर व वाहनांमध्ये वाढ करावी लागणार आहे.

दैनंदिन कामात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने शहराचे २४ गटामध्ये विभाजन करण्यात आले. प्रत्येक गटामध्ये समाविष्ट केलेल्या प्रभागामधील रस्ते, गटारे, साफसफाई कामाची घनता व त्या गटातुन दररोज उत्पन्न होणारा कचरा तसेच नविन नागरी वस्तीमधील साफसफाई कामाचा व दररोज निघणारा कचरा याचा विचार करून, प्रत्येक गटाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता देत आहे.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई ठेकेदारांमार्फत केली जात आहे. परंतु, पावसाळ्यामध्ये पावसाळ्यापुर्वी प्रभागा अंतर्गत असलेले कच्चे / पक्के नाले त्यांची देखील दर वर्षी वेगळ्या यंत्रणेमार्फत नालेसफाईची कामे करावी लागतात. प्रभागामध्ये असलेले (पावसाळ्यापुर्वी सफाई करावयाचे) कच्चे /पक्के नाले ही कामे प्रभागसफाई कामाबरोबर एकत्रित ठेका काढून करून घेतल्यास संबंधित ठेकेदारावर दोन्ही कामाची जबाबदारी निश्चित करून काम परिणामकारक होण्यास मदत होईल. नालेसफाईच्या कामाबाबत संबंधित ठेकेदारास जबाबदार धरता येईल व पर्यायाने जबाबदारी निश्चित केल्यास ठेकेदारास त्याचा धाक निर्माण होईल.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई व प्रभाग अंतर्गत नालेसफाई कामी एकत्रितपणे ठेकेदार निश्चित करून कामे परिणामकारक होणेस मदत होईल. शहरातील रस्ते, गटारे सफाई करणे, घरोघरी जाउन कचरा गोळा करणे तसेच कचऱ्याची वाहतुक करणे ही दैनंदिन कामे रोजच्या रोज परिणामकारक करून घेण्याच्या दृष्टीने ठेकेदारांवर बंधनकारक अशा अटी लादण्यात याव्यात. कामे परिणामकारक होतील यादृष्टीने अटी व शर्ती तयार करण्यात याव्यात.

मिरा भाईंदर महानगरपालिका पुर्वापारपासुन डंम्परद्वारे कचरा वाहतुक करण्यात येत आहे. याकामी ठेकेदार हे जुन्या पद्धतीचे उघड्या स्वरूपाचे डंपर वापरत असतात. त्यामुळे कचरा वाहतुक करतेवेळी काहीवेळा कचरा रस्त्यावर इतरस्तः पडून त्यापासुन दुर्गंधी पसरून नागरिकांना नाहक त्रास होत असतो. महानगरपालिकेने बृहन्मुंबई महापालिकेच्या धर्तीवर आवश्यकतेनुसार बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टरद्वारे कचरा उचलून वाहतुक केल्यास एका बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टर मार्फत मोठ्याप्रमाणावर कचरा वाहतुक करता येईल. बंदिस्तवाहने/कॉम्पॅक्टरसाठी मोठ्याप्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार असल्याने सदरचे टेंडर हे पाच वर्षासाठी काढणेस तसेच दैनंदिन प्रभाग साफसफाई व प्रभागा अंतर्गत येणारे नाले पावसाळ्यापुर्वी कराव्या लागणाऱ्या नालेसफाई कामाचा समावेश करून दोन्ही कामाचा एकत्रितपणे ठेका देण्याच्या कामास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. वॉर्डप्रमाणे कर्मचारी नेमावेत व त्यांना गणवेश देण्यात यावा तसेच त्यावर वॉर्ड क्र. नोंदवावा. तसेच दैनंदिन साफसफाईचा ठेका १ वर्षासाठी द्यावा व घनकचरा व्यवस्थापन ५ वर्षासाठी द्यावा. दोन्ही टेंडर ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात यावेत. असे दोन ठराव आहेत. पहिला आणि दुसरा दोन्ही ठराव वाचले.

**प्रफुल्ल पाटील :-**

याच्यात अजून थोडीशी अशी दुरुस्ती आहे की, घनकचरा व्यवस्थापनाला ज्या गाड्या लागतील. त्यांचे रेट जे ठाणे महानगरपालिका देते. हे त्या फेऱ्यांप्रमाणे त्यांचे रेट फिक्स करावेत. त्याचा रेकॉर्ड जो वे ब्रिज आहे तो वेस्ट मॅनेजमेंटच्या प्रोजेक्टवर त्या तिथून तो रेकॉर्ड घ्यावा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, याच्यामध्ये एक सुचना लिहून घ्या की, ज्या छोट्या गल्ल्या आहेत. तिथे लॉऱ्या जात नाहीत. छोटे टेम्पो त्या ठरावामध्ये समाविष्ट करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

छोट्या गल्ल्यांमध्ये छोटे टेम्पो घ्यायला सांगा. ४०७ चा टेम्पो जाईल. ४०७ च्या टेम्पोवर आपण कॉम्पॅक्ट बसवू शकतो.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये थ्री व्हीलर ठेवू. म्हणजे गल्लीबोळात जातील.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण ते ठरावात समाविष्ट करा.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, अटीशर्ती टाकताना त्यामध्ये तुम्ही जीपीआरएस सिस्टम आणि थम मशिन घेणार आहात. महापालिकेच्या गाड्यांवर जीपीआरएस सिस्टम नाही. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांची तुम्ही तशी हजेरी घेत नाही. मग तुम्ही ठेकेदाराला कसे करता? आणि पुन्हा त्याचा भुर्दंड महापालिकेवरच पडणार आहे. या असल्या अटी टाकू नये......

**मा. महापौर :-**

एकूण दोन ठराव आलेले आहेत.

**नगरसचिव :-**

प्रथम मी दुसरा ठराव मतदानाला टाकतो. सुचक श्री. मदन सिंह, अनुमोदक सन्मा. श्री. रामनाराण दुबे. दोन्ही ठराव वाचलेले आहेत. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाला तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | शानु जोरावरसिंग गोहिल | १ | राजु यशवंत भोईर |
| २ | वर्षा गिरधर भानुशाली | २ | पाटील उमाताई शाम | २ | जाधव मोहन महादेव |
| ३ | सिंह मदन उदितनारायण | ३ | दिनेश दगडू नलावडे | ३ | प्रविण मोरेश्वर पाटील |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | पाटील अनंत रामचंद्र |
| ५ | शरद केशव पाटील | ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | पालांडे प्रशांत जाधव |
| ६ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| ७ | बाविघर सिसिलीया विजय | ७ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ७ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| ८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | ८ | निर्मला बाबूराव सावळे | | |
| ९ | पांडे स्नेहा शैलेश | ९ | कुरेशी याकुब ईस्माईल | | |
| १० | दुबे रामनारायण सदानंद | १० | भोईर शशिकांत जगन्नाथ | | |
| ११ | यादव मिरादेवी रामलाल | ११ | सुनिता शशिकांत भोईर | | |
| | | १२ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | | |
| | | १३ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | |
| | | १४ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | | |
| | | १५ | जंगम लक्ष्मण गणपत | | |
| | | १६ | सपार उमा विश्वनाथ | | |
| | | १७ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | | |
| | | १८ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | | |
| | | १९ | सय्यद नुरजहाँ नझरहुसैन | | |
| | | २० | शेख नुर मोहम्मद अेहमद | | |
| | | २१ | शफीक अहमद सादत खान | | |
| | | २२ | भाटकर प्रेरणा प्रमोद | | |
| | | २३ | मर्लिन मर्विन डिसा | | |
| | | २४ | वैती विजया हेमचंद्र | | |
| | | २५ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | | |
| | | २६ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | |
| | | २७ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | |
| | | २८ | दिप्ती भट | | |
| | | २९ | अनिल दिवाकर सावंत | | |
| | | ३० | शेख सलिम दाउद | | |
| | | ३१ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | |
| | | ३२ | गणेश गोपाळ शेट्टी | | |
| | | ३३ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | |
| | | ३४ | व्यास सुधा वासुदेव | | |
| | | ३५ | पाटील प्रेमनाथ गजानन | | |
| | | ३६ | नयना गजानन म्हात्रे | | |
| | | ३७ | वैती नर्मदा यशवंत | | |
| | | ३८ | पाटील जयंत महादेव | | |
| | | ३९ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | |
| | | ४० | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | |
| | | ४१ | पाटील मिलन गोविंदराव | | |
| | | ४२ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | |
| | | ४३ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | | |
| | | ४४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | |
| | | ४५ | शर्मा भगवती तुगनचंद | | |
| | | ४६ | पाटील वंदना मंगेश | | |
| | | ४७ | चक्रे वंदना रामदास | | |
| | | ४८ | माळी हेमा रविंद्र | | |
| | | ४९ | जोत्स्ना जालिंदर हसनाळे | | |
| | | ५० | अनिता जयवंत पाटील | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ५१ | परेरा टेरी पॉल | | |

**नगरसचिव :-**

पहिला ठराव आहे सुचक श्री. मिलन पाटील अनुमोदक श्री. प्रफुल्ल पाटील या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाला तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शानु जोरावरसिंग गोहिल | १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | राजु यशवंत भोईर |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | २ | जाधव मोहन महादेव |
| ३ | दिनेश दगडू नलावडे | ३ | सिंह मदन उदितनारायण | ३ | प्रविण मोरेश्वर पाटील |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | पाटील अनंत रामचंद्र |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | शरद केशव पाटील | ५ | पालांडे प्रशांत जाधव |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | ६ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| ७ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ७ | बाविघर सिसिलीया विजय | ७ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| ८ | निर्मला बाबूराव सावळे | ८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | |
| ९ | कुरेशी याकुब ईस्माईल | ९ | पांडे स्नेहा शैलेश | | |
| १० | भोईर शशिकांत जगन्नाथ | १० | दुबे रामनारायण सदानंद | | |
| ११ | सुनिता शशिकांत भोईर | ११ | यादव मिरादेवी रामलाल | | |
| १२ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | | | | |
| १३ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | | | |
| १४ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | | | | |
| १५ | जंगम लक्ष्मण गणपत | | | | |
| १६ | सपार उमा विश्वनाथ | | | | |
| १७ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | | | | |
| १८ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | | | | |
| १९ | सय्यद नुरजहाँ नझरहुसैन | | | | |
| २० | शेख नुर मोहम्मद अेहमद | | | | |
| २१ | शफीक अहमद सादत खान | | | | |
| २२ | भाटकर प्रेरणा प्रमोद | | | | |
| २३ | मर्लिन मर्विन डिसा | | | | |
| २४ | वैती विजया हेमचंद्र | | | | |
| २५ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | | | | |
| २६ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | | |
| २७ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | | |
| २८ | दिप्ती भट | | | | |
| २९ | अनिल दिवाकर सावंत | | | | |
| ३० | शेख सलिम दाउद | | | | |
| ३१ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | | |
| ३२ | गणेश गोपाळ शेट्टी | | | | |
| ३३ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | | | |
| ३४ | व्यास सुधा वासुदेव | | | | |
| ३५ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | | |
| ३६ | नयना गजानन म्हात्रे | | | | |
| ३७ | वैती नर्मदा यशवंत | | | | |
| ३८ | पाटील जयंत महादेव | | | | |
| ३९ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | | |
| ४० | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | | |
| ४१ | पाटील मिलन गोविंदराव | | | | |
| ४२ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | | |
| ४३ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | | | | |
| ४४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | | |
| ४५ | शर्मा भगवती तुगनचंद | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | पाटील वंदना मंगेश | | | | |
| ४७ | चक्रे वंदना रामदास | | | | |
| ४८ | माळी हेमा रविंद्र | | | | |
| ४९ | जोत्स्ना जालिंदर हसनाळे | | | | |
| ५० | अनिता जयवंत पाटील | | | | |
| ५१ | परेरा टेरी पॉल | | | | |

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. मिलन पाटील यांनी जो ठराव मांडला त्यांच्या बाजूने ५० लोकांनी, विरोधात ११ लोकांनी आणि तटस्थ ७ लोकांनी मतदान केलेले आहे. आणि सन्मा. श्री. मदन सिंह यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्याच्या विरोधात ५० सदस्यांनी मतदान केलेले आहे. ११ सदस्यांनी बाजूने मतदान केलेले आहे आणि ०७ सदस्य तटस्थ आहेत. मी सन्मा. श्री. मिलन पाटील यांचा ठराव बहुमताने स्विकारत आहे.

**एस. ए. खान :-**

त्याच्यावर काही शेरा लिहू नका.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब, इस ठराव की सर्टीफाईड कॉपी हम लोगो को दे दी जाए। कब तक दी जाएगी?

**लक्ष्मण जंगम :-**

हा ठराव इथे मेजोरीटीने पास झालेला आहे. त्याच्यावर तुम्ही रुलिंग वगैरे देणार नाही ना? कारण याच्या आधी तुम्ही दिलेले आहेत.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, दुसरा विषय घ्या. सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील साहेबांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर झाला.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण दोघांनी कोकण आयुक्तांकडे समर्थन दिले होते. ते राष्ट्रवादी सोबत दिले होते आणि राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी मांडलेल्या ठरावाला आपण या ठिकाणी विरोध केलेला आहे. याची नोंद घेण्यात येईल. तसेच मा. महापौर आपल्या स्थानामध्ये पिठासीन अधिकारी म्हणून बसलेले असताना, आणि त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी मांडलेला ठराव, त्यांच्या लोकांनी मांडलेला ठराव हा फेल झालेला आहे, नामंजुर झालेला आहे. म्हणून मा. महापौरांची नैतिक जबाबदारी आहे की, त्यांनी लवकरात लवकर खुर्ची खाली करावी आणि मला वाटते की, नैतिक जबाबदारी त्यांना कळत असेल तर त्यांनी जास्त वेळ तिकडे थांबू नये.

**शरद पाटील :-**

सन्मा. सभागृहनेते साहेबांनी यांच्या माणसांनी मांडलेला ठराव ही वापरलेली भाषा, यांच्या माणसांनी यांचा उपमहापौर बनवला याची कदर यांना त्यावेळेला नव्हती. ती मतेसुध्दा आम्ही दिलेली आहेत. याचेसुध्दा त्यांनी थोडे ध्यान राखावे.

**जयंत पाटील :-**

आम्ही मा. महापौरांबद्दल बोलतो. तुम्हाला कशाला राग येतो?

**शरद पाटील :-**

त्यांच्या माणसांनी बोलले. ते शब्द ऐका।

(सभागृहात गोंधळ)

**लक्ष्मण जंगम :-**

सभागृहामध्ये चर्चा होते आणि ज्यावेळेला अतिमहत्वाची चर्चा होते. त्यावेळेला मला वाटते ऐकून घेण्याची गरज आहे. विषय असा आहे की, आत्ता श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, मा. महापौरांनी मांडलेला ठराव या ठिकाणी नामंजुर झाला. म्हणून त्यांनी राजीनामा द्यावा. मला असे वाटते की, या शहरामध्ये मा. महापौरांच्या विरोधात वृत्तपत्रांमध्ये वारंवार विचित्र बातम्या आल्या. त्याचा ते कधी खुलासा करू शकले नाहीत. सभागृहामध्ये सर्व नगरसेवकांनी त्यांच्या वॉर्डमध्ये जाउन इंटरफेअर करतात, त्यांनी केलेल्या कामाचे श्रेय लाटतात अशा पद्धतीनेच गंभीर स्वरूपाचे आरोप केले. तेव्हासुद्धा मा. महापौरांनी विश्लेषण केले नाही. खुलासा केला नाही. तर मला असे वाटते की, या सगळ्या गोष्टी लक्षात घेता आणि आत्ता तर सभागृहामध्ये सर्व सभागृहाच्या वतीने याठिकाणी सांगितलेले आहे की, त्यांनी राजीनामा द्यावा. मला असे वाटते की, मा. महापौरांनी ही सगळी जबाबदारी घेउन थोडेसे सुद्धा जर त्यांना वाटत असेल की, मान सन्मानाने या शहरवासियांनी आपल्याकडे बघावे. तर निश्चितपणे त्यांनी राजीनामा द्यावा.

**वंदना पाटील :-**

मला एक प्रश्न विचारायचा आहे की, मा. महापौर साहेब, केबिन नाक्यावर मच्छी मार्केट होते की नव्हते मला याचे उत्तर हवे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आत्ता सभागृहामध्ये आपल्या राजीनाम्याची गोष्ट चालली. आपल्याबद्दल वर्तमानपत्रात अनेक गोष्टी येतात. या महाराष्ट्रामध्ये....

**मा. महापौर :-**

मला एवढे ज्ञान आहे की, नो स्टोन्स आर थ्रोन ऑन द फ्रुटलेस ट्री. एवढेच मला थोडक्यात बोलायचे आहे बाकी काही नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या राज्याचे माजी मंत्री, आत्ताचे खासदार, गुन्हेगार म्हणून तुरूंगामध्ये आहेत तुमची लायकी असेल तर सर्वात पहिला श्री. शरद पवार यांचा राजीनामा मागा.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

या सभागृहामध्ये सभागृहाचे काहीतरी उपविधी आहेत. काही नियम आहेत. सभागृहामध्ये कोणत्याही मा. खासदारांचा, मा. आमदारांचा उल्लेख करू नये. असा नियम आहे. तरी सुद्धा श्री. ओमप्रकाश गारोडीया यांनी एका महान नेत्याचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्यावर अगोदर शिस्तभंगाची कारवाई करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा कुठलाही गुन्हा सिद्ध झालेला नाही. तुम्ही कशावरून राजीनामा मागता.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

जेवणाची सुट्टी जाहिर करतो. लंच टाईम नंतर सभा चालू करावी.

(लंच टाईम दु. २.०० वा.)

**नगरसचिव :-**

जेवणाच्या सुट्टीनंतर सभेला सुरूवात होत आहे. प्रकरण क्र. १४.....

**वंदना चक्रे :-**

सचिव साहेब, सभा चालू देणार नाही. भाजपाच्या गटनेत्यांनी श्री. पवार साहेबांकडून.....

**मा. महापौर :-**

ते वगळून टाकलेले आहे.

**वंदना चक्रे :-**

वगळून कसे टाकणार आहे? का वगळून टाकणार? सभा चालू देणार नाही.

**जयंत पाटील :-**

त्यांनी माफी मागितली पाहिजे.

**वंदना चक्रे :-**

माफी मागितली पाहिजे. जाहिर माफी मागावी. श्री. पवार साहेब आमच्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. त्यांचा इथे काय संबंध? यांची काय औकात आहे. त्यांनी का बोलावे. त्यांनी माफी मागावी तरच सभा चालेल. नाहीत सभा चालू देणार नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, या ठिकाणी भाजपचे गटनेते श्री. ओमप्रकाश गाडोदीया यांनी या देशाचे नेते आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या बद्दल जे अनुद्‌गार काढलेले आहेत. मला वाटते की, श्री. ओमप्रकाश गाडोदीया यांची राजकिय मॅच्युरीटी संपलेली दिसते. किंबहुना त्यांना राजकीय मॅच्युरीटी आहे की नाही हे समजत नाही. खरे म्हणजे श्री. शरद पवार यांच्या सारख्या देशाचे नेतृत्व करणाऱ्या अशा विशाल व्यक्तीला या ठिकाणी या सभागृहात त्यांच्याबद्दल अनुदगार काढणे योग्य नाही. त्यांना त्यांच्या नेत्यांचाही विसर पडलेला दिसतो. आरणीय श्री. वाजपेयी जी, आदरणीय श्री. अडवाणी साहेब यांनी देखील श्री. शरद पवार साहेबांबद्दल प्रत्येक वेळी आदराची भावना व्यक्त केलेली आहे. किंबहुना केंद्र सरकारमध्ये जेव्हा भाजपाचे आघाडी सरकार होते. त्यावेळी देखिल श्री. शरद पवार यांना आपात्कालीन व्यवस्थापन ज्याला आपण डिजास्टर मॅनेजमेंट म्हणतो, त्याचे केंद्रीय मंत्री स्तरावर त्यांना पद दिले होते. एवढे असुन सुद्धा त्यांनी खरे म्हणजे त्यांच्या नेत्यांकडून शिकायला पाहिजे की, श्री. शरद पवार यांच्याबद्दल सर्वच विरोधी पक्षातील म्हणा किंवा स्वपक्षातील म्हणा, सगळे लोक नेहमी आदराने पाहात असतात. त्यांच्याबद्दल आदराने वक्तव्य करत असतात. परंतु, यांना राजकिय मॅच्युरिटी दिसतच नाही. दिवाळखोरीत झालेली आहे. असे मला वाटते. क्ष्यांच्या बुद्धीची चाचणी केली पाहिजे. अशा ठिकाणी आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेत आदरणीय श्री. शरद पवार साहेबांबद्दल असे वक्तव्य करणे योग्य नाही. त्यांनी याठिकाणी जाहिरपणे माफी

मागावी. त्यांना आम्ही या ठिकाणी बसू देणार नाही. अशी भुमिका आम्ही घेणार आहोत. त्यांनी कृपया माफी मागावी.

**वंदना चक्रे :-**

माफी मागावी. माफी मागितल्याशिवाय आम्ही सभागृह चालू देणार नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेच्या सभागृहाचे कामकाज चालविते वेळी एक उपविधी आहे. आणि सन्मा. सदस्यांची मला वाटते चौथी टर्म आहे. म्हणजे आज वीस वर्षे नगरसेवक आहेत. त्यामुळे उपविधी काय आहे त्याच्याबद्दल त्यांना माहिती असावी. उपविधी २(ब) मध्ये लिहिलेले आहे की, भाषण करताना पालिका सदस्यांनी भारत सरकारचा म्हणून भारताच्या राष्ट्रपतीचा किंवा संघराज्याच्या किंवा राज्य शासनाच्या म्हणून राज्यपालांच्या किंवा राज्यमंत्र्यांच्या कामातील दोष दाखवता कामा नये. त्यांचा उल्लेख करू नये असे स्पष्ट निर्देष आहेत. त्या उपविधीचा जर त्यांना अभ्यास नसेल तर त्यांनी या सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेणे मला इष्ट दिसत नाही. त्यांना बाहेरचाच रस्ता दाखवावा.

**वंदना चक्रे :-**

आम्ही भाजपाच्या गटनेत्यांचा निषेध करतो. त्यांनी जाहिर माफी मागावी.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, मेरी भी एक शंका है। मा. महापौर साहब ने सभा के चलते हुए इशारा करके सन्मा. नगरसेवक श्री. शरद पाटील साहब को बुलाया था। क्या एक नगरसेवक को सभा के चलते हुए मा. महापौर साहब, अकेले बात करने के लिए ऐसे बुला सकते है? मुझे इसकी जानकारी चाहिए।

**आसिफ शेख :-**

सर्वप्रथम त्यांनी माफी मागावी नंतर सभागृहाचे कामकाज सुरू होईल.

**अनिल सावंत :-**

फक्त माफी नाही. याच्यापुढे त्यांनी कोणत्याही नेत्यांचा उल्लेख करू नये.

**शरद पाटील :-**

डॉक्टर साहेबांनी चांगली सुचना केलेली आहे आणि मला ते पटले आहे. त्याच्यापुढे कोण गेले तर डॉक्टर साहेब आपण उठून परत विचारत जा. कारण बरेचसे वर जातात.

**राजेंद्र जैन :-**

नगरसेवक आपने इच्छा से जाता है उसपर अलग है। लेकीन मा. महापौर साहबने आपको बुलाया है।

**शरद पाटील :-**

साहब, मैने आपकी सुचना का आदर किया है। आपने अच्छी सुचना रखी है। ऐसी रख किजिए।

**वंदना चक्रे :-**

त्यांना बाहेर हाकला त्यांची इकडे बसायची औकात नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, एक गोष्ट लक्षात ठेवा, ठिक आहे, तुम्ही त्यांना माफी मागायला सांगा पण आत्ता जे वक्तव्य होते ते योग्य नाही.

**वंदना चक्रे :-**

योग्य का नाही?

**शरद पाटील :-**

आपण जे एकेरी शब्दाने बोलता हे आपले शब्द योग्य नाहीत. ते दोषी असतील तर आपणसुद्धा दोषी आहात आणि आपल्याला सुद्धा माफी मागायला लागेल.

**वंदना चक्रे :-**

मी माफी मागणारच नाही.

**शरद पाटील :-**

पण आपल्याला असे बोलायचा अधिकार नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवाल जी आपण माफी मागावी आणि विषय संपवावा.

**एस. ए. खान :-**

त्यांनी आज जे वक्तव्य केले आहे. त्यांना आजच्या कामकाजातुन सस्पेंड करा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, आम्हाला पुर्ण खात्री आहे की, ते आपला शब्द पूर्ण पणे पाळतील.

**मिलन पाटील :-**

एवढी उपविधी वाचून दाखविली तरीसुद्धा परिणाम नाही. त्यांनी माफी मागावी.

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, सभा का कामकाज शांती से चले इसलिए मै आपको निवेदन करता हु की, अपने शब्द वापस ले लिजिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, हमारे सन्मा. नगरसेवकने उपविधी का अभी उल्लेख किया साहब इनको मालूम नही है, शायद नये है। मै बिस साल से हूँ। उनको मालूम नही है की, अब तक उपविधी मंजुर नही है। जब उनको जरूरत पडती है......

**अनिल सावंत :-**

मंजुर नही है तो उपविधी के बगैर कामकाज चल रहा है क्या? तो उसको फेक दो। मंजुरी होगी तब होगी। तब तक सभागृह का कामकाज तो चल रहा है ना। तो उसके कायदे कानुन से ही चल रहा है।

**भगवती शर्मा :-**

सचिव महोदय इसमे खुलासा है की, वो उपविधी कोई काम की नही है क्या?

**नगरसचिव :-**

उपविधी कामकाजाची आहे. एकदा शासनाकडे पाठवल्या नंतर ते मंजुर झाले असे समजुनच कामकाज चालते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, तुमचे वक्तव्य मी तुमच्याच प्रोसिडींगमध्ये दाखवणार. आपण सांगितले की, जो पर्यंत उपविधीला मंजुरी मिळत नाही. तोपर्यंत ती उपविधी या सभागृहात मान्यता, हे तुमचे शब्द आहेत. मी तुम्हाला रेकॉर्ड दाखवणार.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, सचिवांनी जर असे वेगवेगळे स्टेटमेंट केले असेल की, पुर्वी कधी सांगितले असेल की, ती उपविधी मंजुर नाही, म्हणून होत नाही. आत्ता सांगितले असेल की, ती उपविधी मंजुरीला पाठवली आहे, म्हणजे मंजुर आहे असे समजावे. तरी मुळ ॲक्टमध्ये तशी प्रोव्हीजन आहे. तुम्ही मुळ ॲक्ट वाचा. आमचे श्री. सावंत साहेब, जरी नवीन असले तरी अभ्यासु आहेत. त्यांनी नवीन कायद्याचा पण अभ्यास केला आणि जुन्या कायद्याचा पण केला आहे. जुन्या कायद्यामध्येच ही बाब आहे. असंसदीय भाषण केल्याबद्दल आपल्याला दोषी ठरवण्यात यावे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी वापरलेले शब्द या सभागृहाच्या कामकाजातुन काढून टाकावे असे मी सांगतो.

**आसिफ शेख :-**

जोपर्यंत सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी माफी मागणार नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरू होणार नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, श्री. शरद पाटील साहेब मोठ्या मनाचे आहेत. पण ज्यांनी चुक केली त्यांनी माफी मागितली पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्यांनी मा. महापौरांबद्दल अपशब्द वापरलेले आहेत. त्यांनी पहिल्यांदा माफी मागावी.

(सभागृहात गोंधळ)

**लक्ष्मण जंगम :-**

आम्ही काय गलत बोललो ते आम्हाला सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही मा. महापौरांचा या सभागृहामध्ये अपमान करता.

**लक्ष्मण जंगम :-**

ज्यांनी अपमान केला त्यांच्याबाबतीत तुम्हाला काही बोलता आले नाही. आम्ही सांगितले की, लोकांनी असे असे केले आहे. फक्त आठवण करून दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोणाची आठवण करताना आपले चरित्र किती साफ आहे ते बघायला पाहिजे.

**वंदना चक्रे :-**

बीजेपीचे गटनेता, मा. महापौरांची गोष्ट वेगळी आहे. श्री. पवार साहेब हे देशाचे नेते आहेत हे आपण विसरलात का? तुमची चौथी टर्म आहे. मिरा भाईदर महानगरपालिकेचे वेगळे आहे आणि देशाचे वेगळे आहे.

इथे बोलू शकतो, इथे उत्तर देउ शकतो, त्यांच्याबद्दल काही करू शकतो. पण त्यांच्याबद्दल बोलायचे तुमचे १०० टक्के चुकलेले आहे. तुम्ही जोपर्यंत माफी मागणार नाही तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही. आम्ही सभागृह चालू देणार नाही.

(राष्ट्रवादीच्या सर्व नगरसेवकांनी घोषणा दिल्या.)

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवालजी मा. महासभा मे कितनी बार बोला है की, प्रशासकिय खर्च कितना आता है। एक मा. महासभा का खर्च कितना आता है। एक घंटे का खर्च कितना आता है। एक सदस्य का खर्च कितना आता है। अब वह माफी नही मांग कर जो समय का उल्लंघन कर रहे है, जो हानी कर रहे है उसका कितना खर्च आयेगा वो कॅल्क्युलेट नही कर रहे है।

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवाल जी शब्द वापस ले लिजिए, कामकाज शुरू होगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब का मान रखते हुए मै बोले हूए शब्द पिछे लेता हुँ।

**जयंत पाटील :-**

परत असे शब्द बोलता कामा नये. परत असे शब्द बोलले तर काय करायचे ते आम्ही बघु.

**प्रकरण क्र. १३ :-**

वॉर्ड साफसफाई करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

**मा. आयुक्त सो. यांच्या विषया संदर्भात गोषवारा वाचन करण्यात आला.**

मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढत असून उघड्यावर दैनंदिन बाजार मोठ्याप्रमाणावर भरत आहेत. शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल, मल्टीप्लेक्स यामध्ये घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये औद्योगिक वसाहत देखील मोठ्याप्रमाणात आहेत. शहराचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने वाढत्या लोकसंख्ये बरोबर घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. वाढती लोकसंख्या, वाढते घनकचऱ्याचे प्रमाण, घरोघरी जाउन कचरा गोळा करून उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वाहतुक करावी लागत आहे. वाढती लोकसंख्या व वाढता घनकचरा यासर्वांचा विचार करता सध्या असलेल्या कंत्राटी मजुर व वाहनांमध्ये वाढ करावी लागणार आहे.

दैनंदिन कामात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने शहराचे २४ गटामध्ये विभाजन करण्यात आले. प्रत्येक गटामध्ये समाविष्ट केलेल्या प्रभागामधील रस्ते, गटारे, साफसफाई कामाची घनता व त्या गटातुन दररोज उत्पन्न होणारा कचरा तसेच नविन नागरी वस्तीमधील साफसफाई कामाचा व दररोज निघणारा कचरा याचा विचार करून, प्रत्येक गटाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता देत आहे.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई ठेकेदारांमार्फत केली जात आहे. परंतु, पावसाळ्यामध्ये पावसाळ्यापुर्वी प्रभागा अंतर्गत असलेले कच्चे / पक्के नाले त्यांची देखील दर वर्षी वेगळ्या यंत्रणेमार्फत नालेसफाईची कामे करावी लागतात. प्रभागामध्ये असलेले (पावसाळ्यापुर्वी सफाई करावयाचे) कच्चे /पक्के नाले ही कामे प्रभागसफाई कामाबरोबर एकत्रित ठेका काढून करून घेतल्यास संबंधित ठेकेदारावर दोन्ही कामाची जबाबदारी निश्चित करून काम परिणामकारक होण्यास मदत होईल. नालेसफाईच्या कामाबाबत संबंधित ठेकेदारास जबाबदार धरता येईल व पर्यायाने जबाबदारी निश्चित केल्यास ठेकेदारास त्याचा धाक निर्माण होईल.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई व प्रभाग अंतर्गत नालेसफाई कामी एकत्रितपणे ठेकेदार निश्चित करून कामे परिणामकारक होणेस मदत होईल. शहरातील रस्ते, गटारे सफाई करणे, घरोघरी जाउन कचरा गोळा करणे तसेच कचऱ्याची वाहतुक करणे ही दैनंदिन कामे रोजच्या रोज परिणामकारक करून घेण्याच्या दृष्टीने ठेकेदारांवर बंधनकारक अशा अटी लादण्यात याव्यात. कामे परिणामकारक होतील यादृष्टीने अटी व शर्ती तयार करण्यात याव्यात.

मिरा भाईंदर महानगरपालिका पुर्वापारपासुन डंम्परद्वारे कचरा वाहतुक करण्यात येत आहे. याकामी ठेकेदार हे जुन्या पद्धतीचे उघड्या स्वरूपाचे डंपर वापरत असतात. त्यामुळे कचरा वाहतुक करतेवेळी काहीवेळा कचरा रस्त्यावर इतरस्तः पडून त्यापासुन दुर्गंधी पसरून नागरिकांना नाहक त्रास होत असतो. महानगरपालिकेने बृहन्मुंबई महापालिकेच्या धर्तीवर आवश्यकतेनुसार बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टरद्वारे कचरा उचलून वाहतुक केल्यास एका बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टर मार्फत मोठ्याप्रमाणावर कचरा वाहतुक करता येईल. बंदिस्तवाहने/कॉम्पॅक्टरसाठी मोठ्याप्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार असल्याने सदरचे टेंडर हे पाच वर्षासाठी काढणेस तसेच दैनंदिन प्रभाग साफसफाई व प्रभागा अंतर्गत येणारे नाले पावसाळ्यापुर्वी कराव्या लागणाऱ्या नालेसफाई कामाचा समावेश करून दोन्ही कामाचा एकत्रितपणे ठेका देण्याच्या कामास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. वॉर्डप्रमाणे कर्मचारी नेमावेत व त्यांना गणवेश देण्यात यावा तसेच त्यावर वॉर्ड क्र. नोंदवावा. तसेच दैनंदिन साफसफाईचा ठेका १ वर्षासाठी द्यावा व घनकचरा व्यवस्थापन ५ वर्षासाठी द्यावा. दोन्ही टेंडर ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात यावेत.

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रफुल्ल पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शानु जोरावरसिंग गोहिल | १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | राजु यशवंत भोईर |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | २ | जाधव मोहन महादेव |
| ३ | दिनेश दगडू नलावडे | ३ | सिंह मदन उदितनारायण | ३ | प्रविण मोरेश्वर पाटील |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | पाटील अनंत रामचंद्र |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | शरद केशव पाटील | ५ | पालांडे प्रशांत जाधव |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | ६ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| ७ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ७ | बाविघर सिसिलीया विजय | ७ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| ८ | निर्मला बाबूराव सावळे | ८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | |
| ९ | कुरेशी याकुब ईस्माईल | ९ | पांडे स्नेहा शैलेश | | |
| १० | भोईर शशिकांत जगन्नाथ | १० | दुबे रामनारायण सदानंद | | |
| ११ | सुनिता शशिकांत भोईर | ११ | यादव मिरादेवी रामलाल | | |
| १२ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | | | | |
| १३ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | | | |
| १४ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | | | | |
| १५ | जंगम लक्ष्मण गणपत | | | | |
| १६ | सपार उमा विश्वनाथ | | | | |
| १७ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | | | | |
| १८ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | | | | |
| १९ | सय्यद नुरजहाँ नझरहुसैन | | | | |
| २० | शेख नुर मोहम्मद अेहमद | | | | |
| २१ | शफीक अहमद सादत खान | | | | |
| २२ | भाटकर प्रेरणा प्रमोद | | | | |
| २३ | मर्लिन मर्विन डिसा | | | | |
| २४ | वैती विजया हेमचंद्र | | | | |
| २५ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | | | | |
| २६ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | | |
| २७ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | | |
| २८ | दिप्ती भट | | | | |
| २९ | अनिल दिवाकर सावंत | | | | |
| ३० | शेख सलिम दाउद | | | | |
| ३१ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | | |
| ३२ | गणेश गोपाळ शेट्टी | | | | |
| ३३ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | | | |
| ३४ | व्यास सुधा वासुदेव | | | | |
| ३५ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | | |
| ३६ | नयना गजानन म्हात्रे | | | | |
| ३७ | वैती नर्मदा यशवंत | | | | |
| ३८ | पाटील जयंत महादेव | | | | |
| ३९ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | | |
| ४० | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | | |
| ४१ | पाटील मिलन गोविंदराव | | | | |
| ४२ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | | |
| ४३ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | | | | |
| ४४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | | |
| ४५ | शर्मा भगवती तुगनचंद | | | | |
| ४६ | पाटील वंदना मंगेश | | | | |
| ४७ | चक्रे वंदना रामदास | | | | |
| ४८ | माळी हेमा रविंद्र | | | | |
| ४९ | जोत्स्ना जालिंदर हसनाळे | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५० | अनिता जयवंत पाटील | | | | |
| ५१ | परेरा टेरी पॉल | | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापनेबाबत.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, हा जो विषय आहे ह्या विषयाचा प्रशासनाच्या वतीने पहिला खुलासा करावा की, नेमका हा प्रस्ताव काय आहे? आपल्याला काय करायचे आहे? कारण या प्रस्तावामुळे बाहेर जनते.....

**जयंत पाटील :-**

हा ठराव मांडल्यानंतर आपण चर्चा करा.

**प्रकाश दुबोले :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब, हा विषय आपल्याला माहिती आहे. सर्व सभासदांना पण माहिती असेल. परंतु, बाहेर त्याचा थोडा वेगळा मॅसेज गेलेला आहे. म्हणून जरा प्रशासनाने खुलासा केला की, आपल्याला थोडे बोलायला सोपे जाईल.

**मा. महापौर :-**

श्री. दुबोले जी बसुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, अनधिकृत आणि अतिक्रमण बांधकामासाठी शासनाने जो जी.आर. केलेला आहे. त्याच्या अगोदरच महापालिकेने एकदा निर्णय घेउन पोस्ट मंजुरीसाठी पाठवलेल्या आहेत. दि. १९/११/२००८ ला ठराव क्र. ६८ आहे. तर प्रत्येक महापालिकेने स्वतःच्या खर्चाने कार्यालयामध्ये पोलिस बंदोबस्त ठेवावा. अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमणासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन असावे. हे सर्व महाराष्ट्रातील कॉर्पोरेशनमध्ये आणि महानगरपालिकेमध्ये या पद्धतीने पद मंजुर करून घेण्यासाठी शासनाने जी.आर. काढून कळवलेले आहे. त्याचा खर्च महापालिका उचलणार आहे. तर चारही महापालिका मिळून कोर्टाची जी स्थापना आहे ती ठाणे महापालिकेवर सोपवलेली आहे. तरीदेखिल आपण प्रस्तावामध्ये स्वतंत्र कोर्ट असावे म्हणून दिलेले आहे. कारण वकीलांची सुद्धा मागणी आहे. आणि इथे मेजर केसेस अनधिकृत बांधकामाच्याचा आहेत. दुसऱ्या केसेस कमी आहेत. त्यामुळे तोडण्यासाठी किती बंदोबस्त असावा आणि पोलिस स्टेशनला किती स्टाफ असावा ते शासनानेच ठरवून दिलेले आहे. त्यामध्ये नगरपालिका स्तरावर प्रस्तावित आकृतीबंध, अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी ५३ जागा आहेत. आणि गुन्हाची नोंदणी, तपास आणि खटला करणेकामी १७ स्टाफ आहे आणि न्यायालयासाठी ०९ पोस्ट आहेत. न्यायालय म्हणजे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणासाठी स्वतंत्र चालवायचे आणि निर्णय द्यायचा. हे शासनाने कळवलेल्या जी.आर. प्रमाणेच दि. १८/०४/२००९ च्या जी.आर. प्रमाणेच ०२ मार्च २००९ ला कळवलेले आहे. त्याप्रमाणे हा जी.आर. येण्यापुर्वीच ठराव करून पाठवलेला आहे. परंतु आता शासनाचा जी.आर. आल्यामुळे जी.आर. प्रमाणे करून पाठवा आम्ही पद मंजुर करतो. असे शासनाच्या मिटींगमध्ये सांगितलेले आहे. त्यामध्ये काय पाहिजे ते सांगा.

**प्रकाश दुबोले :-**

मा. आयुक्त साहेब, यामध्ये फक्त कोर्ट जर आपण स्वतंत्र केले तर कोर्टाच्या कन्स्ट्रक्शनचा सर्व खर्च आपल्यावर पडणार आहे. परंतु यामध्ये फक्त महापालिकेच्या संबंधित केसेस चालतील की, इतर केसेस पण चालणार आहेत?

**मा. आयुक्त :-**

महापालिके संबंधित.

**प्रकाश दुबोले :-**

बाकी इतर केसेस चालणार नाहीत.

**मा. आयुक्त :-**

नाहीत.

**प्रकाश दुबोले :-**

यासाठी मी प्रशासनाचा खुलासा मागितला की, आपल्याकडे वकील असोसिएशनचे जे निवेदन दिलेले आहे....

**मा. आयुक्त :-**

ते वेगळे आहे.

**प्रकाश दुबोले :-**

त्यांचे मत वेगळे आहे.

**मा. आयुक्त :-**

ती डिस्ट्रीक्ट कोर्टाची मागणी आहे.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, ही पदे शासनाकडून मंजुर होउन आली. तर ही पदे शासन लेव्हलला भरून मिळणार की, तुम्ही भरणार?

**मा. आयुक्त :-**

डेप्युटेशनवर पोलिस डिपार्टमेंटकडून मिळणार.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझा असा एक प्रश्न आहे की, आपण महानगरपालिकेच्या संदर्भातील गुन्ह्यांसाठी जे न्यायालय स्थापन करणार आहेत. त्या न्यायालयासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गाच्या आकृतीबंदाला जी.आर. प्रमाणे आपण परवानगी देत आहोत किंवा आजच्या सभेमध्ये मंजुरी देत आहोत. पण आपण या ठिकाणी असे काही निश्चित केले आहे की, न्यायालय कोणत्या जागेवर स्थापणार? आपण जागा निश्चित केलेली आहे का? आणि जर निश्चित केली नसेल तर पद मंजुर होउन येईपर्यंत ती जागा आपल्याला निश्चित केली पाहिजे. साधारण आपल्याला किती जागा लागणार आहे? त्याच्यावर किती खर्च येणार आहे? कारण बिल्डींगसुद्धा आपल्याला बांधावी लागेल. जेव्हा ते आपले स्वतंत्र न्यायालय असणार आहे. कारण आपण ठाणे महानगरपालिकेशी संयुक्तरित्या बांधत नाही. आणि ते स्वतंत्र न्यायालय मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत असणार आहे. शासनाच्या जी.आर. प्रमाणे महानगरपालिकेला ते कंम्पलसरी केलेले आहे. नगरपालिकेवर ऑप्शन ठेवलेला आहे. म्हणजे नगरपालिकेने करावे किंवा करू नये. त्यांच्या इच्छेवर ठेवलेले आहे. अशा वेळी आपल्याला न्यायालय बांधण्याची जागा आणि इमारतीचा खर्च या दोन्ही गोष्टींचे प्रयोजन करावे लागणार आहे. तर प्रशासनाने अशी काही जागा ठरवलेली आहे का? किंवा आपण ठरवणार आहात का की, ह्या जागेवर आपण न्यायालय बांधू या. आणि ती जर आपण बांधणार असाल किंवा ती जागा जर आपण ठरवणार असाल तर त्यासाठी ॲडीशनल मिरा भाईंदर ॲडव्होकेट असोसिएशनचे जे पत्र आपल्याला दिलेले आहे की, ते न्यायालय ऑलरेडी मंजुर झालेले आहे. ते न्यायालय सुद्धा इथे बांधणे गरजेचे आहे. त्याच्यासाठी सुद्धा जागा मिळावी अशी त्यांनी वकील असोसिएशनच्या तर्फे आपल्याला रिक्वेस्ट केली आहे. मला असे वाटते की, त्यांचे न्यायालय आणि आपले न्यायालय हे दोन्ही एका ठिकाणी असेल अशा प्रकारचे लोकेशन आपण फायनल करावे आणि ती जागा फायनल करून मग त्याप्रमाणे इमारत बांधकाम, जे आपल्या स्वतंत्र न्यायालयाचे आहे. त्याचा खर्च आपण उचलावा. जो जिल्हा न्यायालयाचा विस्तारीत भाग भाईंदरमध्ये आणायचा आहे. त्याच्यासाठी ते शासन करेल. कारण त्यांच्या न्यायालयाला ऑलरेडी मा. उच्च न्यायालयाने मंजुरी दिलेली आहे. आत्ता आपल्याला कसे आहे की, आमचा आकृतीबंध ठराव मंजुर करून दिल्यानंतर तो आमचा आकृतीबंध मंजुर होउन येईल. त्याच्यानंतर ह्याबाबी मा. उच्च न्यायालयापुढे ठेवण्यात येतील. या जी.आर.मध्ये त्यांनी तीन नंबरच्या क्रमांकात विशेष उल्लेख केलेला आहे. विशेष न्यायालय स्थापन करणेसाठी संबंधित महानगरपालिका व नगरपालिकांकडून स्थायी रित्या पुर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगरविकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेने विशेष न्यायालय स्थापन करणेसाठी पुढील कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल. म्हणजे आमच्या तीन स्टेजेस अजुन बाकी आहेत. आज आम्ही आकृतीबंधाप्रमाणे जे कर्मचारी वर्ग किंवा जे न्यायाधीश किंवा पोलिस वर्ग लागणार आहेत. त्यांच्यासाठी येणारा खर्च आहे तो आम्हाला उचलायचा आहे. त्याचा ठराव आम्हाला द्यायचा आहे. तो ठराव दिल्यानंतर विधी व न्याय विभाग मा. उच्च न्यायालयाकडे तो सादर करेल आणि त्याच्यानंतर मा. उच्च न्यायालय परवानगी देईल. या ॲडव्होकेट असोसिएशनच्या पत्रानुसार त्यांना ऑलरेडी ठाणे जिल्हा न्यायालयाचा एक विस्तारित भाग इथे स्थापन करण्यासंबंधी परवानगी मिळाली आहे. म्हणजे ते आपल्यापेक्षा तीन स्टेजेस पुढे आहेत. तर मधल्या काळामध्ये आपण ताबडतोब ती जागा निश्चित करावी. त्यांच्या न्यायालयासाठी लागणारी जागा आणि आपल्या स्वतंत्र न्यायालयासाठी लागणारी जागा ही जागा निश्चित करून आपल्या न्यायालयासाठी येणारा प्रस्तावित बांधकाम खर्च, त्याची तरतुद बजेटमध्ये करण्यासाठी हा प्रस्ताव आपण पुढे आणावा, अशी मी प्रशासनाला विनंती करतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटीलजी यानंतर सर्व ॲडव्होकेटच्या मागणीनुसार आपण विषय तयार केला होता की, "के" खाली सन्मा. सभागृहाची मंजुरी असेल तर तोही विषय घ्यायचा आणि आपण जी आत्ता सुचना केली की, जर एखादी इमारत असेल तर ग्राउन्ड फ्लोअरवर आपले कोर्ट चालवू या आणि फर्स्ट फ्लोअरवर आपण त्यांना परवानगी देउ या. एकत्र क्लब करून तो विषय घेता येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रश्न असा आहे की, ‘‘के’’ साठी आम्ही जर प्रस्ताव घेतला तर आज तुमच्याकडे जागा तरी निश्चित करून घ्यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

पालिकेने सुचवले आहे की, आपला जो जुना नगरपालिका कार्यालय आहे आणि ॲडव्होकेटने सेस कार्यालयाबद्दल मागणी केलेली आहे. तर आपल्याला आत्ता असे ठरवायचे आहे की, या दोघांमधून एखादी जागा आपल्याला देता येईल का?

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, आपण कृपया ‘‘क’’ खाली प्रस्ताव घेउ नये. आकृतीबंध तुम्हला दिल्यानंतर एक लक्षात येईल की, साधारण कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे. आत्ता एक तर असे नाही की, सगळे कर्मचारी एका लेव्हलचे आहेत. तुमच्याकडे जिल्हा सहसत्र न्यायाधिश असणार आहेत. म्हणजे त्यांचा चेंबर वेगळा आला, त्यांचा ॲटीचेंबर वेगळा आला, दुसरे त्यांच्या खालच्या लेव्हलचे, समकक्ष लेव्हलचे न्यायाधीश आहेत. त्यांचा चेंबर वेगळा आला. त्यांचा ॲन्टीचेंबर वेगळा आला. त्याचे स्टेनो वेगळे आले. त्याच्यानंतर तुमचा लिपिक विभाग आहे, अकाउंटंट विभाग आहे. ते सगळे वेगळे आले. मग अशा पद्धतीने तुम्हाला जागेची व्यवस्थित आखणी करायला पाहिजे की, ह्या केबिन ह्यांना देउ. असे नाही की, सेसची बिल्डींग तयार आहे म्हणून तिथे घ्या. सेस बिल्डींगमध्ये आपल्याला तशा पद्धतीची उपाययोजना करता येईल का? जशी वकील असोसिएशनने मागणी केलेली आहे की, तुम्ही आम्हाला जागा द्या. जागा द्या म्हणजे बांधलेली जागा द्या किंवा त्यांना खाली जागा द्या. हे निश्चित नाही मा. उच्च न्यायालयाने तुम्हाला असे कळवले आहे का की, आम्ही बांधू. तुम्ही फक्त जागा द्या हे निश्चित नाही, म्हणून हे निश्चित करा. आपले सुद्धा एकदा आकृतीबंद ठरवल्यानंतर स्पेसचा सुद्धा आकृतीबंद ठरवला पाहिजे ना. आणि तो आकृतीबंद आपण ठरवावा आणि तो विषय रितसर आणा. ह्या विषयाला तर आम्ही मंजुरी देतोच. कारण तुमचे काम लगेच होणार नाही. आज तुम्ही ठराव दिल्यानंतर तो विधी विभागाकडे जाणार आहे. त्याच्यानंतर तो पुन्हा शासनाकडून मंजुर होउन मा. उच्च न्यायालयाकडे परवानगी साठी जाणार आहे. त्याच्यानंतर ते न्यायालय मंजुर होणार आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय मंजुर करायचा ना?

**अनिल सावंत :-**

आकृती बंधाचा करा.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण हे जे जज मागणी करू ते डिस्ट्रीक्ट लेव्हलचे करणार आहात की काय?

**मा. आयुक्त :-**

गव्हर्नमेंट आणि मा. हायकोर्ट याची चर्चा होउन ठरवतील. आपण आत्ता सह दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाचे दिलेले आहे. गव्हर्नमेंटने हे पॅटर्न ठरवून दिलेले आहे. आपण यामध्ये काही बदल करू शकत नाही.

**मिलन पाटील :-**

आपल्याला समजा डिस्ट्रीक्ट लेव्हलचे जज दिले. तर पुन्हा आपल्याला मा. हायकोर्टाला अपिल करायला जायला लागेल का? म्हणजे आपल्या इकडे जे निर्णय लागतील ते याच्यानंतर मा. हायकोर्टमध्ये जाणार की ठाण्याला?

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे जे कोर्ट चालणार आहे ते फक्त अनधिकृत बांधकाम, अतिक्रमणाचे आहे. इथे निर्णय झाल्यानंतर डायरेक्ट हायकोर्टच आहे.

**मिलन पाटील :-**

कारण आत्ता ज्या अतिक्रमणाच्या केसेस आपल्याकडे ठाण्याला चाललेल्या आहेत. त्स कमित कमी ५ टक्के आपल्या बाजुच्या लागलेल्या आहेत. ९० टक्के स्टे आणि तसेच आहे तर ती परिस्थिती पुन्हा इकडे जर झाली तर आपण कुठे जायचे? पुन्हा ठाण्याला जायचे की, हायकोर्टला जायचे?

**मा. आयुक्त :-**

हायकोर्टात. ॲक्च्युअली न्यायालयावर आपल्याला काही बोलता येत नाही की, आमच्याच बाजुने का दिला नाही आणि त्यांच्याच बाजुने का दिला? न्यायाधिशांचा निर्णय मानायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

तो आपला विषय नाही.

**एस. ए. खान :-**

कनकियाच्या इथे २३३ मध्ये न्यायालयाच्या जागेचे आरक्षण आहे. तिथेच करायला लागेल ना?

**मा. महापौर :-**

ते आपले आरक्षण नाही. ती गर्व्हमेंटचीच जागा आहे.

**मा. आयुक्त :-**

श्री. पाटील साहेब ज्याप्रमाणे म्हणाले की, जिल्हा कोर्ट येणार आहेत. ते जिल्हा कोर्ट इथे लॉ ॲकॅडमीच्या उद्घाटनाला आले होते. त्यावेळेला आपण जुनी नगरपालिका इमारत ग्राउण्ड प्लस थ्री त्यांना दाखवली त्याप्रमाणे वकील असोसिएशनने आम्हाला पत्र दिले आहे, तसे तुम्ही तिकडे पत्र द्या आणि ते हायकोर्टला लिहा की, आम्हाला जागा पसंत आहे. मग मी मा. महासभेपुढे ठेवतो असे मी सांगितलेले आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, जुनी इमारत म्हणजे नगरभवन की, प्रभाग कार्यालय?

**मा. महापौर :-**

प्रभाग कार्यालय.

**अनिल सावंत :-**

साहेब, आजच्या परिस्थितीमध्ये त्या प्रभाग कार्यालयाची काय परिस्थिती आहे.

**मा. आयुक्त :-**

प्रभाग कार्यालय.

**अनिल सावंत :-**

बाजुला लेडी नाझरेथ स्कुल आहे. तिथे चालायला जागा नसते. उद्या कोर्ट होईल. तिथे व्यवस्थित पार्कींग पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सगळे करून देउ.

**अनिल सावंत :-**

कसे होणार? तिथे जागा कुठे आहे?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही ती काळजी करू नका. ती जबाबदारी माझी आहे.

**एस. ए. खान :-**

रस्त्यावर सगळी पार्कींग होईल.

**मा. आयुक्त :-**

ते एक तासाचे काम आहे.

**एस. ए. खान :-**

साहेब, होणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, जागा करण्याकरिता तासाभरात तुम्ही काय तोडणार? जागा कशी रूंद होईल.

**मा. आयुक्त :-**

त्यांचे म्हणणे आहे की, त्याच्या सराउंडमध्ये इन्क्रोचमेंट आहे ते केव्हा निघेल?

**जुबेर इनामदार :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, तिथे जी ट्राफिक होईल.....

**एस. ए. खान :-**

साहेब, वकील आले तर त्यांच्या अंगावर नो पार्किंगच्या केसेस होतील. तिथे पार्कींग केली तिथे नो पार्कींग झोन झाला तर......

**मा. आयुक्त :-**

पार्कींग ची जागा करून देउ.

**एस. ए. खान :-**

पण जागाच नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मा. आयुक्त साहेब, त्याठिकाणी पार्कींगला जागा आहे.

**एस. ए. खान :-**

जिथे जागा आहे जिथे आरक्षण झालेले आहे तिथेच करू.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो महाराष्ट्र शासनाचा जी.आर. आहे तो महानगरपालिकांसाठी अनिर्वाय आहे, म्हणजे आपल्याला हे करणे भाग आहे. तर यासाठी अर्थ संकल्पात किती तरतुद करायला पाहिजे. ते एक स्पष्टीकरण याच्यात नाही. साधारण खर्च किती येईल? आणि दुसरे असे की, तिसऱ्या पानावर जी.आर. मध्ये एक उल्लेख आहे की, यासाठी आस्थापना खर्चाची विहित करण्यात आलेली मर्यादा शिथिल करण्यात येत आहे. त्याचा एक थोडासा खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, कोर्ट आणि सर्व पोलिस स्टाफ धरून एक करोड आणि कोर्टाचा स्टाफ वगळून ८७ लाख.

**प्रशांत पालांडे :-**

जी. आर. मध्ये पान क्रमांक तीन बघा. आस्थापना खर्चाची विहित करण्यात आलेली मर्यादा शिथिल करण्यात येत आहे. त्याचा अर्थ काय?

**मा. आयुक्त :-**

शिथिल म्हणजे, ''ड'' वर्ग महापालिकेवर ३५ टक्के बंधनकारक आहे. ३५ टक्के च्या पुढे जाता कामा नये. ते यासाठी शिथिल करू असे म्हणाले आहेत.

**जयंत पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी झाली आहे. सन२००१ च्या जनगणनेप्रमाणे शहराची लोकसंख्या ५,२०,३८८ इतकी होती. महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी इतके आहे. सध्या शहराची लोकसंख्या साधारणतः ८.५० लाखापेक्षा जास्त आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका राज्य शासनाच्या वर्गीकरणानुसार हि 'ड' वर्ग दर्जाची महानगरपालिका आहे. मिरा-भाईंदर हे मुंबई लगतचे शहर असल्याने शहरातील लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत आहे. महानगरपालिका अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण विरोधात एम.आर.टी.पी. व महानगरपालिका कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करणे त्या व्यतीरिक्त अनधिकृत नळजोडण्या, अनधिकृत जाहिरात, फेरीवाले यांच्या विरुध्द वेळोवेळी गुन्हे दाखल करावे लागतात. काही प्रकरणात कारवाईच्या वेळी होणाऱ्या विरोधामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळणे फारच जिकरीचे होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊन शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतात. या बाबी विचारात घेता वेळीच तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधीत कामकाजाकरीता स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन होणे गरजेचे आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव मा. महासभा यांनी दि. १९/११/२००८, ठराव क्र. ६८ ने पारीत केलेला आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने शासनास दि. १८/०४/२००९ रोजी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापन करणेबाबत विनंती केलेली होती. शासनाने सदर प्रकरणात राज्यातील नागरी भागात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण निर्मूलनासाठी स्वतंत्र शासन निर्णय केलेला आहे.

शासन निर्णयानुसार अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण तसेच महापालिका हद्दीत विशेष न्यायालय स्थापन करुन त्याचा स्थायी रित्या पुर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी महापालिकेवर राहील. महानगरपालिका 'ड'साठी अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण तसेच विशेष न्यायालय स्थापन करणेस संभाव्य आकृतीबंध निश्चित करुन दिलेला आहे.

प्रकरणात शासनाने महानगरपालिकेच्या मनपा/सा.प्र./११/०३/२००९-१०, दि.१८/०४/२००९ चे पत्राचे अनुषंगाने शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.कंडोमपा/१००६/ प्र.क्र. १९२/२००६/नवी-२८, दि. २ मार्च २००९ मधील शासन निर्णयामधिल तत्वांप्रमाणे शासन पत्र दि. २६ मे २००९ अन्वये सुधारित ठराव करुन स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास फेर सादर करावा. असे कळविलेले आहे.

नागरी पोलिस, विशेष पोलिस ठाणे व विशेष न्यायालयांसाठी प्रस्ताव तयार करताना 'ड' वर्ग महापलिका क्षेत्रासाठी शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे संभाव्य आकृतीबंध आहे.

## परिशिष्ट 'अ'

### अतिक्रमण निर्मुलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण इ. साठी महानगरपालिका / नगरपालिका स्तरावर प्रस्तावित नागरी पोलिस यंत्रणेसाठी आकृतीबंध

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस आयुक्त/ पोलिस उपअधिक्षक | ८०००-२७५-१३५०० | १ |
| २. | पोलिस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | १ |
| ३. | पोलीस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | ४ |
| ४. | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | ४ |
| ५. | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ६. | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | १६ |
| ७. | पोलीस नाईक /वाहनचालक | ४०००-१००-६००० | ३ |

| | |
|---|---|
| एकुण | ५३ |

# परिशिष्ट - ब

**नागरी गुन्हयाच्या नोंदणी, तपास व खटला भरण्याकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशन यांचे आकृतीबंध**

**पोलिस स्टेशन-नमुना २ ('ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सहायक पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ |
| २. | पोलीस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | १ |
| ३. | सहायक पोलीस उपनिरीक्षक | ४५००-१२५-७००० | १ |
| ४. | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ४ |
| ५. | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ |
| ७. | वाहनचालक | ४०००-१००-६००० | १ |
| | | एकुण | १७ |

# परिशिष्ट-क

**नागरी गुन्हयांसाठी स्थापन करावयाचे विशेष न्यायालय**
**न्यायालये- नमुना-२ ('ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (व.स्त.) | १२८५०-३००-१३१५०-४००-१७५५० | १ |
| २. | सहाय्यक अधिक्षक | ५०००-१५०-८००० | १ |
| ३. | लघुलेखक (नि.श्रे.) | ५५००-१७५-९००० | १ |
| ४. | वरिष्ठ लिपीक | ४०००-१००-६००० | १ |
| ५. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | २ |
| ६. | बेलिफ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ |
| ७. | शिपाई | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २ |
| | | एकुण | ९ |

वरील सर्व बाबी विचारात घेता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात नागरी गुन्हयासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापन करणेस हि सभा सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापनेबाबत.

**ठराव क्र. १८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी झाली आहे. सन२००१ च्या जनगणनेप्रमाणे शहराची लोकसंख्या ५,२०,३८८ इतकी होती. महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी इतके आहे. सध्या शहराची लोकसंख्या साधारणतः ८.५० लाखापेक्षा जास्त आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका राज्य शासनाच्या वर्गीकरणानुसार हि 'ड' वर्ग दर्जाची महानगरपालिका आहे. मिरा-भाईंदर हे मुंबई लगतचे शहर असल्याने शहरातील लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत आहे. महानगरपालिका अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण विरोधात एम.आर.टी.पी. व महानगरपालिका कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करणे त्या व्यतीरिक्त अनधिकृत नळजोडण्या, अनधिकृत जाहिरात, फेरीवाले यांच्या विरुध्द वेळोवेळी गुन्हे दाखल करावे लागतात. काही प्रकरणात कारवाईच्या वेळी होणाऱ्या विरोधामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळणे फारच जिकरीचे होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊन शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतात. या बाबी विचारात घेता वेळीच तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधीत कामकाजाकरीता स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन होणे गरजेचे आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव मा. महासभा यांनी दि. १९/११/२००८, ठराव क्र. ६८ ने पारीत केलेला आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने शासनास दि. १८/०४/२००९ रोजी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापन करणेबाबत विनंती केलेली होती. शासनाने सदर प्रकरणात राज्यातील नागरी भागात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण निर्मूलनासाठी स्वतंत्र शासन निर्णय केलेला आहे.

शासन निर्णयानुसार अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण तसेच महापालिका हद्दीत विशेष न्यायालय स्थापन करुन त्याचा स्थायी रित्या पुर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी महापालिकेवर राहील. महानगरपालिका 'ड'साठी अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण तसेच विशेष न्यायालय स्थापन करणेस संभाव्य आकृतीबंध निश्चित करुन दिलेला आहे.

प्रकरणात शासनाने महानगरपालिकेच्या मनपा/सा.प्र./११/०३/२००९-१०, दि.१८/०४/२००९ चे पत्राचे अनुषंगाने शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.कंडोमपा/१००६/ प्र.क्र. १९२/२००६/नवी-२८, दि. २ मार्च २००९ मधील शासन निर्णयामधिल तत्वांप्रमाणे शासन पत्र दि. २६ मे २००९ अन्वये सुधारित ठराव करुन स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास फेर सादर करावा. असे कळविलेले आहे.

नागरी पोलिस, विशेष पोलिस ठाणे व विशेष न्यायालयांसाठी प्रस्ताव तयार करताना 'ड' वर्ग महापलिका क्षेत्रासाठी शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे संभाव्य आकृतीबंध आहे.

## परिशिष्ट 'अ'

**अतिक्रमण निर्मुलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण इ. साठी महानगरपालिका / नगरपालिका स्तरावर प्रस्तावित नागरी पोलिस यंत्रणेसाठी आकृतीबंध**

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस आयुक्त/ पोलिस उपअधिक्षक | ८०००-२७५-१३५०० | १ |
| २. | पोलिस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | १ |
| ३. | पोलीस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | ४ |
| ४. | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | ४ |
| ५. | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ६. | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | १६ |
| ७. | पोलीस नाईक /वाहनचालक | ४०००-१००-६००० | ३ |
| | | **एकुण** | **५३** |

## परिशिष्ट - ब

**नागरी गुन्हयाच्या नोंदणी, तपास व खटला भरण्याकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशन यांचे आकृतीबंध**

**पोलिस स्टेशन-नमुना २ ('ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सहायक पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ |
| २. | पोलीस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | १ |
| ३. | सहायक पोलीस उपनिरीक्षक | ४५००-१२५-७००० | १ |
| ४. | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ४ |
| ५. | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ |
| ७. | वाहनचालक | ४०००-१००-६००० | १ |
| | | **एकुण** | **१७** |

## परिशिष्ट-क

**नागरी गुन्हयांसाठी स्थापन करावयाचे विशेष न्यायालय**
**न्यायालये- नमुना-२ ('ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (व.स्त.) | १२८५०-३००-१३१५०-४००-१७५५० | १ |
| २. | सहाय्यक अधिक्षक | ५०००-१५०-८००० | १ |
| ३. | लघुलेखक (नि.श्रे.) | ५५००-१७५-९००० | १ |
| ४. | वरिष्ठ लिपीक | ४०००-१००-६००० | १ |
| ५. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | २ |
| ६. | बेलिफ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ |
| ७. | शिपाई | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २ |
| | | **एकुण** | **९** |

वरील सर्व बाबी विचारात घेता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात नागरी गुन्हयासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापन करणेस हि सभा सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १५, मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मंडईकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरफार करणे व मंडईकरिता नविन आरक्षण प्रस्तावित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयात भाजी, फळ व फुल मार्केट करीता आवश्यकतेनुसार नव्याने आरक्षण प्रस्तावित करणे, आरक्षणाच्या क्षेत्रात व वापरात बदल करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलमानुसार फेर बदल करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७(१) नुसार मंजुरी देण्यात येत आहे. सदर समितीस फेरबदलाचे प्रस्ताव शासनाकडून मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत. मंजूर करून प्रस्तावित केलेल्या मार्केट आरक्षणाच्या जागेवर मार्केट करीता खुल्या शेड बांधण्यात याव्यात व त्यामध्ये भाजी, फळ, फुल व मांसाहारी मार्केट सुरू करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

अनुमोदन देण्याच्या अगोदर माझा प्रशासनाला एक प्रश्न आहे की, आपण जो मंडई विकसित करण्यासाठी आरक्षणात बदल करत आहात. क्रमांक ६ काय आहे? त्याच्या संदर्भात टाउन प्लानिंगचे लोक माहिती देतील का? मौजे गोडदेव सर्वे क्र. ६७ जुना नवा ११२ या जागेमध्ये मंजुर विकास योजनेत तलाव दर्शविण्यात आला असुन त्या ठिकाणी सद्य स्थितीत तलाव नसल्याने त्या जागेवर भाजी मंडई साठी आरक्षण ठेवणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ते डेव्हलपमेंट प्लानमध्ये तलाव म्हणून दाखवले आहे आणि आत्ता सध्या एक्झीस्टींगमध्ये नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते ६७ मध्ये आहे की, ६८ मध्ये आहे ते आपण जरा बघा.

**मा. आयुक्त :-**

नवीन ११२ आणि जुना ६७.

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि ६८ मध्ये काय आहे?

**मा. आयुक्त :-**

तो पण पॉन्डच आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आत्ता प्रश्न असा आहे की, ६७ जुना आणि ११२ नवीन आणि ते आरक्षण दाखवलेले नाही. आत्ता मी टाउन प्लानिंगला, साहेब तुम्ही तेव्हा नव्हते. एकदा असा एक विषय आला होता. तो टेंबा हॉस्पीटलचा विषय होता. टेंबा हॉस्पीटलचा इथे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून डेव्हलपमेंट प्लानमध्ये तशी तरतुद होती, म्हणजे नोंद होती आणि तिथल्या झोपड्या काढून, जी अधिकृत घरे होती ती काढून दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट करायचे अशा प्रकारचा तो प्रश्न होता. त्यावेळी आम्ही असे मांडले होते की, ही आरक्षणाची जागा नगरपालिका स्वतःसाठी विकसित करत असल्यामुळे त्याठिकाणी असलेली जी बांधकामे आहेत, आणि त्याच्यात राहणाऱ्या लोकांना विनामुल्य दुसरीकडे जागा द्यावी. एखादे आरक्षण विकसित करताना आरक्षणात असलेल्या त्या लोकांना जे कायदेशिर आहेत, त्यांना दुसऱ्या ठिकाणी जागा देणे हे डी.सी. रूल्समध्ये आहे. त्यावेळी मला सांगण्यात आले की, ते आरक्षण नाही. म्हणून आपल्याला त्यांना तो बेनिफिट देता येत नाही. ते आरक्षण नाही मग हे आज कसे आरक्षण झाले?

**मा. महापौर :-**

आरक्षण नाही. एक्झीस्टींग आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही विषय आणता. आपल्याला विषयाचा अर्थ समजला नाही. तुम्ही विषय काय आणला आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरफार करणे व मंडईकरिता नविन आरक्षण प्रस्तावित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. आरक्षण, कुठल्याही आरक्षणामध्ये गौण किंवा मोठा, मायनर किंवा मेजर बदल जर करायचा असेल तर ३७ खाली आपण तो प्रस्ताव आणतो. मग जे टेम्बा हॉस्पीटलला तुम्ही आरक्षणाचा दर्जा दिला नाही. तसा मग ह्या तलावाला तुम्ही आरक्षणाचा दर्जा कसा देता? हा ३७ कलम फक्त आरक्षणामध्ये फेरफार बदल करण्याचा आहे ना? आणि ते तलाव आहे हे कशासाठी दाखवले आहे, एज पर एक्झीस्टींग लॅन्ड युज प्लान. मग ज्या एक्झीस्टींग लॅन्ड युज प्लान च्या ज्या तरतुदी आहेत. त्यानुसार तुर्त तुम्हाला बदल करायचा मग तुम्ही ३७ खाली प्रस्ताव कसा आणता? मार्केट व्हावे या मताचा मी आहे. पण मग आपल्या लोकांनी याची पाहणीपण केली असेल की नाही की, ६७ जुना ११२ नवीन मध्ये आज नक्की पोझीशन काय आहे? आपण पाहणी केल्याशिवाय हा विषय कसा आणला?

**मा. महापौर :-**

व्हॅकेन्ट प्लॉट आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

अजिबात नाही. तुम्ही फक्त ६७ चे क्षेत्र किती आहे ते सांगा? मला वाटते की, टाउन प्लानिंग डिपार्टमेंटने तेवढे तरी रिव्हीजन केले असेल.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, मला वाटते अत्यंत घाईघाईने हा विषय या ठिकाणी आणलेला आहे. कशही प्रकारचा कोणताही सर्वे झालेला नाही आणि संपुर्ण मार्केट म्हणजे फक्त भाजी मंडई आणि मग मटण मंडई, फिश मंडई यांचे काय? आगरी, कोळी, कुणबी, मुस्लिम, कॅथलिक हे काय करणार? सगळे भाजीच खाणार काय?

**मा. आयुक्त :-**

त्या मंडईमध्ये ते पार्ट करायचे आहेत.

**आसिफ शेख :-**

मग तसा परिपुर्ण प्रस्ताव आणला पाहिजे होता. आत्ता महापालिकेचे किंवा कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचे आद्य कर्तव्य आहे की, ज्या ठिकाणी वस्ती आहे. त्याठिकाणी सर्व प्रकारची सुविधा त्यांना द्यायला पाहिजे. हे कायदेशिर बंधनकारक आहे, घटनात्मक रित्या बंधनकारक आहे. तिथे फळभाज्यांची व्यवस्था केली पाहिजे, भाजीची केली पाहिजे. फ्रुट मार्केटची व्यवस्था केली पाहिजे, स्मशानाची केली पाहिजे. पण तसे काही दिसत नाही. तुम्ही फक्त भाजी मंडई म्हटले आहे. एवढी घाई कशाला झाली? व्यवस्थित परिपुर्ण प्रस्ताव आणा. सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील साहेब म्हणतात ते बरोबर आहे. त्यांचा विषय बरोबर आहे. त्यांच्या विषयाला अनुसरून बोलतो की, एवढी घाईगर्दी कशाला.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. श्री. आसिफ शेख साहेबांना सांगतो की, साहेब आमच्याकडे अशी पद्धत आहे. आत्ता आमच्या आगरी समाजाचे लोक आहेत ना, मग काय माव्हर केले जेवायला, असा प्रश्न विचारतात. परत मटन असेल तर मग काय कोंबडा कापला की नाही? पण आत्ता ते सोलापुर, कोल्हापुर साईडचे लोक येतात ते नॉनव्हेज विचारत नाहीत. तुमच्याकडे काय भाजी केली? तर म्हटल भाजी, मासळी. अहो चांगली भाजी लागली. म्हणजे त्यांच्या हिशोबाने मासळीपण भाजीच झाली. तुम्ही तसे समजुन काही केले असेल. साहेब हे तंतोतंत खरे आहे. तुम्हाला आहे ते सांगतो. बरेच लोक असे असतात. मग काय भाजी केली? अरे भाजी नाही केली. मटन केले आहे. नाही आमच्यात त्याला भाजीच बोलतात. तसा प्रकार आहे. तर श्री. आसिफ शेख साहेब, तेवढे समजुन घ्या. त्यांचा उद्देश तो आहे. भाजी सकट, भाजी याचा अर्थ कोंबडी, मटन सगळे. व्हेज नॉनव्हेज सर्व. तर माझा मुळ प्रश्न असा आहे की, जो ६७ नंबरचे जे आरक्षण आपण तलावाचे म्हणता. तर ६७ मध्ये तुम्हाला जागा एकदम ५१२ पेक्षा कमी आहे आणि तो ६८ ला एक ॲप्रोच रोड आहे. तलाव हा ६७ आणि ६८ मध्ये आहे. ६८ च्या तलावाची जागा अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाची आहे आणि त्याच्यामध्ये एम.बी.ए. आणि एम.सी.ए. कॉलेजला पोस्ट ग्रॅज्युएशन दोन कॉलेजला ए. आय.सी.टी ने दिल्लीने परवानगी दिली आहे. मागच्या सभेत सन्मा. श्री. शशिकांत भोईर यांनी ते सांगितले. माझ्या म्हणण्याचा असा उद्देश नाही की, आमचे तिथे कॉलेज आहे म्हणून तिथे तुम्ही मंडई बांधू नका, जरूर बांधा. पण जी जागा उरलेली आहे. त्या जागेमध्ये मशिद आहे. मध्ये एक रस्ता आहे आणि रस्त्याच्या पलिकडे इंडस्ट्री आहे. म्हणजे ६७ मध्ये तुम्हाला मोकळी जागा राहत नाही. त्याच्यामध्ये मोठा नाला आहे. तर आपण याची नीट पाहणी करा. नाहीतर हे डीलीट करा.

**संजय पांगे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलू का? प्रकरण क्र. १५ .....

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, या ठरावाला अनुमोदन दिलेले नाही.

**संजय पांगे :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. १५, अ.क्र. ०३, मिरा रोउ पुर्व शांतीनगर गृहसंकुल परिसरात मार्केट आवश्यक असल्याने त्या परिसरातील मौजे भाईंदर सर्व्हे क्र. १३६ पै, १३७ पै मधील आरक्षण क्र. १८५, बस स्टँड क्षेत्र क्र. ३९ ह्या आरक्षणाचे मार्केट या नामनिर्देशनात बदल करणे आवश्यक आहे. मा. आयु्क्त साहेब, आपण हा गोषवारा दिला आहे. आपणांस हे माहिती आहे का? या प्रकरणी मिरा रोड वेल्फेआर असोसिएशनने मा. हायकोर्टामध्ये केस नं. २०५३/०९ यानुसार केस प्रलंबित आहे. केस प्रलंबित असताना हा गोषवारा कशासाठी?

**मा. आयुक्त :-**

केस हायकोर्टामध्ये आहे आणि ती इलिगल कन्स्ट्रक्शन संबंधी आहे. आणि आपल्याला तिथे मंडई करायचे आहे की नाही हे सभागृहापुढे मांडलेले आहे. करायचे असेल तर इमारत तोडूनच होईल आणि एस.टी. स्टँडसाठी आरक्षण आहे त्याच्यात बदल करायचा आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मंडई तोडून परत मंडईच बांधायची आहे?

**मा. आयुक्त :-**

होय, त्यावेळेला महापालिकेची होईल.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जी बाब न्यायप्रविष्ठ असते. त्याबाबत सभागृहाने निर्णय घेणे योग्य आहे का?

**संजय पांगे :-**

हे प्रलंबित असताना आपण निर्णय कसा करू शकतो?

**मा. आयुक्त :-**

न्यायप्रविष्ठ बाब बेकायदेशिर बांधकाम संबंधी आहे. मायनर मोडीफिकेशर करा, नाहीतर करू नका असे कुठे ऑर्डर्स नाहीत. मायनर मोडीफिकेशन करून महापालिका ताब्यात घेण्यासाठी करू शकते. तुम्ही निर्णय घ्या.

**संजय पांगे :-**

हे न्यायप्रविष्ठ असल्या कारणाने हा विषय आपण वगळून टाका.

**मा. आयुक्त :-**

हे जागेसंबंधी आहे. कंन्स्ट्रक्शन संबंधी नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याकडे आता २५० बस येणार आहेत त्या कुठे ठेवणार आहात?

**प्रकाश दुबोले :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही इनडायरेक्टली अनधिकृत बांधकामाला पाठींबा देणार आहात का?

**मा. आयुक्त :-**

हे सगळे हायकोर्टात केस आहे, डिस्ट्रीक्ट कोर्टात केस आहे हे माहिती असताना पण ज्यासाठी वापर होतो ते सभागृहापुढे मांडले. तुम्ही मंजुर केले तर मायनर मोडीफिकेशन होईल. नाही केले तर रद्द करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय न्यायप्रविष्ठ असल्याने पुढच्या वेळी गटनेत्यांच्या मिटींगमध्ये पण हा विषय घेउ नका.

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील यांनी विषय मांडला आहे. तर माझी अशी विनंती आहे की, गटनेत्यांची बैठक घेउन नंतर हा विषय आपण मा. महासभेपुढे आणू या.

**संजय पांगे :-**

हा तीन नंबर पुर्ण वगळा.

**प्रफुल्ल पाटील :-**

असे आहे की, आत्ता तुम्ही ज्या स्टेजला आहात. त्या स्टेजवरून तुम्ही मागे जाउ शकत नाही. हा विषय मा. महासभेने निर्णय घेउन होणार नाही आणि मा. महासभेने पण असा आलतु फालतु डिसीजन घेउन काहीतरी थातुर मातुर ठराव करू नका. शासन जसाच्या तसा बाहेर फेकुन देईल. साहेब, तुम्हाला त्याच्यामध्ये पुर्ण जस्टीफिकेशन दिले पाहिजे. आत्ता साधारण अकरा हजार दोनशे चौरस मिटरचे क्षेत्र तुम्ही बदलता. म्हणजे तुम्ही शाळा बदलुन मार्केट आणता. वरच्या डेप्युटी डायरेक्टरच्या लेव्हलला गेले की, ते काय म्हणणार. अमुक भाग क्रमांक नकाशाचा किती आहे ते जरा सांगा. बारा क्रमांकाची शिट आहे. आरक्षण क्रमांक ९४ आहे. आत्ता याच्यामध्ये जेवढा जो भाग क्रमांकाच्या तुलनेने त्या भाग क्रमांकामध्ये येणाऱ्या क्षेत्राच्या तुलनेमध्ये माध्यमिक शाळेचे आरक्षण टाळले जाते. कधीपण कुठले आरक्षण टाकताना तो आजुबाजुचा किती परिसर भरणार आहे? तिथे कधी वसाहती होणार आहेत. त्यानुसार ते आरक्षण टाकले. जाते असे नाही की मनाला कोणी तरी आरक्षण टाकले तर ते आरक्षण काढताना तुम्हाला हे जस्टीफाय करावे लागेल की, ११,२०० चौ.मि. जागेत ज्या शाळा बांधणार आहोत ऑलरेडी त्या १५००० चौ.मी. जागेत दुसऱ्या ठिकाणी अस्तित्वात आहेत. कॅन यु जस्टीफाय ऑन दॅट शिट. त्या शिटवर तुम्ही जस्टीफाय करू शकाल की, या १२ नंबरच्या शिटमध्ये इतर लोकांनी एकुण किती शाळा बांधलेल्या आहेत?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. श्री. पाटील साहेब, ९२ प्रायमरी स्कुल आहेत. आणि रस्त्याच्या पलिकडच्या बाजुला ८८ प्रायमरी स्कुल आहेत. म्हणजे एकाच ठिकाणी तीन आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, माझे ते म्हणणे नाही. जेव्हा नियोजन कडे, प्लानिंग कमिटीकडे जाणार तेव्हा प्लानिंग कमिटी काय बघणार की, ही तुमची स्कुल आम्ही वगळू, ठिक आहे. महानगरपालिकेची मागणी आहे. मग ते कोणत्या बेसवर जस्टीफाय करणार की, ठिक आहे. ही शाळा जरी आपण काढली. तरी इतर खाजगी संस्थांच्या इतक्या शाळा इथे आहेत. अणि त्याचे क्षेत्र साधारण ११००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे.

**मा. महापौर :-**

विषय परत आणू या.

**प्रफुल्ल पाटील :-**

विषय परत आणू नका. हा विषय फायनल करा. याला मंजुरी द्या. तुम्ही ६७ नंबर वगळा आणि बाकीच्याला मंजुरी द्या. साहेब, हा समितीचा अधिकार होत नाही.

**संजय पांगे :-**

तीन नंबरही वगळा.

**मा. महापौर :-**

६७ आणि ०३ नंबर वगळूल करु या.

**अनिल सावंत :-**

३ नंबर का वगळायचे?

**मा. महापौर :-**

कोर्ट मॅटर आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

३ नंबरच्या बाबतीत माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, न्यायालयाच्या कोणत्याही बाबतीत केस असेल, मग ती एम.आर.टी.पी.ची असेल, अनधिकृतची असेल किंवा कुठलीही असेल, त्या न्यायालयाच्या निर्णयाने जर बाधित होत नसेल तर या आरक्षणाला आमची मंजुरी आहे. न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून हे आरक्षण आम्ही मंजुर करतो असा ठराव तुम्हाला देतो.

**संजय पांगे :-**

सबमिट करताना कोर्टाने कार्पोरेशनला असे काही डायरेक्शन दिले आहेत का?

**एस. ए. खान :-**

साहेब, तिकडे मार्केटची गरज आहे आणि त्या आरक्षणामध्ये अतिक्रमण झालेले आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, श्री. पाटील साहेबांनी सांगितले की, न्यायालयात आणि वकीलांचा सल्ला घेउन जर बाधा येत असेल तर वगळा. त्याप्रमाणे करु म्हणून मी सांगितले.

**संजय पांगे :-**

याच्यात ३ नंबर वगळा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

३ नंबर वगळायचे आहे. ३ नंबर वगळूनच करा. न्यायप्रविष्ठ आहे.

**जयंत पाटील :-**

न्यायालयाच्या अधीन राहून जर बाधा येत नसेल तर तो ठेवा. बाधा येत असेल तर वगळून टाका. कायदेशीर बाध काय आहे ते आपण तपासून घ्या.

**प्रभात पाटील :-**

काही कायदेशीर बाबी आल्या तर त्याच्यासाठी सभागृह सक्षम आहे. तिथे मार्केटची गरज आहे.

**मा. आयुक्त :-**

वकीलांचा सल्ला दोन दिवसातच आणतो.

**मा. महापौर :-**

श्री. जयंत पाटील साहेब, आपण हा चांगला आरक्षणचा ठराव करत आहोत. त्यानंतर मा. हायकोर्टाला कुठेतरी नोटींगमध्ये किंवा ठरावामध्ये आले तर गर्व्हमेनटकडे जाईल. परत ते क्वेंशन मार्क येईल. तर माझी विनंती आहे की, ते वगळून आपण बाकीचे क्लीन जाउ या.

**प्रफुल्ल पाटील :-**

असे काही नाही. तुम्ही जर पाच आरक्षणे पाठवली तर तुम्ही असे स्वप्नात राहू नका की, ते पाचही आरक्षणे मंजुर करतील. त्यांना पटले नाही तर एकसुध्दा मंजुर करणार नाहीत. मी मगाशी जे सांगितले ते सुत्र पण त्यांना तिथे बसले पाहिजे की, २००० मीटरच्या एरियामध्ये १०० मीटर शाळा असावी, १०० मीटर गार्डन असावे, १०० मीटर प्राथमिक आरोग्य केंद्र, असे त्यांचे सुत्र ठरलेले आहे. ते सुत्र कॅल्क्युलेट करणार आणि त्याच्यानुसारच त्याला फायनल मंजुरी देणार. म्हणून या ठिकाणी ठराव झालेला आहे. अनुमोदन झालेले आहे. मी दुरुस्ती मांडत आहे. आरक्षण क्र. ९४ .....

**तुळशीदास म्हात्रे :-**

एकत्र ठराव मांडा.

**प्रफुल्ल पाटील :-**

एकत्रच ठराव घेतला आहे. पहिला दुरुस्ती सुचना घ्या नंतर त्याचा ठराव घ्या.

**नयना म्हात्रे :-**

प्रकरण क्र. १५ मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मंडईकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरफार करणे व मंडईकरिता नविन आरक्षण प्रस्तावित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, पहिल्या ठरावाला माझ्या काही सुचना आहेत. त्याच्यानंतर ठराव मांडू द्या.

**मा. महापौर :-**

त्यांना मांडू द्या नंतर सुचना मांडा.

**जयंत पाटील :-**

मी आपल्याला दि. ०२/०६/२००९ रोजी एक पत्र दिलेले आहे. मागे सौ. कल्पना म्हात्रे, नगरसेविका यांचीसुध्दा तक्रार होती की, एस.एन. कॉलेजच्या समोर बरेचसे भाजीवाले बसतात, त्यांना उचला. आता जेव्हा आपण त्यांना उचलणार तेव्हा तिकडच्या लोकांची मार्केटची व्यवस्था व्हायला पाहिजे. म्हणून नवघरच्या तलावामध्ये मार्केट बनावे असे एक पत्र मी दिलेले आहे.

प्रति,

मा. आयुक्त, सो.,

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- मार्केट व खेळाचे मैदान बांधणेबाबत.

महोदय,

आपणांस ह्या पत्राद्वारे विनंती करतो की, भाईंदर पूर्वेच्या वाढत्या लोकसंख्येला भाजी मार्केटची गरज आहे. एस.एन. कॉलेजच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भाजी विक्रेते बसतात. हे भाजी विक्रेते रस्त्यावर बसल्यामुळे रस्त्यावर चालणाऱ्या जनतेस तसेच वाहनांना अडचणीचे होत आहे. त्यामुळे कॉलेज समोरील तलावांत (सुशोभिकरण केलेले तलाव सोडून) भराव करुन भाजी-मार्केट बनविल्यास लोकांची गरज भागुन रस्ताही मोकळा होईल. तसेच उर्वरीत जागेत खेळाचे मैदान बनविल्यास भाईंदर पूर्वेच्या तरुणांचा मैदानाचा प्रश्न कायमचा सुटेल. करीता आपण तात्काळ ह्या विषयांत लक्ष घालून वरील मागणी मान्य कराल. ही अपेक्षा.

आपला विश्वासू,

(जयंत म. पाटील)
सभागृह नेता

प्रत माहितीस्तव :-

सार्वजनिक बांधकाम विभाग. तेव्हा ह्या मार्केटची नोंद आपण त्या ठरावामध्ये करावी. ही माझी सुचना आहे.

**वंदना पाटील :-**

मा. महापौर साहेब, केबिन नाक्यावर मच्छीमार्केट होते काय?

**मा. महापौर :-**

मच्छीवाले होते. मार्केट नाही.

**वंदना पाटील :-**

मग तुम्ही बॅनर कसे छापले आहे की तुम्ही मच्छीमार्केट बंद केले.

**मा. महापौर :-**

तो बॅनर मी छापला नाही.

**वंदना पाटील :-**

मच्छीमार्केटचा उल्लेख का केला आहे? हे काय चालवले आहे.

**मा. महापौर :-**

ज्या व्यक्तीने छापले आहे त्यांनाच विचारा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्याला विरोध केला आहे का?

**वंदना पाटील :-**

त्याच्यामध्ये तुमचे नाव आहे.

**मा. महापौर :-**

मला माहितच नाही ते छापले आहे.

**वंदना पाटील :-**

१० लाख लोकांची तुम्ही दिशाभूल करता.

**जयंत पाटील :-**

त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करा.

**मा. महापौर :-**

बरेच प्रश्न आहेत. चांगले काम केले असेल तर महापौरांचे आभार मानायचे. मला काही व्यक्तीगत विचारुन करत नाहीत. आणि तिसरी गोष्ट जे कार्येकर्ते आहेत ते ना बी.जे.पी.चे ना आमचे आहेत. जे फोटो आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा. मा. महासभा त्याला परमिशन देते.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**मिलन पाटील :-**

याच्यावर तुम्ही रुलिंग द्या. याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा.

**मा. महापौर :-**

मी त्याबाबत माहिती घेतो.

**जयंत पाटील :-**

त्याची तुम्हाला संपूर्ण माहिती आहे.

**मिलन पाटील :-**

हा तुमचा फोटोपण लावलेला आहे. फौजदारी गुन्हा दाखल करा.

**मा. महापौर :-**

माझा फोटो लावला आहे ना? मग मी त्याच्याशी काय ते बोलेन. मी माहिती घेतो.

**जयंत पाटील :-**

तो तुमच्या घरचा वैयक्तिक कार्यक्रम नाही. महापालिकेचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

ती कोण व्यक्ती आहे त्याची मी माहिती घेतो. त्यानंतर डिसीजन घेतो.

**जयंत पाटील :-**

कोण व्यक्ती आहे ते तुम्हाला सगळे माहित आहे.

**मा. महापौर :-**

तो आमचा कार्यकर्ताही नाही.

**जयंत पाटील :-**

जे घडले आहे ते ही माहित आहे.

**मिलन पाटील :-**

हे आरक्षण कोणी बदली केले? हे आरक्षण बदली केलेले आहे का?

**भगवती शर्मा :-**

आपने ऐसा कोई काम किया है क्या?

**मा. महापौर :-**

मच्छीवाले बैठे थे। मेरे पास कुछ लोग आये थे। हम लोगोने मच्छी हटाया था।

**वंदना चक्रे :-**

मा. महापौरांना खोटे श्रेय घ्यायची सवय झाली आहे. मी सन्मा. सभागृहाला विनंती करते की, यांचा इथे पण निषेध करा आणि त्यांना पण माफी मागायला सांगा. घुसखोर महापौर सगळ्या वॉर्डमध्ये घुसून लोकांची कामे करतात.

**भगवती शर्मा :-**

आप बोलीए की, मैने ऐसा किया नही है। आप इसका जवाब दिजीए।

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हे बघा. तुमच्या समोर हा प्रुफ आहे. तुम्ही हे बदली करण्याची परमिशन दिली आहे का?

**जयंत पाटील :-**

सगळे मच्छीवाले फक्त १४५ मध्येच बसतात का?

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, हमारा ठराव है।

**वंदना चक्रे :-**

मा. महापौरांचे १४५ मध्येच आहेत. १४६ मध्ये कोणी नाही.

**मा. महापौर :-**

१४६ मध्ये पण आहेत.

**जयंत पाटील :-**

१४५ मध्येच चाललेले आहे. थोडे आमच्याकडे पण या. बरीचशी साफसफाई करायची आहे.

**नयना म्हात्रे :-**

मिरारोड (पू.) रेल्वे स्टेशन जवळ मौजे भाईंदर मधील आरक्षण क्र. १८५ वर मंजुर विकास योजना प्रमाणे "बस स्टॅन्ड" म्हणून जागा आरक्षित आहे. मिरा रोड (पूर्व) येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता, उपरोक्त आरक्षण क्र. १८५ मध्ये कुठल्याही प्रकारचे बदल करु नये. बदल करण्यास माझा स्पष्ट विरोध आहे. कारणे :-

१) आरक्षण क्र. १८५ "बस स्टॅन्ड" या जागेवर मेसर्स मिरारोड वेल्फेअर असोसिऐशन या संस्थेने अनधिकृतपणे कब्जा करुन जागा हडप करुन बेकायदेशीर मार्केट बांधलेली आहे. मनपाने एम.आर.टी.पी. अंतर्गत नोटीस काढलेली आहे. ङक्च नं. १९०/०२ व च्क्च नं. ४५१/०७ मा. ठाणे न्यायालयाने मनपाच्या बाजुने निर्णय दिलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका प्रलंबित आहे. मा. जिल्हा न्यायालयाने दिलेला आदेशाप्रमाणे व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम २६८ अन्वये मनपाने नोटीस काढून आरक्षण क्र. १८५ या जागेवर असलेली बेकायदेशीर इमारत ताबडतोब रिकामी करण्यासाठी कळविलेली आहे. प्रशासनाला संपूर्ण विषय माहिती असताना मा. महासभेपुढे न्यायप्रविष्ठ बाब आणून दिशाभूल

करणे शोभत नाही. मा. मुख्यमंत्री यांनी देखील विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाला न्यायप्रविष्ठ बाब म्हणून सांगितले.

कृपया माझी सुचना उपरोक्त ठरावामध्ये समाविष्ट करुन दिशाभूल करणारे अधिकारी व बेकायदेशीर बांधकाम करुन लाखो रुपये खर्च करण्यास लावणारे संस्था यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती.

**मा. महापौर :-**

डॉक्टर साहब, उनको पढने दिजीए।

**वंदना चक्रे :-**

पहिला सौ. वंदना पाटील यांचा विषय पूर्ण होउ द्या.

**मिलन पाटील :-**

पहले इसका जवाब दो की, आप क्या करेंगे? यह किसने बदली किया?

**मा. महापौर :-**

मी छापलेले नाही. कोणी छापले त्याच्यावर मा. आयुक्तांनी.....

**मिलन पाटील :-**

याच्यावर फौजदारी करा.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी काही करावे. माझा संबंध नाही.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही याच्यावर फौजदारी करणार की, नाही? हे बदली करण्याची परमिशन यांना कोणी दिली? साहेब तुम्ही रुलिंग द्या. आम्ही याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करतो. हा नगरसेवकांचा अपमान आहे.

**मा. आयुक्त :-**

चौकशी करतो.

**मिलन पाटील :-**

चौकशी नको. गुन्हा दाखल करणार की नाही ते सांगा.

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आपण पण म्हणता की, चौकशी करतो. आपण उत्तर द्या.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, दोन-तीन बायका तिथे मासळी विकून आपला उदरनिर्वाह करत होते. मा. महापौरांनी, दोन-तीन बायकांच्या पोटावर लाथ मारुन विधानसभेच्या निवडणूकीमध्ये तो मोठा इश्यु करायचा की, मी मार्केट बंद केला आणि गुजराथी लोकांची मते घ्यायची. असा प्रकार केला आणि आमच्या कोळी महिलांवर त्यांनी अत्याचार केला आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, हे आरक्षण बदली करण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला? तुम्ही गुन्हा दाखल करणार की नाही ते सांगा. त्या माणसाबद्दल तुम्ही गुन्हा दाखल करा. तो तुमचा अधिकार आहे.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर साहेब, एवढे वर्षे त्या कोळी लोकांना हटवले नाही, मग तुम्ही कसे काय हटवले?

**मा. आयुक्त :-**

चौकशी झाल्याशिवाय पुढे जात नाही.

**मिलन पाटील :-**

हे बघा, तुमच्या समोर आहे ना.

**मा. आयुक्त :-**

त्या प्रेसवाल्याला बोलवावे लागेल. कोणी दिले ते विचारावे लागेल. खाली प्रिंटीग प्रेसवाल्याचे नाव असते.

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, जाहिरात विभागसे पुछीए की, यह उनसे पुछकर लगाया? वो क्या कर रहे है?

(सभागृहात गोंधळ)

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही स्थानिक लोकांना बाहेर काढता आणि परप्रांतिय आणता. हा तुमचा कुठला न्याय झाला? आमचे उपजिवीकेचे साधन मासेमारी आहे.

**मा. महापौर :-**

पहिल्यांदा समजून घ्या. माझ्या माहितीप्रमाणे ते जे विकणारे लोक होते ते भय्या लोक होते. दुसरी गोष्ट त्यांना उचलले ते नॉन हॉकर्समध्ये बसलेले होते.....

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, यह भय्या वर्ड क्या है? यह भय्या वर्ड मतलब यह तो पुरे उत्तर भारतीय लोगोंका उपमान है।

(सभागृहात गोंधळ)

**रामनारायण दुबे :-**

उस शब्द की परीभाषा आप नही जानते हो। आपण लोग नाच रहे हो। भय्या और भाई का क्या मतलब होता है यह आप नही समझ पाओगे।

**भगवती शर्मा :-**

आपने उत्तर भारतीयोंका अपमान किया है।

(सभागृहात गोंधळ)

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब, विषय को आगे बढाया जाए। यह फालतु लोगो के बकवास मे नही आकर विषय को आगे चलाया जाए।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

या गोंधळामुळे आजची महासभा तहकुब करण्यात येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, सभा तहकुब करु नका.

(सभागृहात गोंधळ)

**(मा. महापौर आणि बी.जे.पी. व शिवसेनेचे सर्व सन्मा. सदस्य सभागृहाबाहेर गेले.)**

**आसिफ शेख :-**

या सभागृहाचे कामकाज सुरु करण्यासाठी सन्मा. सभागृह नेते श्री. जयंत पाटील यांनी पिठासिन अधिकारी म्हणून सुत्रे स्विकारावीत असा मी प्रस्ताव मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौरांच्या निलंबनाचा ठराव आणा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त महोदय, मै मा. महापौर के इस तरह अचानक सदन छोड जाने पर निंदा प्रस्ताव पारित करता हू।

**नयना म्हात्रे :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, प्रकरण क्र. १५ चा जो ठराव आता वाचला गेला त्या ठरावाला माझी लेखी सुचना आहे ती घ्या.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

कोणत्या ठरावाला लेखी सुचना आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, प्रकरण क्र. १५ मधील अनुक्रमांक ०३.

**मिलन पाटील :-**

तुम्ही मा. आयुक्तांना निर्देश द्या की, या माणसावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. मा. आयुक्त साहेब, तुम्ही याच्यावर गुन्हा दाखल करणार की नाही याचे आश्वासन आम्हाला द्या.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

मा. आयुक्त साहेबांनी, संपूर्ण चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**नयना म्हात्रे :-**

कशावर कार्यवाही करायची.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही गुन्हा दाखल करणार की नाही?

**मा. आयुक्त :-**

ते कोणी छापले, कशासाठी छापले ती चौकशी करुन जर अयोग्य असतील तर गुन्हे दाखल करु.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, राज्य शासनाचा निर्णय आहे की, ज्या बॅनर, होर्डीग्जमुळे शहराचे वातावरण बिघडण्याची शक्यता आहे किंवा न्यायव्यवस्था बिघडू शकते. त्या होर्डीग्ज लावणाऱ्यावर गुन्हा दाखल केला जाउ शकतो आणि ते महापालिकेला करावे लागेल.

**शरद पाटील :-**

मा. महापौरांनी सभा तहकुब केल्यानंतर सभा चालु शकते का?

लक्ष्मण जंगम :-

हे सर्व सभागृह डिसीजन घेईल तसे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी, जेव्हा एखाद्या मा. पिठासिन अधिकाऱ्याला सभा तहकुब करायची असेल तर स्वतःच्या मनाने ती करु शकत नाही. सभागृहात उपस्थित असलेल्या कुठल्याही सदस्याने तशी मागणी करायची की, ही सभा तहकुब करा आणि त्याला सर्व सदस्यांनी मान्यता दिली. तरच सभा तहकुब करता येते. अन्यथा करता येत नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, आपण आपला अभिप्राय द्या.

**नगरसचिव :-**

सभा तहकुब करण्याची सुचना ही सभागृहातून यावी लागते आणि तिला सर्वांनी बहुमताने मान्यता दिल्यानंतर ती होते.

**अनिल सावंत :-**

मा. पिठासिन अधिकारी, जो ठराव मांडला आहे. त्याला मी दुरुस्ती सुचवतो.

**नयना म्हात्रे :-**

सचिव साहेब, जरा माझी सुचना वाचा.

**विजया वैती :-**

मा. आयुक्त साहेब, प्रकरण क्र. १५ त्याच्यामध्ये ०४ आरक्षण क्र. २४४ क्षेत्र ०.२० हे मार्केटसाठी आरक्षित असून सदर क्षेत्र त्या परिसरातील लोकवस्ती पाहता कमी असल्याने लगतचे आरक्षण क्र. २४३ पार्कींग क्षेत्र ०.२० हे मार्केटमध्ये भाजी मंडईची गरज विचारात घेता पार्कींग ऐवजी भाजी मंडई आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. पण याच्यामध्ये लोकेशन दिलेलेच नाही. फक्त आरक्षण क्रमांक दिलेला आहे. मला याची माहिती हवी आहे. हे कोणत्या ठिकाणी आहे? लोकेशन काय आहे? हे टाउन प्लानिंगवाल्यांनी सांगावे.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

आरक्षण क्रमांक काय आहे?

**विजया वैती :-**

२४४ आणि २४३.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, या ठरावाला सौ. नयना म्हात्रे यांनी काही सुचना दिली, ती कुठची आहे.

**विजया वैती :-**

श्री. अनिल सावंत साहेब, पहिला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळू द्या.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

मला सभागृह शिस्तीने चालवायचे आहे. एका वेळी एकानेच बोलायचे.

**मा. आयुक्त :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, रामदेव पार्क रोड हे २४४ आरक्षण आहे.

**विजया वैती :-**

हे कुठे आले? कारण आत्ता मला त्यांनी कनकिया पोलिस स्टेशनच्या इथे सांगितले आहे.

**मा. आयुक्त :-**

सर्व्हे नं. ७४ आणि ३८१ गोडदेव.

**विजया वैती :-**

सर्व्हे नं. २४३ कुठे आहे?

**दिनेश नलावडे :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, माझ्या वॉर्डमध्ये आरक्षण १०८ मध्ये भाजी मार्केटचे आरक्षण आहे. त्याचा याच्यामध्ये समावेश करुन हे एस्टीमेट काढून त्या ठिकाणी भाजी मार्केट करण्यात यावे.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

आता या लिस्टमध्ये तुमचे आले आहे का?

**मा. आयुक्त :-**

ऑलरेडी जागा ताब्यात आहेत ते तर करणार आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. आता मिरारोडसाठी आरक्षण क्र. १८५ साठी जे सांगितले तेच कंन्टीन्यु करणार का? ते मार्केट आहे तेच कन्टीन्यु करणार की, दुसऱ्या ठिकाणाची जागा करणार?

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

दुसऱ्या ठिकाणी दोन आहेत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पण ते ठिकाण सांगितले नाही.

**मा. आयुक्त :-**

३३२ आणि ३३३.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

ते कुठे आले? आम्हाला तसे समजणार नाही. साहेब, जरा लोकेशन सांगितले तर बरे होईल.

**दिपक खांबित :-**

प्लेझेंट पार्ककडून जांगिड जवळचा रस्ता.

**मा. आयुक्त :-**

प्लेझेंट पार्क रस्ता.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मग तिथे तितक्या लांब जर मार्केट घेतले, मंडई घेतली तर शांतीनगरची लोकसंख्या, मिरारोडची लोकसंख्या लक्षात घेता त्यांना त्याच्यासाठी किती लांब जावे लागेल.

**मा. आयुक्त :-**

तिथेही विचार करु. सध्या जागा उपलब्ध नाही. ज्या सोडलेल्या जागा आहेत त्या आर.जी. आहेत. आर.जी. मध्ये करता येत नाही. जागा बघून रिझर्व्हेशन करावे लागेल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मग ओपनमध्ये कुठे करा ना. कुठे करायचे ते आम्ही निदर्शनास आणतो.

**मा. आयुक्त :-**

आम्ही ज्या १५ टक्के ॲमिनिटी ताब्यात घेतलेल्या आहेत. त्याच्यामध्ये नागरीकांच्या ॲमिनिटीजमध्ये ते बसवू.

**प्रकाश दुबोले :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, जे सहा सर्व्हे या ठिकाणी मार्केट बनवायला आणलेले आहेत. मा. आयुक्त साहेब, या गोषवाऱ्यामध्ये त्या अनुषंगाने पात्र ठरणारे भाजीवाले, फेरीवाले या परिसरात १५ वर्षापासून जास्त काळ रहिवासी आहेत. त्यांची आपल्याला सेवा करायची आहे. मग आपण या ठिकाणी त्यांचा सर्व्हे केलेला आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपण त्यासाठीच करतो.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, ही रिझर्व्हेशन चेंज करायची व्यवस्था चालली आहे. परंतु आपल्याकडे एकूण किती फेरिवाले आहेत? ते पंधरा वर्षे या मिरा भाईंदर शहरात राहतात.....

**मा. आयुक्त :-**

फेरीवाले किती आहेत याचा संबंध नाही. आपले जे मंडई रोडवर बसतात, मच्छीवाले रोडवर बसतात त्यांना एका ठिकाणी बसवायचे आहे.

**प्रकाश दुबोले :-**

पण साहेब, कोणाला बसवणार हा परत प्रश्न आहे ना? जे वीस वर्षे धंदा करतात आणि काल येउन धंदा करायला बसले.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्याकडचा रेकॉर्ड घेउन सर्व्हे करुन जे पंधरा वर्षापासून व्यवसाय करतात. त्यांनाच दिले जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मिरा भाईंदरमधले ना.

**मा. आयुक्त :-**

शहरातील.

**प्रकाश दुबोले :-**

मग साहेब, हे सहा रिझर्व्हेशन झाल्यानंतर भाईंदरमधील रस्त्यावर फेरीवाले बसायचे बंद होणार आहेत का?

**मा. आयुक्त :-**

एकही हातगाडी दिसणार नाही.

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, रेकॉर्ड म्हणजे आपण नक्की काय घेणार आहात? पंधरा वर्षाचा वास्तव्याचा दाखला घेणार आहात की, त्यांचे रेशनकार्ड घेणार आहात.....

**मा. आयुक्त :-**

त्यांचे रेकॉर्ड तपासण्याचे निरनिराळे हत्यार आहेत ना.

**वंदना चक्रे :-**

महानगरपालिकेची जी पंधरा-दहा रुपयांची पावती मिळते ती घेणार आहात?

**मा. आयुक्त :-**

नाही. पंधरा वर्षापासून मतदार यादीत नाव आहे का? रेशनिंग कार्ड आहे का? मुलांचा जन्म कुठे झाला आहे? कुठल्या शाळेत जातात हे सगळे रेकॉर्ड एकत्र करुन आपल्याला करता येईल.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, या ठिकाणी मार्केट आणले आहे. आपण एक पार्कींग चेंज करतो आहे. भाईंदरमध्ये पार्कींगचाच प्रॉब्लम आहे आणि आपण पार्कींग चेंज करुन त्या ठिकाणी मार्केट करत आहोत.

**मा. आयुक्त :-**

गावात जे दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत किंवा रात्री उभे राहतात त्यांना ट्रक टर्मिनलमध्ये निम्मी जागा घेतलेली आहे. बाकीचे घ्यायचे राहिलेले आहे. ते घेतल्यानंतर सगळ्या गावातील ट्रक तिकडे पार्कींगसाठी पाठवू.

**प्रकाश दुबोले :-**

मग हा पार्कींग विषय? आपल्याकडे असे पार्कींगचे रिझर्व्हेशन किती आहे?

**मा. आयुक्त :-**

ऑफीशिअली बघून सांगतो. हा विषय नाही.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

ठराव वाचून कायम करावा.

**प्रकाश दुबोले :-**

याच्यामध्ये तुम्ही एक पार्कींग रद्द करता.

**मा. आयुक्त :-**

पार्कींग रद्द केले तरीसुध्दा पार्कींगसाठी सफीशीएन्ट जागा आहे म्हणूनच रद्द केले.

**प्रकाश दुबोले :-**

नक्की आहे का?

**मा. आयुक्त :-**

होय.

**प्रकाश दुबोले :-**

पुन्हा परत बघा. तुमच्या दिडशे बसेस येणार आहेत.

**मा. आयुक्त :-**

बघायचा प्रश्नच नाही. तो विचार केल्याशिवाय सहीच करत नाही.

**भगवती शर्मा :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, ठराव वाचून कायम करावा.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

मधल्या काळामध्ये सन्मा. नगरसेविका सौ. स्नेहा शैलेश पांडे या ठराव मांडत होत्या. परंतु त्यांच्या ठरावाला अनुमोदन झालेले नाही. त्याच्यामुळे त्या ठरावाला मी मान्यता देत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा ठराव आपल्याकडे रेकॉर्डवर आलेला आहे का?

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

ठरावाची कॉपी इकडे आलेली नाही आणि ठरावाला अनुमोदनही झालेले नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग सचिवांनी तसे वक्तव्य करावे की, ठरावाला अनुमोदन झालेले नाही आणि ठरावपण आपल्याकडे आला नाही. म्हणजे ते रेकॉर्डवर येईल.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्या सौ. स्नेहा पांडे यांनी ठरावाचे वाचन केले होते. पण सदरचा ठराव सचिवांकडे अद्यापपर्यंत आलेला नाही आणि त्याला अनुमोदनही झालेले नव्हते.

**शशिकांत भोईर :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, ज्या गजबजलेल्या वस्त्या आहेत. तिकडे काही आरक्षणे पडलेली आहेत. त्या आरक्षणामध्ये आपण पुन्हा बदल करत आहोत. पण आता सध्या गोल्डन नेस्ट, कनकिया इथे पण लोकवस्ती वाढत आहे. तिकडे पण काही आरक्षणे आहेत. तसेच माझ्या निदर्शनात २४६ चे एक आरक्षण आहे. तिथेही मंडई करण्यात यावी. ते मोठे मार्केट होईल. कारण त्या बाजूला दिवसेंदिवस इमारती वाढत आहेत आणि लोकवस्तीही वाढत आहेत. तर आपण २४६ च्या आरक्षणाचा विचार करावा. तिथेही मंडईची गरज आहे. मी मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो की, नगररचना विभागाने २४६ आरक्षण कुठे आहे ते दाखवावे.

**मा. आयुक्त :-**

२४६ हा प्लेग्राउंड आहे. प्ले ग्राउंड वगळायला गव्हर्नमेंट मंजुरी देत नाही.

**शशिकांत भोईर :-**

आजुबाजुला कुठले असेल तर करा. कारण तिकडेपण लोकवस्ती वाढते आहे. कारण जी गजबजलेली वस्ती आहे तिकडेच आपण देतो आणि दुसऱ्या ठिकाणी देत नाही.

**मा. आयुक्त :-**

साहेब, २४४ मार्केट आहे, तिथे करु ते ताब्यातपण आलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

चालेल.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, मार्केटचा विषय आहे म्हणून मी उत्तन मार्केट विषयी बोलतो. मला काय श्री. दिवटे साहेबांनी एम.एम.आर.डी.ए. बद्दल थोडीशी माहिती दिली. तरीसुध्दा हा विषय चालला आहे म्हणून मी सांगु इच्छितो की, उत्तनमध्ये शेतकरी आणि मासेमारी हे सगळे प्रकारची तुम्हाला माहिती असेल की, तिथे चांगल्या प्रकारे पीक पिकते आणि भाजी, प्रत्येक गोष्ट फळफळावल आणि मासळी वगैरे. तर तिथे मला तरी वाटते की, लोक भाईंदरवरुन मासळी खरेदी करण्यासाठी आणि भाजी ताजी आणि गावची मिळते म्हणून लोकांचा भरपुर लोंढा जातो. सदर मार्केट हे खुप छोट्या आणि कमी जागेमध्ये आहे. आणि रस्त्यामध्ये त्याची एवढी भर पडते की, एक साधारण रिक्शासुध्दा पार होत नाही. आणि लोक रस्त्यावर बसतात. जाणाऱ्या येणाऱ्यांना त्रास होतोच. हे तर आपल्या अधिकाऱ्यांना पण माहित आहे. म्हणून सदर मार्केट विषयी लवकरात लवकर पर्यायी जागा शोधून जर दुसऱ्या ठिकाणी मार्केट चालु केले किंवा त्या मार्केटमध्ये बदल केला तर मला वाटते फार बरे होईल.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, ठराव कायम करा.

**वंदना चक्रे :-**

मंडईचा जो ठराव आज झालेला आहे. तो किती कालावधीमध्ये होईल? म्हणजे दोन वर्ष, तीन वर्ष शासनाकडे पाठवून कधीपर्यंत होईल ते सांगु शकाल का?

**मा. आयुक्त :-**

आत्ता हे जे प्रस्ताव आणलेला आहेत. ते मायनर मोडीफिकेशनचे म्हणजे असलेल्या रिझर्व्हेशनच्या जागा जास्त ऑब्जेक्शन येउ नये म्हणून त्यात बदल केलेले आहेत. आता केलेले बदल, हरकती, सुचना मागवायला द्यावे लागतील. त्यानंतर आलेल्या हरकती, सुचना मा. महासभेपुढे मांडून तो बदल झाला की, लगेच गव्हर्नमेंटकडे पाठवू. तोपर्यंत टेंपररी शेड बांधायला काही हरकत नाही. आपल्याला ओपन मार्केट करायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, एक मिनिट बोलू का? मा. आयुक्त साहेब, आपण हे जे मंडईचे सगळे प्रस्ताव पास करुन घेतले. पण आपल्याला खात्री आहे का की, हे सगळे मंडई बनल्यानंतर फेरीवाले रस्त्यावर बसणार नाहीत?

**मा. आयुक्त :-**

होय. जे नगरपालिका आणि महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे की, त्यांना मंडई, मच्छी मार्केट आणि मटण मार्केट देणे हे पहिले कर्तव्य आहे. आपण डेव्हलपमेन्ट प्लान बनवत असताना रिझर्व्हेशन ठेवले नाही. आपल्याला मार्केट बनवल्यानंतर रस्त्यावर कुठलेही मार्केट बसणार नाही किंवा फेरीवाले बसणार नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याची ग्वाही आपण देतो.

**मा. आयुक्त :-**

होय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ॲफीडेव्हीट लिहून देणार का?

**मा. आयुक्त :-**

ॲफीडेव्हीट नाही. जर फेरीवाले बसले.....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विषय असा आहे की, आपण प्रत्येक नागरीकाकडून ॲफीडेव्हीट लिहून घेता. आम्ही जेव्हा इलेक्शनला महानगरपालिकेमध्ये फॉर्म भरतो तेव्हा आम्ही ॲफीडेव्हीट लिहून देतो. मग तुम्ही आम्हाला ॲफीडेव्हीट द्या की, मंडई बांधल्यानंतर आम्ही एकही फेरीवाला रस्त्यावर बसू देणार नाही. साहेब, तुम्ही आमचे हात बांधून घेता.

**मा. आयुक्त :-**

पेशंट ऑपरेशनला घेण्यापूर्वी नातेवाईकांच्या सह्या घेतात. परंतु तो मेल्यानंतर डॉक्टरांची जबाबदारी नसते. त्यांच्या अगोदरच सह्या घेतात. परंतु, डॉक्टर पेशंटला वाचवण्याचा आतोनात प्रयत्न करतात.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, एस.टी. स्टॅन्ड ते सुभाषचंद्र बोस मैदान तिथून एक रोड जातो. त्या रोडवर कमीत कमी चार मंडई.....

**नयना म्हात्रे :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, रविवारचा जो बाजार मेनरोडला भरतो. त्याचादेखील बंदोबस्त करा. कारण त्याच्यावर किती बस चालतात

**मिलन पाटील :-**

आता सी.आर.झेड. बाधीत आहेत. तर लवकरात लवकर तुम्ही नगररचनाला सुचना द्या की, लवकर त्याच्या मागे लागून जर तो रोंड झाला तर तिकडे आपले चार मार्केट विकसित होतील.

**मा. आयुक्त :-**

प्रयत्न करु आणि एम.एस.आर.डी.सी. कडे विरार टू दहिसर लिंकरोड गर्व्हमेन्टने दिलेला आहे. प्लान एस्टीमेट बनवायचे चालु आहे. तो रोड झाल्यानंतर आपल्याला त्याच्याबरोबर परवानगी मिळेल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आदरणीय आयुक्त साहब, जो फेरीवाला प्रश्न है। इसके अंतर्गत मैने २८/०५ को बांधकाम विभाग को बाकायदा एक लेटर दिया है। इसमे स्टेशन पर पूल से लेकर आगे खाडी तक जो नाला जा रहा है। इसको अगर रिपेअर कर दिया जाए और रिपेअर करनेके बाद इसपर स्लॅब डाल दिया जाए और स्लॅब डालकर उसके उपर शेड करके इस्तेमाल की परमिशन दि जाए तो पुरा मेन रोड का फेरीवाला एरिया नाले के स्लॅब पर शिफ्ट कर सकते है। उसके लिए मार्केट की जरुरत भी नही है। दो साल से यह व्यवहार चल रहा है की, इस जगह का हम पुरा इस्तेमाल कर सकते है। लेकीन इस पर अब तक कोई कारवाई नही हुई है। यह बहुत ही पोटेन्शीअल स्पेस है। इससे मेन रोडका ट्राफीक भी कम हो जाएगा। इस्ट वेस्ट मे इसका थोडासा कनेक्शन हो जाएगा। तब लोगोको मालुम होगा। नाले के उपर स्लॅब बनाकर उसका इस्तेमाल करने के बारे मे भी सोचा जाए।

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, नगररचनाने ही सर्व आरक्षणे जेव्हा केली, गार्डन वगैरे टाकण्यात आले. ते सगळे बी.जे.पी. सरकार असताना केलेले आहे. त्यांना मच्छी मार्केटची काही चिंता नव्हती. इकडे निरनिराळे आरक्षणे टाकली. मच्छी मार्केटचे एकही आरक्षण टाकले नाही.

**मा. आयुक्त :-**

मार्केट म्हंटले आहे. त्या मार्केटच्या सदराखाली मच्छी मार्केट आणि मटन मार्केट एका बाजूला करणार.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

सन्मा. नगरसेविका सौ. नयना म्हात्रे यांची सुचना आलेली आहे. तरी ठराव क्र. १५ बद्दल आपण इकडे विरोध नोंदवलेला आहे. तर त्याची नोंद घेतली आहे आणि आम्ही तशी नोंद करुन घेउ.

**जुबेर इनामदार :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, ठराव वाचून कायम करुन घेण्यात यावा.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

आपण 'अ' आणि 'ब' असे दोन ठराव केलेले आहेत. दोन्ही ठराव सर्व सुचनांसह मंजुर करत आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, ठराव वाचून कायम करण्यात यावा.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

ठराव कायम झालेला आहे आणि मंजुर झालेला आहे. सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १५ :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मंडईकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरफार करणे व मंडईकरिता नविन आरक्षण प्रस्तावित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. १९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयात भाजी, फळ व फुल मार्केट करीता आवश्यकतेनुसार नव्याने आरक्षण प्रस्तावित करणे, आरक्षणाच्या क्षेत्रात व वापरात बदल करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलमानुसार फेर बदल करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७(१) नुसार मंजुरी देण्यात येत आहे. सदर समितीस फेरबदलाचे प्रस्ताव शासनाकडून मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत. मंजूर करून प्रस्तावित केलेल्या मार्केट आरक्षणाच्या जागेवर मार्केट करीता खुल्या शेड बांधण्यात याव्यात व त्यामध्ये भाजी, फळ, फुल व मांसाहारी मार्केट सुरू करावे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. तुळशीदास म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. लक्ष्मण जंगम व अनुमोदक श्री. चंद्रकांत मोदी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

आरक्षण क्र. २६९ या जागेवर भाजी मंडई करणे अपेक्षित आहे. तरी सदर समितीने यादी आरक्षणाचा सविस्तर आढावा घ्यावा.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक श्री. लक्ष्मण जंगम यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

आरक्षण क्र. १८५, (बसस्टॅन्ड) मौजे भाईंदर स.क्र. १३६ पै., १३७ पै. क्षेत्र ३९, सदर जागेतील बांधकामाबाबत न्यायालयात दावा प्रलंबित आहे. सदर दाव्यातील, संबंधीत मा. न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून बस स्टॅन्डचे आरक्षण काढून त्याठिकाणी शाकाहारी व मांसाहारी मार्केटचे आरक्षण टाकण्यात यावे. मौजे गोडदेव स.क्र. ६७(जुना) ११२ (नविन) या जागेत कच्छ प्लानप्रमाणे तलाव दर्शविलेला असून ते नियोजन समितीने आरक्षण टाकलेले नाही. तसेच सदर जागेमधून मुख्य नाला, नर्मदा नगर व औद्योगिक गाळे तसेच रहिवाशी वस्ती असल्याने त्याठिकाणी आरक्षण टाकण्याचा प्रस्ताव वगळण्यात येत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर पूर्वेच्या वाढत्या लोकसंख्येला भाजी मार्केटची गरज आहे. एस. एन. कॉलेजच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भाजी विक्रेते बसतात. हे भाजी विक्रेते रस्त्यावर बसल्यामुळे रस्त्यावर चालणा-या जनतेस तसेच वाहनांना अडचणीचे होत आहे. त्यामुळे कॉलेज समोरील तलावात (सुशोभिकरण केलेले तलाव सोडून) भराव करुन भाजी मार्केट बनविल्यास लोकांची गरज भागुन रस्त्याही मोकळा होईल. तसेच उर्वरीत जागेत खेळाचे मैदान बनविल्यास भाईंदर पूर्वेच्या तरुणांचा मैदानाचा प्रश्न कायमचा सुटेल.

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**

**सही/-**
**जयंत महादेव पाटील**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६, मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास आराखड्यातील, विकास योजनेतील रस्ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार भुसंपादन करणेस प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देणेबाबत.

**शशिकांत भोईर :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, ठराव होण्या अगोदर आपण जे मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास आराखड्यातील, विकास योजनेतील रस्ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार भूसंपादन करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणार आहोत. अशी किती आरक्षणे याच्यात येतात? किंवा कोणत्या इमारती येतात. भूसंपादन करण्यासाठी ते येणारच ना? मग आपण त्याचा आढावा घेतलेला आहे का? समजा आपण रोड दिलेले आहेत. एक ते सोळापर्यंत दिलेले आहेत असे वाटते. तर त्याच्यामध्ये अशा किती इमारती येतात? किती झोपडपट्टी येतात? अशी किती घरे येतात? याचा आढावा आपण घेतलेला आहे का? की, आपण भूसंपादन करुन काय करणार आहोत. जर घरे येत असतील तर त्यांना हाउस ऑफ डिसहाउसमध्ये सदनिका देणार आहोत का कसे? याचाही खुलासा होणे गरजेचे आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये दोन्ही बाजूंनी रोड झालेले आहेत. फक्त मध्ये चार-पाच स्ट्रक्चर येतात. असेच रोड घेतलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, याच्यामध्ये भाईंदर (पू.) एम.आय. उत्तर नगर येथील बारा मीटरचा रस्ता रुंदीकरणाचा पण आहे. त्याच्यामध्ये इंडस्ट्री एरिया आहे आणि पुन्हा काही इमारती पण आलेल्या आहेत. त्याच्याप्रमाणे भाईंदर (पू.) केबिन रोड येथे रेल्वे फाटक ते उड्डाणपूल पर्यंत जोडणारा अठरा मीटर व तीस मीटरचा रेल्वे समांतर रस्ता रुंदीकरण करायचा आहे. त्याच्यामध्ये पाण्याची टाकी येणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

याच्यामध्ये आपली पाण्याची टाकी येते.

**शशिकांत भोईर :-**

आणि जर स्टेशनपासून रुंदीकरण करणार आहात तर त्यामध्ये अनेक इमारती येणार आहेत. याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

आपली पाण्याची टाकी रोडच्या पलिकडे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

नाही ती त्याच्यामध्येच येते.

**शशिकांत भोईर :-**

जर आपल्याला उड्डाणपूलापर्यंत जायचे असेल तर रेल्वे समांतरच सरळ रस्ता जाईल ना?

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

तिकडे एक सुलभ शौचालय आहे आणि एका बंद फॅक्टरीचे स्ट्रक्चर आहे.

**मा. आयुक्त :-**

तेवढेच आहे. बाकी रोड खुला आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यामध्ये संम्पपण येईल.

**मा. आयुक्त :-**

या रोडमध्ये काही रोड करण्यासाठी ज्या अडचणी आलेल्या आहेत, दोन बांधकामे, तीन बांधकामे, चार बांधकामे, असेच विषय आणले आहेत. बाकी सगळे क्लिअर आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पुन्हा इकडे चौकशी करुन बघा. कारण १८ मीटर जर रस्ता असेल तर त्याला पाण्याची टाकी लागणार.

**मा. आयुक्त :-**

पाण्याच्या टाकीला हात लावणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

माझी सुचना आहे. भाईंदर पूर्व केबिन रोड बोललात तर जागृती बिल्डींग पासून येणार की, रावल नगरच्या पुढचा?

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

शौचालयापासून जे काही स्ट्रक्चर आहे.

**दिपक खांबित :-**

शौचालयपासून येणार.

**शशिकांत भोईर :-**

मग तुम्ही याच्यामध्ये तशी दुरुस्ती करुन घ्या. नाही तर ब-याच इमारती त्या आरक्षणामध्ये जातील.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, या रोडवरच आत्ता एम.एम.आर.डी.ए. तर्फे सुलभ शौचालय बांधण्यात आलेले आहे. ते तोडणार का?

**लक्ष्मण जंगम :-**

केबिन रोडला ब-याच बिल्डींगही आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, त्याचबरोबर १० नंबरचे, भाईंदर (पूर्व) अभिनव शाळे समोरुन रावल नगरकडे जाणारा रस्ता. तो १२ मीटर रस्ता रुंदीकरणाचा आहे. त्याच्यामध्ये किती इमारती जाणार आहेत?

**दिपक खांबित :-**

नाकोडाच्या इकडे थोडेसे अतिक्रमण आहे. फक्त दोन-तीन दुकाने आहेत.

**शशिकांत भोईर :-**

नाकोडाच्या इकडे म्हणजे टर्नवर. रावलनगरकडे जाणारा म्हणजे तो डायरेक्ट जाईल ना? आपला जो नाला बनवला आहे. त्या नाल्याच्या सलग रस्ता होईल ना? मग त्याच्यामध्ये इमारती पण येणार. तिथे एक मंदिर पण बांधण्यात आलेले आहे. ते मंदिरपण जाईल का?

**दिपक खांबित :-**

साहेब, इमारतीला हात लावणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

याचा खुलासा होणे गरजेचे आहे. कारण आपण जो दहा नंबरचा रस्ता आहे. तो नक्की कुठून जाणार आहे? नाकोडाकडून केबिन नाक्यावर जाणार आहे की, रावल नगरला जाणार आहे? याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

**दिपक खांबित :-**

नाकोडाकडून आता आपण शौचालय तोडले आहे. त्याचा समोरचा रस्ता.

**शशिकांत भोईर :-**

मग तो नर्मदा नगरला घुसून केबिन नाक्यावर जातो. तो रस्ता आहे की, शौचालय तोडल्यापासून ते रावल नगरकडे जाणारा, म्हणजे नर्मदाकुंज बिल्डींग आहे तिथपर्यंत तो जाणार? याचा खुलासा होणे गरजेचे आहे की, तो कोणता रस्ता आहे?

**दिपक खांबित :-**

स्वाती अपार्टमेन्टपर्यंतचा रस्ता.

**शशिकांत भोईर :-**

तो रस्त्याचा पार्ट होईल.

**दिपक खांबित :-**

रस्ता म्हणजे आपण जागा जे काही टी.डी.आर. देवून, एफ.एस.आय. देवून किंवा खाजगी वाटाघाटीद्वारे जे रस्ते ताब्यात येत नाहीत. ते कम्पलसरी फक्त ती जागा भूसंपादन करायची.

**शशिकांत भोईर :-**

पण तो रस्ता पूर्ण होत नाही. जरी आपण भारती अपार्टमेन्टपर्यंत घेतला. तरी तो रस्ता पूर्ण होत नाही. मग तो रस्ता रुंदीकरण करुन काय फायदा होणार आहे.

**दिपक खांबित :-**

तुमचे म्हणणे काय आहे की, पुढचा पण करायचा?

**शशिकांत भोईर :-**

होय. जर जात असेल तर रावल नगरपर्यंत जा. तो तसा बरोबर शॉर्टकट होईल.

**शानु गोहिल :-**

भाईंदर (पू.) जेसलपार्क ते घोडबंदर खाडी समांतर डी.पी. रस्ता, साहेब यह रस्ता बना रहे है, बहोत अच्छी बात है। लेकीन शायद वहॉ पर सी.आर.झेड. की प्रॉब्लेम आयेगी। तो यह रस्ता बनेगा की नही? ताकी हमे लोगों को उस तरह से फीड बॅक करना पडेगा। आपने किस हिसाब से लिया? क्योंकी सी.आर.झेड. .....

**मा. आयुक्त :-**

परमीशन के लिए डाला है।

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

तो विषय नंतर आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खांबित साहेब, आता ज्या इमारती रस्त्याच्या आड येतात त्या आपण डीमॉलीश करणार का?

**दिपक खांबित :-**

आता आपण फक्त भूसंपादन करणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

फक्त भूसंपादन करणार आणि त्यांना तोडणार नाही?

**दिपक खांबित :-**

पूढे विषय येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग त्या तोडल्या तर त्या लोकांना तुम्ही पर्यायी जागा देणार की नाही? आता फाटक रोडला मोठी इंडस्ट्री आहे. त्यांना तुम्ही पर्यायी जागा देणार?

**तुळसीदास म्हात्रे :-**

हनुमान नगर, गोल्डन नेस्टचा जो रस्ता अर्धवट राहिलेला आहे, एक्झीस्टींगमध्ये अडकलेला आहे. तो कधी पूर्ण होणार आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ६० फूटी रोड, शिवसेना शाखेसमोरील सुरुवातीचा १८ मीटर रस्ता रुंदीकरण करणे. इकडे एन्क्रोचमेंट कुठे आहे?

**दिपक खांबित :-**

साहेब, सुरुवातीला तिकडे ट्राफीक जाम होते. तो तिथे साठ फुट नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग तुम्ही तिथे काय करणार आहात?

**दिपक खांबित :-**

ती जागा मोकळी करायची.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ती इमारत आहे.

**दिपक खांबित :-**

भूसंपादन करुन जागा खाली करावी लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, भूसंपान म्हणजे एक्झॅक्ट काय?

**मा. आयुक्त :-**

भूसंपादन म्हणजे १२६ खाली लॅन्ड ॲक्वीझीशन.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, पण ती इमारत आहे. ती तुम्ही ॲक्वीझीशन कशी करणार.

**मा. आयुक्त :-**

आम्ही ते करु. परवानगी असेल तर त्यांना कॉस्ट मिळेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, विषय असा आहे की, आपला डी.पी. प्लान १९९७ ला फायनल झाला. आणि ही इमारत ग्रामपंचायतीच्या वेळेची आहे. आणि हा ६० फूटी रोड आपण ९७ ला केलेला आहे. पण त्याच्यापेक्षा अगोदरची ही बिल्डींग आहे. मग तुम्ही कसे काय करणार?

**मा. आयुक्त :-**

ते भूसंपान होईल. करणारे करतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विषय असा आहे की, आता श्री. खांबित साहेब बोलले की, इमारत पाडणार नाही. आता ही इमारत आहे. इथे भूसंपादन कसे करणार?

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला काय पाहिजे ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हाला असे पाहिजे की, इथे फक्त एक इमारत आहे. ही इमारत तुम्ही कशी तोडणार?

**मा. आयुक्त :-**

तोडणार म्हणजे भूसंपादन झाल्यानंतर आपली मालकी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ती इमारत आहे. मग भूसंपादन कशी करणार? जागा असेल तर भूसंपादन करणार ना?

**मा. आयुक्त :-**

होय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग ती जागा नाही. तिकडे बिल्डींग बांधलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

इमारतीसह जागा मिळणार.

**शशिकांत भोईर :-**

मग तिथे राहतात त्यांची व्यवस्था?

**मा. आयुक्त :-**

परवानगी असेल तर इमारतीचे कॉस्ट मिळेल. परवानगी नसेल तर इमारतीचे कॉस्ट मिळणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ती ग्रामपंचायतीच्या वेळेची इमारत आहे.

**मा. आयुक्त :-**

पण परवानगी असेल ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमच्याकडे रेकॉर्ड असेल. तुमचे आस्थापना विभाग कुठे आहे?

**मा. आयुक्त :-**

ते तुम्हाला ज्यादा माहिती. सगळ्या गावाचे डोक्यात घेउन कसे बसणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग साहेब, आता याचे काय करणार? साहेब, तुम्ही जे १६ रस्ते दिले आहेत. त्या सगळ्या रस्त्यांमध्ये बहुतेक बिल्डींग आहेत. मग साहेब तुम्ही या सगळ्यांचे कसे करणार?

**मा. आयुक्त :-**

छोटे-छोटे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मोठे आहेत. दोन माळ्याची बिल्डींग आहे.

**मा. आयुक्त :-**

हाउस फॉर डीसहाउस आहे ना.

**हेमा माळी :-**

घोडबंदर गावातील १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे रुंदीकरण .....

**सलीम शेख :-**

साहेब, प्लेझेंट पार्कचा जो रोड आहे तो दोन वर्षापासून बंद आहे. अर्धवट रस्ता बनलेला आहे आणि पुढचा काही भाग बंद आहे. तो रस्ता कधी करणार? प्लेझेंट पार्कचा रोड डॉन बॉस्कोच्या समोर. अमीष पार्कला जाणारा रोड. तो संपूर्ण रोड बनलेला आहे. त्यांचे टेंडर पास झालेले आहे. संपूर्ण रोड तयार आहे. त्याचा थोडासा भाग बाकी आहे. तो कधी करणार? तो समाविष्ठ करुन घ्या. मा. आयुक्त साहेब, आणखीन एक विषय आहे. मुन्शी कंपाउंड मधील १८ मीटरचा रस्त्याचे रुंदीकरण करणे. साहेब, त्या १८ मीटर रस्त्याचे रुंदीकरण तुम्ही करणार?

**हेमा माळी :-**

घोडबंदर गावातील जो रस्ता करणार आहेत. त्याच्या बाजूला झोपडपट्टी आहे.

**मिलन पाटील :-**

त्याच्यामध्ये झोपडपट्टी आहे. त्या म्हणतात की, ती आदीवासी झोपडपट्टी आहे.

**मा. आयुक्त :-**

दि. ०१/०१/१९९५ च्या पूर्वीचे असेल तर ते ठेवावे लागेल. त्यांची कुठे तरी व्यवस्था करावी लागेल.

**सलीम शेख :-**

मा. आयुक्त साहेब, नंबर ०८, मुन्शी कंपाउंडमधील १८ मीटर रस्त्याचे रुंदीकरण करणे. मा. आयुक्त साहेब, दोन्ही बाजुला घरे आहेत. संपूर्ण रस्ता तयार करणार, तिथून ते शेल पेट्रोल पंपापर्यंत. ती संपूर्ण घरे जातील.

**आसिफ शेख :-**

मा. पिठासीन अधिकारी, नंबर १४, भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन ते सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंतचा ३० मीटर रुंदीचा रस्ता. ते कसे काय करणार? त्याच्यामध्ये झोपड्या येतात. त्या हटवणार का? ते तातडीने करायला पाहिजे. त्याप्रमाणे भाईंदर (प.) येथे दोन रस्ते आहेत. भाईंदर (प.) मनोरमा अपार्टमेंट ते पुढचा रस्ता. आणि त्याच्यानंतर दुसरा रस्ता आहे. भाईंदर (प.) वर्धमान नगर म्हणजे भाईंदर सेकंडरी स्कुलच्या लागून गॅस गोडाउनकडे जो रस्ता जातो. ते दोन रस्ते त्यामध्ये समाविष्ठ करावेत. ते दोन्ही रस्ते आपल्या डी.पी. प्लानमध्ये आहेत.

**प्रभात पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, गोल्डन नेस्टपासून नवघर गावाकडे जाणारा रस्ता आज तीन वर्षे चालू आहे हे तुम्हाला माहिती आहे का? श्री. पाटील साहेब, आपण मा. पिठासिन अधिकारी आहात. आपल्याला कल्पना असेल आणि ह्यांचा पूर्वीपासून वॉर्ड होता. ती पाच वर्षे संपली आहेत. पण असे कधी होणार आहे. गोल्डन नेस्टकडून नवघर गावाच्या पाठीमागे जातो तो रस्ता, तीन वर्षे झाली मी काम चालू बघते आणि तो अर्धासुध्दा झाला नाही. परवा संकष्ट चतुर्थीच्या दिवशी एक मारुती फीयाट गाडी तिथे आता तिथे चौकी बांधायला घेतली आहे. त्या पोलजवळ, म्हणजे आपला रिलायन्सचा जो टॉवर आहे त्याला आपटून उलटी पडली. नशीब तिचा एक दरवाजा उघडला गेला, पूर्ण बाजूला झाला आणि त्याच्यातून चार माणसे बाहेर पडली. अन्यथा रामनाराण बिल्डींगच्या इथे नाला आहे त्या गटरामध्ये रात्रीच्या साडेनउच्या अंधारामध्ये चार माणसे पडली होती. हे रस्त्याचे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे? बाजूला नाला बांधायचा आहे. रस्ता बांधायचा आहे. हे कधी होणार? नाल्याचा रस्ता साफ नाही. बाजुची बांधकामे तशीच आहेत. पूर्ण नवघर गावाकडे जाणारा भाग. घेतला नाही तर घ्या. तो घ्यायला हवा.

**मिलन पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी, धारावीजवळ जातानासुध्दा रस्ता फार अरुंद आहे. तो रस्तासुध्दा घ्या.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि. १४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि. २५/०८/२००० अन्वये मंजुर झालेली असून ती अनुक्रमे

दि. १५/०७/९७ व दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

मंजुर विकास योजनेतील रस्ते तयार करावयाचे असून महापालिकेमार्फत वेळोवेळी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्त्याची कामे हाती घेण्यात येतात. सदर रस्त्याची जागा वेळोवेळी वाटाघाटीद्वारे व टी.डी.आर. / एफ.एस.आय. देवून ताब्यात घेण्यात येते. तथापी काही जागेबाबत संबंधित जमिन मालकाकडून विकासकाचा प्रस्ताव सादर न झाल्याने भूसंपादन करणे आवश्यक झालेले आहे. सदर रस्त्याचा तपशिल खालीलप्रामाणे आहे.

१) हटकेश उद्योगनगर मधील ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यामधील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते ग्रीन कोर्ट क्लब पर्यंतचा रस्ता.

२) प्लेझंट पार्क ते मिरागाव व एम.आय.डी.सी. पर्यंतचा ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

३) रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. पर्यंत ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

४) भाईंदर (प.) अमतवाणी सत्संग समोरील स्मशानभुमी पर्यंत जाणारा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

५) भाईंदर (पु.) एम.आय. उद्योग नगर मधील १२.०० मी. रूंदिच्या रस्त्याचे रूंदीकरण.

६) भाईंदर (पु.) केबिन रोड ते रेल्वे फाटकास जोडणारा १८.०० मी. रूंद रेल्वे समांतर रस्ता.

७) घोडबंदर गावातील १८.०० मी. रूंदीच्या रस्त्याचे रूंदीकरण करणे.

८) भाईंदर (पु.) जेसल पार्क ते घोडबंदर खाडी समांतर डी.पी. रस्ता.

९) भाईंदर (प) उड्डाणपुल ते मिरा रोडकडे जाणारा रेल्वे समांतर १३.०० मी. रूंदीचा रस्ता.

१०) भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंतचा ३०.०० मी. रूंदीचा रस्ता.

११) भाईंदर उत्तन – १८.०० मी. व ३०.०० मी. रूंदीचा रस्ता.

१२) भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) येथिल शिवसेना शाखेसमोरील सुरूवातीचा १८.०० मी. रस्ता रूंद करणे.

वरील रस्ते तयार करताना योजनेतील उर्वरीत रस्त्याची जागा व विकास योजनेतील रस्ता रुंदीकरणातील जागा ताब्यात घेण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व जिल्हाधिकारी यांचे मार्फत भुसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्याकरिता व सदर भूसंपादन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक सूचनांसह मंजुरी देण्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे. ज्या कोणाची सुचना असेल समावेश करा.

**निर्मला सावळे :-**

मा. पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगी बोलते.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

याच्यात काही सुचना आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझी सुचना आहे.

**निर्मला सावळे :-**

याच्यामध्ये माझी सुचना आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

सुचना समाविष्ट करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, या ठरावामध्ये तारोडी पासून धारावी माता मंदिरापर्यंत रस्ता रुंदीकरण करावा अशी मी सुचना मांडतो. माझी ही सुचना ठरावामध्ये समाविष्ट करुन घ्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझी पण सुचना आहे. मौजे खारी सर्व्हे क्र. २६(१५४) या जागेमधून जाणारा जैन मंदिर ते राहूल पार्क पर्यंतचा रस्ता १८ मीटर रुंद विकास योजनेचा रस्ता तसेच दुसरा मौजे काशी सर्व्हे क्र. ६ या जागेमधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ते जरीमरी तलावापर्यंतचा १८ मीटर रुंद विकास योजनेचा रस्ता. आणखीन एक रस्ता आहे. नीलकमल अपार्टमेंट ते सफारी हॉटेल राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ हा रस्ता त्यामध्ये समाविष्ट करा अशी मी सुचना मांडते.

**निर्मला सावळे :-**

मा. पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलते. सदर रस्त्यांचा जो तपशिल दिलेला आहे त्याच संबंधीतच माझ्या वॉर्डाच्या संबंधित हा विषय एक सुचना म्हणून आपल्यासमोर मांडते. भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान येथील उड्डाणपुलाच्या दुभाजकाच्या मध्यभागी ज्या झोपडपट्ट्या आज वसलेल्या .आहेत.

त्याच्यामध्ये बरीचशी कातकरी कुटूंबे रस्ता विभाजन करताना, रस्ता रुंदीकरण करताना जी काही कुटूंबे बाधीत झाली होती. त्यावेळेस मा. आयुक्त साहेब हे आयुक्त होते. आणि त्यावेळेस त्यांनी त्या समाजाला, त्या कुटूंबाना विस्थापित करण्याचे आश्वासनही दिले होते आणि मी मा. महापौर असताना आपण हाउसींग फॉर डीसहाउस या प्रकल्पामध्ये त्यांना समाविष्ट करुन घेण्याची तरतुद केली होती. त्याप्रमाणे माझी इथे सुचना आहे की, सुभाषचंद्र बोस मैदानातील जी बाधीत घरे आहेत. त्यांना विस्थापीत करुन घ्यावे म्हणून हा वेगळा विषय या विषयामध्ये मांडून मी आपल्यापुढे एक सुचना मांडते आणि मा. आयुक्तांनी लवकरच पावसाळ्याच्या अगोदर, म्हणजे आता पावसाळा सुरु झालेला आहे. ब-याच कालावधीपासून या गरीब कुटूंबांची मोठ्या प्रमाणात मागणी आहे आणि यांना येथे समावून घ्यावे अशी माझी सुचना आहे.

**एस. ए. खान :-**

साहेब, आपण मागेपण आश्वासन दिले होते. हे पूर्नवसन करायचे आहे. तर पावसाळा चालु झाला आहे तर ते लवकरात लवकर करुन घ्यावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे पूर्नवसन करण्याबाबत आपल्या डोक्यामध्ये काही कल्पना आहे का? आपण जरा सांगितले तर बरे होईल.

**मा. आयुक्त :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, ज्यावेळेला आपण नगरपालिका असताना ३३३ चा विचार केला होता. तिथे शिफ्ट करायचा विचार होता. परंतु ती जागा पोलीस कमिशनरला दिली. त्यांनतर बी.एस.यु.पी. ची योजना स्टेट गर्व्हमेंटकडे चार दिवसात सबमिट करणार आहे. त्यामध्ये ते कवर होतील. परंतु, तुर्त दोन रोडच्या मध्यभागी असल्यामुळे त्या लोकांची छाननी करुन म्हणजे जे ०१/०१/९५ पूर्वीचे अधिकृत आहेत. त्यांचा विचार करुन करायला काही अडचण नाही. त्यामध्ये दुसरा एक मुद्दा होता की, एकूण ऑफीस इमारत बांधताना आदिवासींच्या पाच फॅमिली होत्या. आता ते २६ म्हणतात. परंतु, पाच फॅमिली आणि सव्वीस लोक, म्हणजे त्यावेळेला जे होते ते राहणारे सात-आठ लोक होते. परंतु, आता टोटल २७ कुटूंबे झाली आणि त्यांना घरे द्या. हे जमणार नाही. त्यामध्ये पाच कुटूंबे आहेत आणि २६ लोक आहेत. आपण पाच कुटूंबांना देउ. आत्ता पाचची सव्वीसच्या सव्वीस कुटूंबे झाली. तर २६ लोकांना देता येणार नाही.

**निर्मला सावळे :-**

मा. पिठासिन अधिका-यांच्या परवानगीने बोलते. महानगरपालिकेने ज्याप्रमाणे सर्व्हे केलेला आहे. यामध्ये पात्र झोपडपट्टीधारक ७३ अशा संख्येची त्यांनी नोंद केलेली आहे. तर त्याप्रमाणे आपण कागदपत्रांची पुर्तता करुन त्यांना घर अलॉट करावेत.

**मा. आयुक्त :-**

संपूर्ण तपासणी करुन यादी करुन सभागृहापुढे आणू.

**सलीम शेख :-**

मा. आयुक्त साहेब, माझीपण सुचना समाविष्ट करुन घ्यावी. मुन्शी कंपाउंडमधील १८ मीटर रस्त्याचे रुंदीकरण करणे, या ठरावामध्ये तो उल्लेख नव्हता.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. पिठासीन अधिकारी, मेरी एक सुचना है। शांती नगर, आगरकर रोड खराब हो गया है। बिल्डरने एक बार बनाया उसके बाद रोड पुरा खराब हो गया है। वह भी समाविष्ट किया जाए। और स्टेशन से सिंगार प्लाझापर्यंत वह भी रोड एकदम खराब हो गया है। खड्डा हो गया है। उसका पॅचवर्क भी हुआ नही है। तो उसे जल्द से जल्द किया जाए।

**विजया वैती :-**

मा. पिठासीन अधिकारी, माझ्या पण सुचना समाविष्ट करा. पॉश कॉम्प्लेक्स ते छत्रपती शिवाजी मार्गापर्यंतच्या, सालासर गार्डन, हरियादिन पार्क ते छत्रपती शिवाजी मार्गपर्यंत, रितु पॅराडाईज, साई सरस्वती धामपासून सुंदर दर्शन ते छत्रपती शिवाजी मार्गापर्यंत या माझ्या सुचना लिहून घ्याव्यात.

**नयना म्हात्रे :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. आता मा. आयुक्त साहेब बोलले की, या इमारतीच्या खाली पूर्वी पाचच कुटूंबे होती. पण माझे असे स्पष्ट म्हणणे आहे, त्या कातक-यांना तुमच्यादेखील ऑफीसमध्ये बोलवा. मा. आयुक्त साहेबांनी देखील त्यांना बोलवावे आणि त्यांच्याकडून सविस्तर इन्क्वायरी करुन नंतरच त्यांना घरे द्यावी आणि आंबेडकर नगरला रस्ता रुंदीकरणामध्ये जी खरोखर लोकांची घरे तुटली. तर त्यांनादेखील पुर्नवसन करायला पाहिजे. कारण मी २००२ ला पण नगरसेविका होती आणि २००७ ला देखील मी निवडून आले. तर मी त्यांच्याबद्दल सतत या सभागृहामध्ये भांडते. या जुन्या नगरसेवकांना आणि तुम्हाला देखील माहिती आहे. पण एखाद्याकडे फोटोपास आहे म्हणून आपण त्यांना घर देणार आहोत का? फोटोपास कुठल्या आधारे घेतला ते बघा. एखादा फोटोपास दहा हजार रुपये देउनपण घेतलेला आहे. तो फोटोपास कुठल्या आधारे घेतला ती मुळ कागदपत्र चेक करा. त्याच्यानंतरच तुम्ही त्यांना रुम द्या. अशी

माझी सुचना त्या ठरावामध्ये घ्या आणि तुम्हाला जे वाटतील की, हे फोटोपास खोटे आहेत. कुठली तरी खोटी कागदपत्रे देवून बनवले आहेत. तर तो अधिकारी आणि ते लोक यांच्यावर गुन्हा दाखल करा.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

आपली नोंद घेतलेली आहे. त्याप्रमाणे मा. आयुक्त साहेब संपूर्ण चौकशी करतील आणि त्यांना घर देण्याची व्यवस्था करतील.

**मर्लिन डिसा :-**

सर, आपल्या परवानगीने बोलते. जो एम.टी.एन.एल. रोड आहे तो अतिक्रमणामुळे एकदम नॅरो होत चाललेला आहे. शाही हॉटेलजवळ काहीतरी मोठे शॉपींग सेटर येणार आहे. आणि ते दुकानवाले, हॉटेलवाले एकदम लोकांना चालायला फुटपाथ तर नाहीच.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

तो अतिक्रमणवाल्यांचा विषय आहे.

**मर्लिन डिसा :-**

तो रोड तिकडे परत करुन घेतला तर?

**मा. आयुक्त :-**

काल काम झाले नाही?

**मर्लिन डिसा :-**

काल झाले नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही बघितले नसेल.

**गणेश पाटील (प्रभाग अधिकारी) :-**

एम.टी.एन.एल. रोड पूर्ण जांगीडपर्यत झाला.

**मर्लिन डिसा :-**

पण तिकडे एक प्रिटींग प्रेसवाले श्री. शिवगुंडे यांनी पण मोठे अतिक्रमण केले आहे. सर मी उद्या रिपोर्ट करते.

**उमा सपार :-**

मा. आयुक्त साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. सोनाली रोड ते नयानगरकडे जाणारा रस्ता खुप खराब झालेला आहे. तिथे लोकांना येण्याजाण्याचा खुप त्रास होतो. आणि त्या रस्त्याची उंची वाढवून......

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

एक विषय लक्षात घ्या. हा रस्ता भूसंपादन करण्याचा विषय आहे. रस्ता दुरुस्तीचा नाही. तुम्ही पत्र टाका. तुम्ही बांधकाम विभागाशी संपर्क साधा आणि ते करुन घ्या.

नयना म्हात्रे :-

मा. पिठासिन अधिकारी साहेब, मी आता जे बोलले की, ज्यांनी पैसे देवून फोटोपास घेतले आहेत. त्या अधिका-यांवर तुम्ही काय कारवाई करणार आहात?

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

मा. आयुक्त साहेब संपर्ण चौकशी करतील आणि त्याप्रमाणे निर्णय घेतील. कोण अधिकारी दोषी असतील त्यांना काय करायचे ते मा. आयुक्त साहेब नियमाप्रमाणे करतील. प्रकरण क्र. १६ सुचनांसह मंजुर झालेला आहे.

**प्रकरण क्र. १६ :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास आराखड्यातील, विकास योजनेतील रस्ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार भुसंपादन करणेस प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. २० :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि. १४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि. २५/०८/२००० अन्वये मंजुर झालेली असून ती अनुक्रमे दि. १५/०७/९७ व दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

मंजुर विकास योजनेतील रस्ते तयार करावयाचे असून महापालिकेमार्फत वेळोवेळी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्त्याची कामे हाती घेण्यात येतात. सदर रस्त्याची जागा वेळोवेळी वाटाघाटीद्वारे व टी.डी.आर. / एफ.एस.आय. देवून ताब्यात घेण्यात येते. तथापी काही जागेबाबत संबंधित जमिन मालकाकडून विकासकाचा प्रस्ताव सादर न झाल्याने भूसंपादन करणे आवश्यक झालेले आहे. सदर रस्त्याचा तपशिल खालीलप्रामाणे आहे.

१) हटकेश उद्योगनगर मधील ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यामधील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते ग्रीन कोर्ट क्लब पर्यंतचा रस्ता.

२) प्लेझंट पार्क ते मिरागाव व एम.आय.डी.सी. पर्यंतचा ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

३) रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. पर्यंत ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

४) भाईंदर (प.) अमतवाणी सत्संग समोरील स्मशानभुमी पर्यंत जाणारा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

५) भाईंदर (पु.) एम.आय. उद्योग नगर मधील १२.०० मी. रूंदिच्या रस्त्याचे रूंदीकरण.

६) भाईंदर (पु.) केबिन रोड ते रेल्वे फाटकास जोडणारा १८.०० मी. रूंद रेल्वे समांतर रस्ता.

७) घोडबंदर गावातील १८.०० मी. रूंदीच्या रस्त्याचे रूंदीकरण करणे.

८) भाईंदर (पु.) जेसल पार्क ते घोडबंदर खाडी समांतर डी.पी. रस्ता.

९) भाईंदर (प) उड्डाणपुल ते मिरा रोडकडे जाणारा रेल्वे समांतर १३.०० मी. रूंदीचा रस्ता.

१०) भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंतचा ३०.०० मी. रूंदीचा रस्ता.

११) भाईंदर उत्तन – १८.०० मी. व ३०.०० मी. रूंदीचा रस्ता.

१२) भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) येथिल शिवसेना शाखेसमोरील सुरूवातीचा १८.०० मी. रस्ता रूंद करणे.

वरील रस्ते तयार करताना योजनेतील उर्वरीत रस्त्याची जागा व विकास योजनेतील रस्ता रुंदीकरणातील जागा ताब्यात घेण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व जिल्हाधिकारी यांचे मार्फत भुसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्याकरिता व सदर भूसंपादन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक सूचनांसह मंजुरी देण्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- ॲड. एस. ए. खान**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे व अनुमोदक श्रीम. नर्मदा वैती यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

१३) मौजे खारी, स.क्र. २६(१५४) या जागेमधून जाणारा जैन मंदिर ते राहूल पार्क पर्यंतचा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

१४) मौजे काशी, स.क्र. ६ या जागेमधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ते जरीमरी तलावापर्यंतचा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

हे दोन रस्ते विकसित करण्यासाठी जागा संपादन करणे आवश्यक असल्याने या भूसंपादन प्रस्तावात समावेश करण्यात यावा

१५) निलकमल अपार्टमेंट ते सफारी हॉटेल येथील डी.पी. रस्ता.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. सलिम शेख यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

१६) मुंशी कंपाउंड रस्ता.

१७) प्लेझंट पार्क ते डॉन बॉस्को स्कुल ते जकात नाका

१८) चर्च ते उघाडी

१९) भाईंदर (प.) भाईंदर सेकंडरी स्कुल मनोरमा अपार्टमेंट पासून पुढे जाणारा रस्ता.

२०) भाईंदर (प.) भाईंदर सेकंडरी स्कुल वर्धमान अपार्टमेंट पासून गॅस गोडाउन पुढे जाणारा रस्ता.

२१) आ.क्र. १२२-ड भाईंदर (पू.) येथे दफनभूमी तयार करणे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा व अनुमोदक श्री. एस.ए. खान यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून गेल्या पाच वर्षात मोठ्या प्रमाणात टी.डी.आर. देण्यात आलेला आहे. सदर टी.डी.आर. देते वेळी कागदपत्रांची योग्य ती छाननी न केल्यामुळे चुकीच्या पद्धतीने व बेकायदेशिर रित्या काही टी.डी.आर. दिल्याने मोठ्या प्रमाणत तक्रारी येत आहेत. तरी मागील पाच वर्षात दिलेल्या टी.डी.आर. प्रकरणांची मा. आयुक्त यांनी चौकशी करावी. आवश्यकता वाटल्यास राज्य शासनाकडून चौकशी करण्याकरिता सक्षम अधिकारी नेमावा, तक्रारी प्राप्त झालेल्या टी.डी.आर. चा वापर इमारतीमध्ये करू नये व संपूर्ण चौकशी अहवाल पुढील महासभेपुढे सादर करावा. सदर ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियान (खग़छङ्ग) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संगणकीकरणा संबंधी सविस्तर प्रकल्प अहवालास (क़्घ्ड)मंजुरी मिळणेबाबत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता डी.पी.आर. ला मंजुरी द्यायची पण आम्हाला इथे कुठे डी.पी.आर. दिसत नाही. डी.पी.आर. चा नेमका अर्थ काय? डीप प्लीन्थ रेकॉर्ड म्हणू का? व्हेअर इज डी.पी.आर.? व्हेअर इज द कॉपी ऑफ डी.पी.आर.? सगळ्यांना कॉपी वितरीत करा. नंतरच याच्यावर तुम्हाला मंजुरी मिळेल.

**सिमा मिश्रा :-**

वितरीत करते.

**प्रफुल्ल पाटील :-**

व्हाय यू हॅव नॉट डीलीव्हर द कॉपी ऑफ देज डी.पी.आर.

सिमा मिश्रा :-

सर, देअर व्हेअर सम करेक्शन इन्क्ल्युडींग जी.आय.एस. व्हिच वॉज डन फायनली टूडे.

**प्रफुल्ल पाटील :-**

यू वॉन्ट अस टू डू अ रिसॉल्युशन बिफोर अ करेक्शन.

**सिमा मिश्रा :-**

नो. दॅट इज बिईंग फायनलाईज नाउ. फायनल प्रिंट आर गोईंग ऑन.

**प्रफुल्ल पाटील :-**

देन यू डीलीव्हर ऑल द फायनल प्रिंट. देन ओन्ली व्ही व्हील गीव धीस रिसॉल्युशन. अदरवाईल व्ही व्हील नॉट गीव धीस सॅग्शन. ए.पी.आर. काही दाखवत नाही, काही नाही. आम्हाला काही माहिती नसते.

**जयंत पाटील (मा. पिठासिन अधिकारी) :-**

तुम्ही ऑनलाईन घ्या.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त) :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, अजेंडा काढते वेळी डी.पी.आर. कच्चा तयार होता. त्यावेळी तसा गोषवारा दिला होता. परत काही ॲडीशन आणि अल्टरेशन्स झालेले आहेत. त्यामुळे काल आपण परत सुधारीत गोषवारा दिलेला आहे. त्याचा जो फायनान्शीअल ब्रेक अप आहे. आपण १२ करोडचे प्रोजेक्ट कसे कसे केलेले आहे. ते मॅडम जस्ट रीड आउट करतील. आपल्याला ही स्कीम सेंट्रल गर्व्हमेन्टकडे बाकीच्या महानगरपालिकांनी ऑलरेडी पाठवलेल्या आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेला असे समजते की, त्यांना १५ कोटी रुपयांचा क - क्र्ध्ड्ढद्धदड्डदड़्ढ चा प्रोजेक्ट सॅग्शन झालेला आहे. आणि लगेचच आता एम.एम.आर.डी.ए. मार्फत मिटींग घेउन तो रेकमन्डेशन होणार आहे. त्यामुळे मा. महासभेसमोर हा प्रस्ताव ठेवलेला आहे आणि याच्यामध्ये सेंट्रल व स्टेट गर्व्हमेन्टचे असीस्टन्स आपल्याला ५० टक्के मिळणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण प्रत्येक याच्यामध्ये कर्जच घ्यायचे आहे का? आता याच्यात कर्ज घेणार. एम.एम.आर.डी.ए. मध्ये कर्ज घेणार. आपण कुठे कुठे कर्ज घेणार?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृहासमोर मी मांडू इच्छितो की, जे.एन.एन.यू.आर.एम. स्कीम अंतर्गत आपला जो फायनान्शीअल असीस्टन्ट रेशो आहे तो त्या ही.आर. प्रमाणे सेंट्रल गर्व्हमेन्टला ३५ टक्के स्टेट गर्व्हमेन्टला १५ टक्के आणि ५० टक्के लोकल बॉडीज असा तो रेशो बृहन्मुंबई एम.एम.आर.डी.ए. रिजनसाठी दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, खरी गोष्ट आहे. पण आपण असे किती कर्ज घेणार आहोत? डी.पी. रोडला घेणार, पाण्यासाठी घेणार, ह्या स्कीमसाठी घेणार. आपण किती लोन घेणार? आपले आर्थिक बजेट किती आहे? आपण कर्जामध्येच हे करायचे का?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृहाला मी सांगु इच्छितो की, आपण या संदर्भात जे ५० टक्के कॉन्ट्रीब्युशन करायचे आहे. हे काही प्रोजेक्ट, उदा. सिवरेज प्रोजेक्टसाठी आपण एम.एम.आर.डी.ए. कडे लोन संदर्भात त्यांनी मान्य केलेले आहे. आणि हा जो ई-गव्हर्नन्सचा प्रोजेक्ट आहे. या स्कीममधील हा सर्वात छोटा प्रोजेक्ट आहे. साधारणतः १२.५ करोड एवढ्या कमी रक्कमेचा आहे. त्याच्यामधील जी रक्कम आहे. ५० टक्के रक्कम साधरणतः जे सहा कोटी रुपये आहेत. एकतर आपण ते म्युनिसिपल फंडातून करु शकू किंवा त्या गाईडलाईन्समध्ये पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गतसुध्दा हा प्रकल्प घेता येतो. त्यातले जे प्रोज ॲन्ड कॉन्स आहेत ते विचारात घेउन याबाबतचे प्रपोजल केंद्र शासनाकडे पाठवू शकतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

पण तुम्ही आम्हाला डी.पी.आर.च दिला नाही. तर आम्हाला ते काय समजणार की, तुम्ही काय काय सॉफ्टवेअर आणता? नाहीतर त्याच्यामुळे तुमचा आकृती बंध (स्टाफ पॅटर्न) बदलणार आहे का? आर यू शुअर अबाउट दॅट. विथ यूअर एक्झीस्टींग कॅपेसिटी, आय ॲम सेईंग लेबर कॅपेसिटी यू व्हील बी ॲबल टू रन दॅट? यू टेल मी इन वन सेन्टेन्स.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभागृहाला मी निवेदन करु इच्छितो की, याच्यामध्ये जे आर्थिक कम्पोनन्ट आहेत ते मॅडम जस्ट रिड आउट करतील. आणि आपण जो कर्मचाऱ्यांसंदर्भात मुद्दा रेझ केलेला आहे. जर आपण पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या बेसवर गेलो तर आपल्याला डायरेक्ट लेबर किंवा कर्मचारी घेण्याची आवश्यकता पडणार नाही.

**राजेंद्र जैन :-**

मै आपको यहॉ पर रोकना चाहूँगा। आप आर्थिक प्रस्ताव मंजुरी के लिए ला रहे है और अब तक विचार कर रहे है की, पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप आयेगी या कैसे करेंगे। मै इसमे आपको पाईंट पर नंबर बोलता हू। सन्मा. प्रफुल्ल पाटील साहबने जैसा बोला की, यहॉ पर डी.पी.आर. रिपोर्ट नही है। यह सबसे बडी खामी है। इसलीए मै मा. महासभा से रिक्वेस्ट करुंगा की, जब तक डी.पी.आर. रिपोर्ट नही मिलता, हर सदस्य उसका स्टडी करता नही, तब तक इस प्रस्ताव को स्थगीत रखा जाए। नंबर दो बात, इसके अंदर सबसे बडी बात यह है की, यहापर दो इन्फॉर्मेशन पर काम हुए है। एक जी.आय.एस. पर अपना खर्च हुआ है। और दुसरा २२ लाख रुपया खर्च पहले सी.एफ.सी. को दिया हुआ है। २२ लाख के खर्चे तीन बॉडी हो गयी, अब तक कुछ काम नही हो रहा है। चौथे बॉडी पर आधा काम हो रहा है। मतलब मंजुरी लेने के बाद मा. महासभा मे कुछ आता नही है। आप लोग अपने हिसाब से काम करते है और सारा पैसा व्यर्थ जाता है। अब यह जो पैसा आप ले रहे है, यह बोलेंगे की, हम लोग इसको स्टेपवाईज ले रहे है। स्टेपवाईज क्या ले रहे है, वह चीज जब तक क्लीअर नही करेंगे। वह क्या चीज चाहिए? जब तक वह डिक्लेअर नही करेंगे। मा. महासभा आपको मंजुरी कैसी देगी? सबसे बडी बात, यह जो सॉफ्टवेअर सिस्टम है और जो हार्डवेअर है, जो नेटवर्कींग है, इसमे सबसे बडी इम्पोर्टंड चीज है, मॅन पॉवर। अभी आपको सी.एफ.सी. डिपार्टमेन्ट के अंदर सिर्फ तीन परमनन्ट स्टॉफ है और चौदा टेम्पररी स्टॉफ है। मिरा भाईंदर महानगरपालिका के ३४ डिपार्टमेन्ट है। हर ३४ डिपार्टमेन्टमे आपके पास कॉम्प्युटर, प्रिंटर, लॅपटॉप किया हुआ बंदा है। लेकीन वह टेम्पररी है। ई-गर्व्हनन्स जीतना इम्पॉटन्ट मुद्दा है। उसके उपर आपका यह जो कन्सल्टी डी.पी.आर. बनाया है, इसमे आपने प्रोफेशनल ट्रेनिंग भी जरुर रखा होगा। ट्रेनिंग तो करना ही पडेगा। आप सारा खर्च किस पर कर रहे है, टैम्पररी स्टाफ पर, इतना इम्पॉर्टन्ट प्रोजेक्ट टेम्पररी स्टाफ पर? वह चला गया तो वापस किसको ट्रनिंग देंगे? तो मेरा प्रस्ताव है की, ३४ डिपार्टमेन्ट मे पहले पर्मनन्ट आय.टी. एज्युकेटेड क्लार्क का आप डेप्युटेशन करो। उनको ट्रेनिंग दिजीए। ताकी हमारा यह प्रोजेक्ट खड्डे मे नही पडे। उसके बिना आगे चलने से बात करना भी युजलेस है। सिर्फ मशिन खरीदना, रख देना और जब उसको युज करनेका टाईम आयेगा। तब तक वह आउट डेटेड हो जाना। आप मॅडम से पुछीये की, इनके डिपार्टमेन्टमे जो मॉड्युम पडा है, वह कितना युज हो रहा है? मॅडम आप बताईए। आपके सात मॉडेल पुरे युज हो रहे है क्या? आपका सिंगल अकाउंट एन्ट्री सिस्टम था। वह अब डबल एन्ट्री अकाउंट सिस्टम है। क्या काम आया? आपने सिंगल अकाउंट लिया।

**सिमा मिश्रा :-**

मा. महापौर साहेबांच्या मान्यतेने बोलते. सिंगल एन्ट्री सिस्टम २००५-०६ साली घेतलेली होती. पण आता विभागामार्फत डबल एन्ट्री सिस्टमची कार्यवाही चालू झालेली आहे.

**राजेंद्र जैन :-**

वह पैसा वेस्ट गया ना?

**सिमा मिश्रा :-**

बट सर, कॅम्प्युटर मे उसका डेटा आ गया ना।

**राजेंद्र जैन :-**

दुसरा आपका केअर का मॉड्युल, उसपर अभी तक कुछ काम हुआ।

**सिमा मिश्रा :-**

सर, जब सारे डिपार्टमेन्ट कम्प्युटराईज हो जायेंगे तभी युज कर सकते है। अदरवाईज सी.एफ.सी. काउंटर पर कम्प्लेंट लेकर उसे रखना इज ऑफ नो यूज.

**राजेंद्र जैन :-**

इसका मतलब यह जो आपने कहा सब युज हो जायेंगे। इसका मतलब आप बात कर रहे है ई-प्रोक्युमेंट की। आप सभी डिपार्टमेन्ट से डेटा लेंगे तभी काम कर पायेंगे।

**सिमा मिश्रा :-**

यस।

**राजेंद्र जैन :-**

आपके पास डेटा लेने के लिए परसन कहॉ है? जब तक परमनन्ट स्टाफ नही होगा, इसके अंदर आप आगे कैसे बढ सकते है।

**सिमा मिश्रा :-**

सर, परमनन्ट स्टाफ को ट्रेन करनेका भी प्रोव्हीजन डी.सी. रुल मे है।

**राजेंद्र जैन :-**

आपके पास परमनन्ट स्टाफ है कहॉ पर?

**सिमा मिश्रा :-**

सर हमारे जो भी क्लार्क है, टॅक्स इन्स्पेक्टर है।

**राजेंद्र जैन :-**

नही, यह ई-गर्व्हर्नन्स है इसके लिए सेपरेटली मेरा प्रस्ताव है की, जो आय.टी. ग्रॅज्युएट होंगे। हमारी मा. महासभा जो भी काम करती है। सारा काम इन्फॉर्मेशन का होता है। इतना जो एक-देड घंटा लगा, वह देखकर बोलते है की, यह सर्वे नंबर, प्लान नंबर। अगर यह कॉम्प्युटर पर होगा तो इतनी बहस नही होगी। इसका मतलब यह बाहोत इर्म्पोटंट टॉपीक है। यह ट्रान्सपरन्सी लाना बहुत जरुरी है। इसके लिए जो स्टाफ होगा, वह डिपार्टमेंट के अंदर भी नही होना चाहिए। मैने इसके अंदर सुझाव दिया है। आज सुबह लक्षवेधी इसके लिए दिया था की, जो भी हर डिपार्टमेंट के अंदर जो डिपार्टमेंटसे सेंटर डेटा देनेवाल होगा त्तङ्ख ङ्मण्दृद्वथ्ङ्ड ददृद्य ड्ङ्ख द्वदङ्डङ्खद्ध द्यण्ङ्ड्य ड्ङ्खद्रङ्डद्धद्यश्ङ्खदद्य. एद्वद्य, ण्ङ्ख ङ्मण्दृद्वथ्ङ्ड ड्ङ्ख द्वदङ्डङ्खद्ध ङ्खत्द्यण्ङ्खद्ध क्क्ष दृद्ध ड्डत्द्धङ्खङ्द्यथ्ङ ङ्दृथ्श्त्ङ्मङ्मत्दृदङ्खद्ध. एङ्खङ्ङ्डद्वङ्मङ्ख उसको डिपार्टमेन्ट हॅन्ड प्रेशर नही कर सके। यह बाते जब तक नही होगी। दुसरी इर्म्पोटन्ट बात यह की, इन लोगो पर जो इन्फॉर्मेशन देने वाले है। जब तक इन पर इन्फॉर्मेशन देने का सिस्टम तीन दिन के अंदर लागू नही किया जाएगा और अगर नही दिया तो उसको पनिशमेंट का रुल नही आएगा। तब तक यह सॉफ्टवेअर बेकार है। आपका सॉफ्टवेअर करोडो का आएगा। आपके सॉफ्टवेअर की किमत कितनी होगी?

**सिमा मिश्रा :-**

ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर कुछ नौ करोड तक है।

**राजेंद्र जैन :-**

नौ करोड का सॉफ्टवेअर आएगा। खड्डे मे जाएगा। क्योंकह आपके पास आदमी नही है। आप आगे बात कैसे कर सकते है। इसलिए जब तक आय.टी. एज्युकेटेड परमनन्ट क्लार्क नही हो और जब तक उनको दंडात्मक प्रावधान सेवाशर्ती निश्चित नही की जाए। तब तक इसपर आगे बढने का कोई फायदा नही है। इसलिए मै सभागृह से आग्रह करता हू की, इस प्रस्ताव को स्थगीत रखा जाए। प्लस आपने जो पुरा पुरा सॉफ्टवेअर दिया है, उसको इअरली इम्प्लीमेंट कितना करेंगे और इअरली कितना खर्च करेंगे वैसे इसको लेकर आइए।

**सिमा मिश्रा :-**

मेरी तरफ से मै इतना बताना चाहूँगी की, डी.पी.आर. जस्ट एक रिपोर्ट है। जो हम केंद्र शासन.....

**राजेंद्र जैन :-**

जस्ट एक रिपार्ट है। लेकीन मा. महासभा मे डी.पी.आर. एक ही बार आता है। उसके बाद सारा काम डिपार्टमेंट मे और स्टॅंडीग मे होता है। मा. महासभा से परमिशन लेनी है, तो. मा. महासभा को पुरी जानकारी दिजीए।

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, सी.एफ.सी. मध्ये आपली तीन माणसे काम करतात, जी मुख्य आहेत. ते तिकडे काय काम करतात? त्यांचा अहवाल तरी मागवा. म्हणजे सॉफ्टवेअर बनवतात, बघतात किंवा काय मेन्टेन करतात?

**सिमा मिश्रा :-**

मा. महापौरांच्या मान्यतेने बोलते. संगणक विभागात तीन स्थायी पदांची नेमणूक करण्यात आलेली आहे. डिसेंबर २००६ ला सिस्टम ॲनालिस्ट आणि सिस्टम प्रोग्रामर म्हणून पोस्ट भरली गेली आणि नंतर मार्च २००७ ला सिस्टम मॅनेजर म्हणून माझी नेमणूक करण्यात आली. याच्यापूर्वी तिकडे एव्हीएम चे सॉफ्टवेअर चालू होते. पण त्याच्यावर आय.टी. च्या बाजूने कोणीही माणूस नियंत्रण ठेवायला नव्हता. ती कार्यवाही आम्ही करत आहोत.

**राजेंद्र जैन :-**

मेरी सुचना हे की, जो सॉफ्टवेअर वापस लिया जाए। उसे पहले एक साल तक अपने यहा रन किया जाए। उसमे नगरसेवको का क्या डेटा इनपूट करवाना है वह उसमे है की नही यह चेक किया जाए। और तब उनको फायनल परचेस किया जाए। यह मेरी सुबह लक्षवेधी मे सुचना थी। मै वापस इसको इस गोषवारा के अंतर्गत देता हू। यह मेरा ठराव है।

**मिलन पाटील :-**

याला अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. पिठासिन अधिकारी, मला वाटते की, थोडेसे कन्फुजन आहे. डॉक्टर साहेबांनी जे सांगितले की, प्रक्टीकल वर्कींग ऑफ कम्प्युटरायझेशन इन द इन्स्टीट्युट, त्याच्यावर त्यांनी जास्त भर दिला. पण हा जो डी.पी.आर. रिपोर्ट आहे, डी.पी.आर. रिपोर्ट म्हणजे तुमचे काम कसे चालणार आहे? अफ्टर कम्प्युटरायझेशन काम कसे चालणार आहे? आणि तो रिपोर्ट तुम्हाला गर्व्हमेंटला पाठवायचा आहे. जेणेकरुन तुमची जी स्कीम सॅक्शन होउन येईल त्याच्यातून तुम्हाला ५० टक्के अनुदान मिळेल. ही तर स्कीम आहे आणि गर्व्हमेंटच्या डायरेक्शनप्रमाणे डी.पी.आर. रिपोर्ट पाठवणे गरजेचे आहे. डॉक्टर साहेबांनी जे सांगितले की, प्रॅक्टीकल वर्कींग, त्याच्यामध्ये आपण मागे आहोत. च्छ्रुद्य त्द्म य्द्धद्वड्ढ. च्छ्रुद्य त्द्म ड्ढत्ढढड्ढद्धड्ढदद्य द्रड्ढद्धद्य पण हा डी.पी.आर. रिपोर्ट पाठवणे फार गरजेचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता डी.पी.आर. रिपोर्ट पाठवणे गरजेचे आहे ही गोष्ट जे.एन.एन.यु.आर.एम. स्कीममधून आपल्याला ५० टक्के मिळणार आहे म्हणून आहे. ५० टक्के खर्च तर आमच्या पालिकेवर येणार आहे. पण तुम्ही डी.पी.आर. मध्ये दगड मागितले, धोंडे मागितले, विटा मागितल्या, खडी मागितली की, रेती मागितली. आम्हाला कळू द्या तर खरं. कम्प्युटरच्या नावाखाली नाही तरी महापालिकेत बोंब आहे. मी गेल्या वर्षी २००६-०७ ला टॅक्स बील काढायला गेलो तर मला २००८-०९ चे बील मिळाले. एवढे अॅडवान्स कम्प्युटर आपल्याकडे आहेत. २००८-०९, श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या घराचे क्लासीक काउन्टी बील. आजसुध्दा तुमच्या मॅडमशी मी बोललेलो. तुम्ही केडीएमसीचे सॉफ्टवेअर घेतले. मॅडम, ते तुमच्या कामाचे आहे का? मा. पिठासीन अधिकारी साहेब, तुम्हाला एक गंमत सांगतो. यांच्या बीलामध्ये एक इंटरेस्टचा कॉलम आहे. आता २००८-०९ हे वर्ष चालू आहे. तर चालू वर्षाचे बील २००८-०९, जे काही असेल ते मागची थकबाकी भरलेली असेल तर त्याच्यावरचे इंटरेस्ट सगळ्या पार्टमध्ये म्हणजे घरपट्टी, वृक्षकर याच्यात जोडून येते. हे कसे काय? इंटरेस्ट असेल तर इंटरेस्ट कॉलममध्येच मागचे इंटरेस्ट बाकी राहिले पाहिजे. म्हणजे प्रत्येक वेळी घरपट्टीची रक्कम बदलत राहते. म्हणजे याचा अर्थ काय की, तुम्ही घरपट्टी वाढवता? वृक्षकर वाढवता? ती तीच राहिली पाहिजे. मग ते म्हणतात की आमच्याकडे ती सिस्टमच नाही. या सिस्टम जर तुम्ही इम्प्रुव्ह करत नाही. तर पुढे आलेले हे सगळे कसे करणार? नो डाउट, डी.पी.आर. ला मंजूरी द्यायला काही प्रॉब्लेम नाही. पण हातात डी.पी.आर.च नाही. वाचायला तरी पाहिजे. तुम्ही तयार केला आहे, तो डी.पी.आर. समोर ठेवा. पुढे विचार करुन आम्ही मंजुरी देउ. अजून वेळ आहे. म्हणजे आता मला देउन आत्ता मी पाहिजे तर वाचतो. एवढ्या पानांचा डी.पी.आर. दिला. आत्ता आम्ही वाचू. मला माहिती आहे की, तुम्हाला सिस्टम अप-टू-डेट करायची आहे. मला माहिती आहे की, तुम्हाला ५० टक्के केंद्र शासन आणि राज्य शासनाचे पैसे मिळणार आहेत. मला हे ही माहित आहे की, ५० टक्केचे कर्ज महानगरपालिका उभारणार आहे. आणि मला हे ही माहिती आहे की, या नगरपालिकेला दिवाळखोर महानगरपालिका म्हणून संबोधण्यात येणार आहे. आणि एम.एम.आर.डी.ए. तुम्हाला एक फुटकी पै पण देणार नाही. का, तर आतापर्यंत तुमचे कुठलेही कर्ज एम.एम.आर.डी.ए.ने सहजासहजी मंजूर केलेले नाही. आतापर्यंत तुमचे जेवढे प्रस्ताव गेले आहेत, ते जस्टीफाय करायलासुध्दा तुमच्याकडे काही नाही. ही सगळी बोबांबोंब आहे. मग हे पुढे पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप करणार आणि करणार ती गोष्ट वेगळी आहे. तरीसुध्दा आम्ही या डी.पी.आर.ला मंजुरी देउ. का, तर आम्हाला मॉडरेशन करायचे आहे. म्हणजे कसे, आम्हाला बिल गेट्सची भाषा करायची आहे. आणि आता आले ते ओबामाची आणि उत्तर भारतातील नाही तर आंध्रातील शेतकऱ्याचा नांगर धरुन काम करायचे आहे. म्हणजे हातात नांगर धरायचा आणि ओबामाने घातलेली टोपी डोक्यावर ठेवायची आणि कोट. आणि काम नांगर धरायचे करायचे. जर दोन्ही गोष्टींची अपेक्षा करत असाल. तर दोन्ही गोष्टींमध्ये जी तफावत आहे ती कमी करण्याचा प्रयत्न करा. सी.एफ.सी. ची चाललेली परिस्थिती, त्याच्यामध्ये असलेल्या त्रुटी, मॅडम, मी तुम्हाला सांगितल्या. या तुम्ही दूर करा. त्या दूर करत नाही. आज अशी बोंबाबोंब आहे की, सगळ्या डिपार्टमेन्टला कनेक्टीव्हीटी नाही. मग डॉक्टर साहेब जे ऑपरेशनचे बोलले. ही परिस्थिती उद्या हे आल्यानंतर पण होणार आहे. आज जे बोललो त्या अनुषंगाने ही संधी मिळाली म्हणून बोलतो. पुढच्या मिटींगला डी.पी.आर.चा विषय आणावा. तोपर्यंत डी.पी.आर. च्या सगळ्या कॉप्या सगळ्यांना वितरीत कराव्या. कारण डी.पी.आर. वाचल्याशिवाय बाकी कोणीही, सगळेच नाहीत. थोडे शिकलेले पण आहेत. अंगठेबहाद्दर असतील तरीसुध्दा माहिती आहे ना. यू शुल्ड नॉट.....

**राजेंद्र जैन :-**

ईअरलीव्हाईज डी.पी.आर. रिपोर्ट. डी.पी.आर. कम्प्लीट रिपोर्ट को आप ईअरली व्हाईज रके फीर दिजीए। ताकी हम इअरलीवाइज असेस कर सके। आप मॉंग रहे है वो सही है या इसमे कुछ सुधारणा चाहिए। और जब तक परमनन्ट स्टाफ की व्यवस्था होती नही है तब तक चर्चा करना भी बेकार है।

**मा. आयुक्त :-**

